(किल्ली) ---------------------------------------------------------------------.
तू - (कागदपत्रे) ---------------------------------------------------------------------.
(होडी) ---------------------------------------------------------------------.
(बातम्या) ---------------------------------------------------------------------.

## १२. सल्ला द्या. (५)

क. मला फिरायला जायचंय. --------------------------------------------- (माथेरानला जाणे)
ख. सोहमला चित्रपट पाहायचाय. कुठला सुचवू? -------------------------- ('टाईमपास' सुचवणे)
ग. माझं डोकं दुखतंय. ------------------------------------------ (औषध घेणे आणि झोपणे)
घ. सम्मती अभ्यास करत नाहीये. -------------------------------------- (तिला नीट समजावणे)
च. मिहिर मस्ती करतोय. --------------------------------------------------- (त्याला ओरडणे)

## १३. खालील विशेषणांपैकी विरुद्धार्थी विशेषणे शोधून त्यांच्या जोड्या लिहा. (५)

रागीट, उंच, ठेंगणा,व्यवस्थित, कष्टाळू, अस्वच्छ, अस्ताव्यस्त, आळशी, प्रेमळ, स्वच्छ

१. ------------------ ------------------
२. ------------------ ------------------
३. ------------------ ------------------
४. ------------------ ------------------
५. ------------------ ------------------

## १४. खालील उताऱ्यात कंसातील योग्य शब्द भरा. (ते (३), या, त्या, हे (७).) (५)

''------ घर किती लहान आहे, ------ घर त्या घरापेक्षा खूपच मोठे आहे. ------ खिडक्या बघ, दारासारख्या उंच आहेत. ------ अंगण किती सुंदर आहे. त्या घराला तर अंगणच नाहीये. आणि मला त्या लाद्यांचा रंगही आवडला नाही. ------ लाद्या जरा जास्त चांगल्या वाटतात. ------ घर मस्त उंच उंच झाडांच्या मध्ये आहे, तर ------ घर नुसतंच उंच इमारतीं मध्ये आहे. मला तर ------ घर आवडलंय. आपण ------ घर घेऊया, ------ नको. तुला काय वाटतं?''

# ११ पूर्ण चाचणी

**१५. खालील तक्त्यात कोणते ६ रंग लपलेले आहेत ते शोधा.** (३)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | स | फे | द | म | प | खु | ज | का |
| भो | श्र | ठ | थं | ब | औ | जां | भ | ळा |
| री | न | म | हि | र | वा | ल | न | ऊ |
| पि | क्षो | फ | त | व | र | ख | य | र |
| व | ध | पां | ढ | रा | ङ | ऑ | ल | के |
| ळा | स | शू | ष | औ | गु | ब | ह | श |
| द | घ | नि | ओ | ण | ला | ल | श | री |
| रै | मी | ळा | वो | र | बी | क | म | थ |

**१६. खालील पाट्यांसाठी योग्य सूचना द्या.** (२)








---------------------------  ---------------------------  ---------------------------





कृपया, धूम्रपान करू नये.  ---------------------------

**१७. नाती ओळखा.** (४)




अद्वैत हा अरैना ------------ भाऊ आहे. प्रसन्न व हर्षदा हे अरैना ------------ आई-बाबा आहेत. अरैना ------------ आत्या ------------ नाव प्रतिभा आहे. अरैना ------------ काका, प्रल्हाद बँकेत काम करतात. सुहासिनी ही अरैना ------------ आजी आहे, तर दिवाकर ------------ आजोबा. हे आहेत अरैना ------------ नातेवाईक. अरैना सर्वांची लाडकी आहे.

**१८. खालील चित्रांत कोण काय करत आहे ते लिहा.** (३)



लीना ------------------------



आई ------------------------



सिद्धेश ------------------------



बाबा ------------------------



निकिता ------------------------



नवनीत ------------------------

**१९. आपल्या मैत्रिणीच्या ई-मेलला उत्तर द्या.** (४)

प्रिय अनन्या,

कशी आहेस? आता कॉलेजला मस्त दोन महिने सुट्टी आहे. मला तर खूप धम्माल करायचीय या सुट्टीत. तुझा काय विचार आहे? काही ठरवलंयस का तू?

मी आणि माझ्या मैत्रिणी ट्रेकला जायचा विचार करतोय. पण कधी जायचं हेच ठरत नाहीये अजून.

तुला यायचंय का आमच्याबरोबर? आलीस तर मज्जा येईल गं.

तुला कधी वेळ असेल आणि किती दिवस तेही कळव.

प्लीज यायचा प्रयत्न कर.

तुझ्या मेलची वाट पाहतेय.

नेहा.

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

**२०. रिकाम्या जागी कंसातील योग्य विशेषणे लिहा.** (४)

**(कडू, सैल, आंबट, थंड, खारट, उंच, गरम, गोड)**

क. हा आंबा किती ------------------ आहे ना?

ख. औषध नेहमीच ------------------ असते.

ग. हाय, हे पाणी खूपच ------------------ आहे.

घ. हूहूहू, आज हवा जरा जास्तच ------------------ आहे, नाही का?

च. मीठ ------------------ असते.

छ. ह्ट! हे लिंबू अगदीच ------------------ आहे.

ज. अमेरिकेत खूप ------------------ इमारती आहेत.

झ. हा कुर्ता मला ------------------ होत आहे.

२१. वरदला नाटकाला जायचे आहे. तो 'पृथ्वी थिएटर' शोधत आहे. पण त्याला रस्ता कळत नाहीये. खाली दिलेल्या नकाशावरून तुम्ही त्याला रस्ता कसा सांगाल ते लिहा. (४)



## पाठ १



१. 1) रिक्शावाला 2) डॉक्टर 3) शिक्षक 4) विद्यार्थिनी 5) शिक्षिका 6) विद्यार्थी

४. आधार - इकडे - ईद - उडी - ऊन - एक - ॲक्शन - ऐकणे - ओला - ऑन - औषध - ऋषी - अंक

६. 1) कळ खण गडबड घट 2) चल छत जग झलक 3) टपटप ठग डर ढग 4) तन थर धन नर 5) पण फळ बस भर
6) यश रस लवकर वय 7) शहर षट् सतत हस

७. कप छत जग - खत जल चल - दल पण लय - टपटप पटकन गडबड - चटकन कमळ उघड - बल बडबड नळ

८. कप, खत, बस, कण, खण, चल, तप, मल, दम, तम /...

९.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | न | | म | | |
| | | च | ट | क | न | | |
| | | | | म | | | |
| | | उ | स | ळ | | | |
| | | द | | | | | |
| स | म | य | | ल | व | क | र |
| | ग | | श | ह | | प | |
| | | | | र | | | |

१०. **क ख ग घ** - कनक, कप, खरबूज, खडा, गड, गवत, घर, घट
**च छ ज झ** - चणा, चहा, छत, छत्री, जग, जत्रा, झड, झगा

१४. 1) कान 2) मान 3) हात 4) दात 5) कपाळ 6) गळा 7) गाल 8) जबडा 9) डोळा 10) नाक 11) घसा 12) पाय

## पाठ २



१. अ) चिमणी, चमचा आ) काच, पाच इ) भारत, मोर ई) शिक्षक, अक्षर

२. 2) ट्ठ 3) क्तो 4) ट्य 5) स्ल 6) द्‌य / द्य 7) ड्य 8) र्य / ऱ्य 9) ग्लि 10) फ्र 11) ध्या 12) ब्द 13) ज्य 14) स्म 15) स्ति

७.

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | बी | धी | र | फे | गु | हे | ना | ष | ना | अ | मा | प | जा |
| स | ळ | से | ऑ | स | प | फ | ने | श | ही | मा | र्च | ड | जी |
| ए | बु | जू | ग | ग | चे | ल | दा | फ | तु | वे | शा | व | ण |
| प्रि | स | आ | स्ट | पू | ती | र | हे | ळ | भे | डि | सें | ब | नो |
| ल | ली | जी | म | मी | जा | ने | वा | री | त्र | सें | ह | वां | व्हें |
| के | ले | तु | फे | तु | वे | ची | या | ड | का | ब | स | स | ब |
| गु | बै | फे | ब्रु | खा | खा | मा | ऑ | क्टो | ब | र | मा | क | र |
| वा | री | त | वा | ली | बा | ही | ली | सू | ए | स | र | ल | पा |
| वी | वा | हो | री | ख | की | ळ | ती | ती | स | मे | क | ल | ळ |
| र | बा | आ | प | ले | हे | मा | ल | या | जू | आ | ज्ञ | व | जा |
| बु | दी | बी | ण | ह | र | म | तु | तो | न | तु | तु | स | क |
| स | जु | य | खा | वा | प्र | खा | भे | स | वा | स | प्टें | ब | र |
| लो | लै | त | भे | इ | त | मा | ण | य | क | खू | चे | ज्ञ | य |

८. जानेवारी - फेब्रुवारी - मार्च - एप्रिल - मे - जून - जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर - ऑक्टोबर - नोव्हेंबर - डिसेंबर

९. 2) फेब्रुवारी 3) मार्च - एप्रिल 4) मे 5) जून - जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर 6) ऑक्टोबर 7) नोव्हेंबर 8) डिसेंबर

## पाठ ३

१. ३) आई ४) ओळख ५) कपाट ६) छंद ७) ठीक ८) दुकान ९) पत्रकार १०) परिचय ११) फळा १२) मराठी १३) मातृभाषा १४) मुलगी

२. १) माझं - तुम्ही - मी
 २) तुमचं - माझं - तुम्ही - मी

३. ख) माझं नाव पॉल. / मी पॉल.
 ग) माझं नाव (रेहान). / मी (रेहान). /...

४. २) मी टोकियोचा. मी टोकियोची.
 ३) मी लंडनचा. मी लंडनची
 ४) मी पॅरिसचा. मी पॅरिसची. /...

५. १) तू कुठे राहतोस?
 २) तू हर्ष ना?
 हो. तुझं नाव काय?
 मी मैथिली.
 ३) आपलं नाव काय?
 माझं नाव जॉन. आणि आपण?
 मी नेहा कदम.
 ४) अच्छा टाटा!
 ५) तो रोनॅल्डो आहे ना!

६. १) चेरी : हाय, माझं नाव चेरी. तुझं नाव काय?
 लिंडा : हाय, मी लिंडा.
 २) तारा : गुडमॉर्निंग, मी तारा. आणि तुम्ही?
 जॉन : गुडमॉर्निंग, मी जॉन.
 ३) बाबूलाल : नमस्कार!
 हरिप्रसाद : नमस्कार, आपण कोण?
 बाबूलाल : मी बाबूलाल. आपलं नाव काय?
 हरिप्रसाद : माझं नाव हरिप्रसाद.

७. २) क. नाही, मी मायर.
 ३) क. हॅलो, पीटर. मी पेट्रा.
 ४) ख. मी अनघा. मी पण कोल्हापूरची.

८. १) श्री. मनोहर जोशी : तुम्ही कसे आहात?
 श्री. सचिन जोगदंड : उत्तम.
 २) लिंडा : काय म्हणतोस?
 पीटर : मस्त.
 ३) लिंडा आणि पीटर : तुम्ही कसे आहात?
 श्री. जोशी आणि श्री. जोगदंड : आम्ही बरे आहोत.
 ४) मि. बिस्मिल्लाह खान : कसा आहेस तू?
 चिंटू : मी बरा आहे.
 ५) श्री. करतार सिंग : कशा आहात तुम्ही?
 श्रीमती शेख आणि श्रीमती लोबो : छान.
 ६) सोना : काय म्हणताय?
 दीपक, अजय आणि विद्या : मजेत.

९. १) गुड मॉर्निंग, माझं नाव बाँड.
 २) गुड मॉर्निंग, मिस्टर बाँड. आपण जेम्स बाँड का?
 ३) नाही, माझं नाव पीटर बाँड.
 ४) माफ करा, मिस्टर पीटर बाँड. मी जरासा विनोद केला.

१०. १) पत्रकार २) आडनाव ३) शेजारी ४) संभाषण
११. क) माझं ख) मी ग) मी घ) माझी च) मी छ) माझे
१२. क) मी / तो - मी / तो ख) तू - मी ग) आपण / तुम्ही घ) आम्ही च) ती छ) आपण / तुम्ही मी / आम्ही ज) त्या
१३. १) आपण / तुम्ही आम्ही - आम्ही २) आपण / तुम्ही - आपण / तुम्ही ३) तुम्ही - आम्ही ४) तुम्ही
१४. २) कसे आहात? ३) कशा आहात? ४) कशा आहात? ५) कसे आहात? ६) कसे आहात? ७) कसे आहात?
८) कशी आहेस? ९) कसा आहेस? १०) कशा आहात? ११) कसे आहात? १२) कशा आहात?
१५. १) आहेस - बरा - आहे - मस्त - कसे - छान - आहेत - कशी - आहे - आहोत
२) कसे - उत्तम - कशी - बरी - कसा - बऱ्या
१६. १) ख २) ग ३) क ४) ग ५) क ६) ग ७) ख
१७. १) नमस्कार २) हॅलो ३) सुप्रभात ४) माफ करा ५) चूक झाली ६) किती वाजले ७) धन्यवाद ८) ठीक आहे
१८. २) नमसकार - नमस्कार ३) अपण - आपण ४) नमबर - नंबर ५) नाहि - नाही ६) ठिक - ठीक
१९.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| न | व | ई | ची | पा | च | फ | बो |
| ऊ | टी | बा | रो | ख | ट्र | ली | ती |
| से | सा | ता | आ | ठ | स्क | दो | न |
| मी | त | क | अः | बा | दू | ध | ड |
| ना | ती | म | झ | रा | गा | ए | ऊ |
| ण | य | ए | क | छं | वा | स | का |
| पा | णि | अ | क | ठ | द | हा | सा |
| चा | र | ख | ऊ | न्य | त | ना | ष |

२०. क) तीन - नऊ - सात - दोन - बारा
ख) सहा - आठ - शून्य - एक - अकरा - पाच
२१. ख) दहा - अकरा
२२. **एकवचन :** तो कागद - तो वर्ग - तो शिक्षक
**अनेकवचन :** ते केस - ते पतंग
२३. **एकवचन :** बातमी - मुलगी - सायकल - रेघ
**अनेकवचन :** जाहिराती - बागा - ओळी
२४. **एक :** टेबल - पान - झाड - फळ
**अनेक :** गावे - पुस्तके - घरे - बोटे - नखे - पत्रे
२५. ख) इंग्लंड, अमेरिका, जर्मनी... ग) फ्रांस, इटली, स्पेन... घ) रशिया, ऑस्ट्रिया, स्वित्झर्लंड...
च) कॅनडा, अर्जेंटिना, श्रीलंका... छ) भारत, मलेशिया, थायलंड... ज) ओमान, सिरिया, इराण... (अनेक उत्तरे शक्य)

## पाठ ४

१. गुजरात - गुजराती, महाराष्ट्र - मराठी, बंगाल - बंगाली, पंजाब - पंजाबी, तमिळनाडू - तमिळ, दिल्ली - हिंदी
२. १) उत्तर - दिल्ली २) पश्चिम - मुंबई ३) पूर्व - कोलकाता ४) दक्षिण - चेन्नई
३. क) स्पॅनिश ख) ग्रीक ग) रशियन घ) जपानी च) चिनी छ) हिंदी ज) इंग्लिश झ) जर्मन ट) पोर्तुगीज
ठ) तुर्की ड) इटालियन ढ) फ्रेंच
५. १) नाव २) आडनाव ३) वय ४) भारत ५) मुंबईत ६) जन्मतारीख ७) मातृभाषा ८) भारतीय
६. १) काय - प्रशांत २) कोणता - वाचन करणे ३) काय - लेखक ४) कोणती - मराठी ५) कोणतं - सातारा
६) कुठे - माहीमला /...

पाठ ३

पाठ ४

७.

| | |
|---|---|
| - आमिर खान<br>- मुंबईचा<br>- अभिनेता<br>- विवाहित - तीन | - सचिन तेंडुलकर<br>- मुंबईचा<br>- खेळाडू<br>- विवाहित - दोन<br>- मराठी |

९. **इंग्रजी शब्द -** डेक्कन क्वीन, रिझर्वेशन, हॉल, बल्ब, गॅरेज, क्लास, फोन, सोसायटी, टूथपेस्ट, सीडीज, सेल, पोस्ट, फॉर्म

१०. २) गायक आहे. ३) चित्रकार आहे. ४) इंजिनियर आहे. ५) डॉक्टर आहे. /... ६) विद्यार्थिनी आहे. ७) अभिनेता आहे. ८) नर्तिका / नर्तकी / नृत्यांगना आहे.

११. २) नटी ३) विद्यार्थिनी ४) शास्त्रज्ञ ५) पत्रकार ६) गायिका ७-१२) मी इंजिनियर आहे. - मी इंजिनियर आहे. /... मी डॉक्टर आहे. - मी डॉक्टर आहे. /... मी चित्रकार आहे. - मी चित्रकार आहे. /... मी संगीतकार आहे. - मी संगीतकार आहे. /... मी वकील आहे. - मी वकील आहे. /... मी नर्तक आहे. - मी नर्तिका/नृत्यांगना/नर्तकी आहे. /... मी विक्रेता आहे. - मी विक्रेती आहे. /...

१२.

| | गाणे | खेळणे | वाचणे |
|---|---|---|---|
| मी  | गातो | खेळतो | वाचतो |
| मी  | गाते | खेळते | वाचते |
| आम्ही | गातो | खेळतो | वाचतो |
| आपण | गाता | खेळता | वाचता |
| तू  | गातोस | खेळतोस | वाचतोस |
| तू  | गातेस | खेळतेस | वाचतेस |
| तुम्ही | गाता | खेळता | वाचता |
| आपण | गाता | खेळता | वाचता |
| तो | गातो | खेळतो | वाचतो |
| ते | गातात | खेळतात | वाचतात |
| ती | गाते | खेळते | वाचते |
| त्या | गातात | खेळतात | वाचतात |
| ते | गाते / गातं | खेळते / खेळतं | वाचते / वाचतं |
| ती | गातात | खेळतात | वाचतात |

१३. २) आहे ३) राहता ४) शिकवते ५) पाहतेस ६) वाचतो ७) शिकतेस ८) करतोस ९) ऐकते १०) करता / करतो

१४. गातेस - वाजवतेस - गातो - येतेस

१५. आहेस - आहेस - करतोस

१६. राहतो - राहतो - आहोत - करतो - ऐकतो - आहे

१७.

| | पीटर | अंकिता |
|---|---|---|
| फुले पाठवणे | मी फुले पाठवतो. | मी फुले पाठवते. |
| हसणे | मी हसतो. | मी हसते. |
| दु:खी होणे | मी दु:खी होतो. | मी दु:खी होते. |
| रडणे | मी रडतो. | मी रडते. |
| प्रेम करणे | मी प्रेम करतो. | मी प्रेम करते. |
| गिटार वाजवणे | मी गिटार वाजवतो. | मी गिटार वाजवते. |
| स्वप्न पाहणे | मी स्वप्न पाहतो. | मी स्वप्न पाहते. |
| वाट बघणे | मी वाट बघतो. | मी वाट बघते. |
| खूष असणे | मी खुष आहे. | मी खुष आहे. |
| दु:खी असणे | मी दु:खी आहे. | मी दु:खी आहे. |
| गाणी ऐकणे | मी गाणी ऐकतो. | मी गाणी ऐकते. |

१८.

| | तो / मी | ती / मी | तू | तू |
|---|---|---|---|---|
| वाचणे | वाचतो | वाचते | वाचतोस | वाचतेस |
| पाठवणे | पाठवतो | पाठवते | पाठवतोस | पाठवतेस |
| होणे | होतो | होते | होतोस | होतेस |
| असणे | असतो | असते | असतोस | असतेस |
| पाहणे | पाहतो | पाहते | पाहतोस | पाहतेस |
| राहणे | राहतो | राहते | राहतोस | राहतेस |
| रडणे | रडतो | रडते | रडतोस | रडतेस |

१९. २) वाजवतो  ३) दिसतोस / दिसतेस  ४) बोलता  ५) आहे  ६) खेळतात  ७) ऐकते / ऐकतात  ८) लिहितात

२०. १) आहे  २) राहता - राहते  ३) शिकता - शिकते  ४) बोलता - बोलते

२१. २) आपण काय करता?
३) तो बंगाली बोलतो.
४) ती पुस्तक वाचते.
५) आपलं नाव काय?
६) आपला छंद काय?
७) जर्मनीमध्ये लोक जर्मन बोलतात.

२२. १) आहे - खेळते - वाचते
२) जर्मनीचा - तो - करतो - खेळतो
३) मुंबईत* - आहे - विवाहित - दोन* - करतो /...

२३. २) शिकवते - शिकते  ३) शिकवतो - शिकतो  ४) शिकवते - शिकते  ५) शिकवतो - शिकतो  ६) शिकवते - शिकते

२४. १) बोलता - बोलतो / बोलते  २) राहते / शिकते - आहे - आहेत / राहतात / शिकतात

२५. १) मी क्रिकेट खेळतो.  २) मी / आम्ही कबड्डी खेळतो. / मी कबड्डी खेळते.  ३) मी / आम्ही गिटार वाजवतो. / मी गिटार वाजवते.
४) मी टेनिस खेळतो.  ५) मी / आम्ही खो खो खेळतो. / मी खो खो खेळते.  ६) मी गाणी गाते.  ७) मी पुस्तक वाचतो.

२६. १) मी थोडं थोडं डच बोलतो. - मी फक्त स्पॅनिश बोलतो.
२) मी थोडं थोडं जपानी बोलते. - मी फक्त चिनी आणि इंग्रजी बोलते.
३) ती थोडं थोडं इंग्रजी बोलते. - ती फक्त जर्मन बोलते.
४) मी थोडं थोडं रशियन बोलतो. - मी फक्त मराठी आणि हिंदी बोलतो.
५) तो थोडं थोडं चिनी बोलतो. - तो फक्त जपानी बोलतो.
६) मी थोडं थोडं जर्मन बोलतो. - मी फक्त इंग्रजी बोलतो.
७) मी थोडं थोडं जर्मन बोलतो. - मी फक्त रशियन बोलतो.
८) ते थोडं थोडं फ्रेंच बोलतात. - ते फक्त स्पॅनिश बोलतात.
९) त्या थोडं थोडं मराठी बोलतात. - त्या फक्त बंगाली बोलतात.

२७. १) तू कविता वाचतेस?  २) तुम्ही पेपर वाचता?  ३) तू फ्रेंच गाणी गातोस?  ४) तू बॅडमिंटन खेळतोस?
५) ती इंग्रजी गाणी ऐकते?  ६) तुम्ही कबड्डी खेळता?  ७) तो गिटार वाजवतो?  ८) ती गाते?

२८. २) करते  ३) शिकतोस  ४) राहतात  ५) ऐकता

२९. २) कोणता  ३) कोणता  ४) कोणती  ५) कोणते  ६) कोणते  ७) कोणती  ८) कोणती  ९) कोणती

३०. २) कुठला  ३) कुठल्या  ४) कुठले  ५) कुठली  ६) कुठला  ७) कुठले  ८) कुठल्या  ९) कुठला  १०) कुठली  ११) कुठले

३१. २) कोणता, कुठला  ३) कोणता, कुठला  ४) कोणते, कुठले  ५) कोणती, कुठला  ६) कोणती, कुठली

३२. २) राजा  ३) ससा  ४) रस्ते  ५) फळे  ६) कुत्रा  ७) घोडे

३३. १) २ फळे  २) ३ घोडे  ३) २ मुलगे  ४) १ शाळा  ६) ४ दिशा  ८) ८ शिक्षिका

## पाठ ५

१. १) परवीन रोज / नेहमी गाणी ऐकते. २) आम्ही रोज / नेहमी फिरायला जातो. ३) ती मुले रोज / नेहमी शाळेत जातात.
४) तो रोज / नेहमी पुस्तक वाचतो. ५) त्या मुली रोज / नेहमी बडबड करतात.

२.

| | | |
|---|---|---|
| मी | (गाणे) गात | आहे. |
| आम्ही | (खेळणे) खेळत | आहोत. |
| तू | (पोहणे) पोहत | आहेस. |
| तुम्ही | (वाचणे) वाचत | आहात. |
| तो | (पळणे) पळत | आहे. |
| ती | (बघणे) बघत | आहे. |
| ते | (उठणे) उठत | आहे. |
| अमेय | (खाणे) खात | आहे. |
| गिरीशा | (येणे) येत | आहे. |
| ते | (राहणे) राहत | आहेत. |
| त्या | (ऐकणे) ऐकत | आहेत. |
| ती | (जाणे) जात | आहेत. |
| प्रकाश आणि राजेश | खेळत/... | आहेत/... |
| कृत्तिका आणि मानसी | शिकत/... | आहेत/... |

३. प्रिया रोज सकाळी लवकर उठते.
ती दात घासते.
ती चहा घेते.
ती घरीच व्यायाम करते.
ती रोज सकाळी नाश्ता करते व एक फळही खाते.
ती ऑफिसला जाते.
ती दुपारी कॅन्टीनमध्ये जेवते.
संध्याकाळी प्रिया घरी येते.
ती रोज पोहायला जाते.
ती रोज रात्री टी.व्ही. बघते.
ती रात्री वाचन करते.
ती रात्री लवकर झोपते /...

४. श्री. आणि सौ. चुनेकर सकाळी लवकर उठतात.
ते एकत्र चहा घेतात.
ते योगासने करतात.
ते एकत्र नाश्ता करतात.
सौ. चुनेकर स्वयंपाक करतात.
श्री. चुनेकर त्यांना मदत करतात.
मग दोघेही एकत्रच ऑफिसला जातात.
श्री. चुनेकर संध्याकाळी ६ वाजता घरी येतात.
ते स्वयंपाकाची तयारी करतात.
सौ. चुनेकर संध्याकाळी ७ वाजता घरी येतात.
श्री. आणि सौ. चुनेकर स्वयंपाक करतात.
चुनेकर कुटुंब रात्री एकत्र जेवते.
ते रात्री फिरायला जातात.
श्री. आणि सौ. चुनेकर रात्री लवकर झोपतात /...

५. १) नीला पोहत आहे. २) भात शिजत आहे. ३) आंबे पिकत आहेत. ४) ढग गडगडत आहेत.
५) कुत्रा आणि मांजर भांडत आहेत. ६) बाबा आणि संजय बोलत आहेत. ७) आम्ही नाचत आहोत. ८) तुम्ही भांडत आहात.
९) तू बोलत आहेस. १०) मी पोहत आहे /...

६. १) सचिन बॅटिंग / फलंदाजी करत आहे. २) हसी रन्स / धावा काढत आहे. ३) प्रेक्षक टाळ्या वाजवत आहेत.
४) दिलशान कॅच / झेल पकडत आहे. ५) मलिंगा बोलिंग / गोलंदाजी करत आहे.

७. १) बोलत आहेत. २) थांबत आहे. ३) भांडत आहेत. ४) वाहत आहे. ५) लिहीत आहात / आहेस ?

८. २) आम्ही बंगाली शिकत नाही आहोत.
३) तो झोपत नाही आहे.
४) निधी खेळत नाही आहे.
५) आता पाऊस पडत नाही आहे.
६) सौरभ बाहेर जात नाही आहे.

९. २) जय टिव्ही पाहत नाही आहे.
३) मुग्धा आणि केतकी गाणी ऐकत नाही आहेत.
४) मी जर्मन शिकत नाही आहे.
५) आजी पूजा करत नाही आहे.
६) तो नवीन पुस्तक लिहीत नाही आहे.

१०.

| **बोलताना** | **लिहिताना** |
|---|---|
| मी वाचतोय | मी वाचत/वाचतो आहे. |
| मी काम करतेय | मी काम करत आहे. |
| आम्ही / आपण जातोय | आम्ही / आपण जात आहोत. |
| तू घेतोयस | तू घेत आहेस (पु.) |
| तू खातेयस | तू खात आहेस (स्त्री.) |
| तुम्ही / आपण निघताहात / निघताय | तुम्ही / आपण निघत आहात. |
| तो बोलतोय | तो बोलत/बोलतो आहे. |
| ते पाहतायत / पाहताहेत | ते पाहत आहेत. |
| ती गातेय | ती गात/गाते आहे. |
| त्या नाचतायत | त्या नाचत आहेत. |
| ते चालतंय | ते चालत आहे. |
| ती धावतायत | ती धावत आहेत. |

११.

| | | |
|---|---|---|
| २) ती पिते. | ती पीत आहे. | ती पितेय. |
| ती चहा पिते. | ती चहा पीत/पिते आहे. | ती चहा पितेय. |
| ३) आम्ही बघतो. | आम्ही बघत/बघतो आहोत. | आम्ही बघतोय. |
| आम्ही बातम्या बघतो. | आम्ही बातम्या बघतो आहोत. | आम्ही बातम्या बघतोय. |
| ४) तो लिहितो. | तो लिहीत/लिहितो आहे. | तो लिहितोय. |
| तो पत्र लिहितो. | तो पत्र लिहीत/लिहितो आहे. | तो पत्र लिहितोय. |
| ५) ते खातात. | ते खात आहेत. | ते खातायत. |
| ते वडा खातात. | ते वडा खात आहेत. | ते वडा खातायत. |
| ६) मी ऐकतो. | मी ऐकत/ऐकतो आहे. | मी ऐकतोय. |
| मी गाणी ऐकतो. | मी गाणी ऐकत आहे. | मी गाणी ऐकतोय. |

१२. १ - ट, २ - झ / ज ३ - क / छ ४ - ज ५ - छ / क ६ - ग / ज / झ ७ - ख ८ - च ९ - घ

१३. १) नाहीये - वाचतेय २) निघतोय - जातोय ३) बोलतायत ४) वाढतेय - धावतेय - दिसतय ५) पाहतेय - गातायत
६) पडतोय - साचतय - नाहीये ७) करताय - देताय ८) जातेयस/जातोयस - येतोय

१४. १) चालले / लं आहे - भांडत आहेत - मिळत आहे - मिळत आहे २) करत आहात - मारत आहात - ओरडत आहात - होत आहे
३) बोलत आहात - वाचत आहेत ४) घेत आहेस - घेत आहे - खात आहात ५) निघत आहोत - जात आहोत - येत आहात
६) वाढत आहे - होत आहे - येत आहे -दिसत आहे - वाटत आहे ७) कळत आहे - म्हणत आहे - पडत आहे

१५. १) बरे वाटत आहे / बरं वाटतंय. २) नको आहे / नकोय. ३) हवं आहे / हवंय. ४) आनंद होत आहे / होतोय.

पाठ ७

५) वाईट वाटत आहे / वाटतंय. ६) घाई नाही आहे / नाहीये. ७) उशीर होत नाही आहे / नाहीये. ८) बरे नाही आहे / नाहीये.

१७. १) रविवार २) बुधवार ३) गुरुवार ४) शुक्रवार ५) सोमवार ६) मंगळवार ७) शनिवार

१८.

| क्र. | नाव | तारीख | वार | कधी | किती वाजता | कुठे |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | मराठी बाणा | ३० | रविवार | दुपारी | ४ | कालिदास, मुलुंड |
| २) | घोळात घोळ | ३१ | सोमवार | सायंकाळी / संध्याकाळी | ५ | बालगंधर्व, पुणे |
| ३) | सोबत संगत | २९ | शनिवार | रात्रौ / रात्री | ८ | शिवाजी मंदिर |

१९. ख) ३२ + १ = तेहतीस ग) ४७ + १ = अठ्ठेचाळीस घ) २४ + १ = पंचवीस च) ८ + १ = नऊ
छ) २७ + १ = अठ्ठावीस ज) ४१ + १ = बेचाळीस झ) १६ + १ = सतरा ट) ९ + १ = दहा
ठ) ३५ + १ = छत्तीस ड) ० + १ = एक

२०. १ - ख २ - घ ३ - च ४ - क ५ - ग ६ - झ ७ - ट ८ - ज ९ - ठ १० - छ

२१. पंधरा - अठरा - बत्तीस - अडतीस - एकेचाळीस - त्रेचाळीस - सत्तेचाळीस - पन्नास

२२. ५० - पन्नास, ४८ - अठ्ठेचाळीस, ४६ - सेहेचाळीस, ३६ - छत्तीस, ३४ - चौतीस, ३२ - बत्तीस, ३० - तीस,
२७ - सत्तावीस, २२ - बावीस, २० - वीस, १८ - अठरा, १६ - सोळा

२३. **पुल्लिंगी : एकवचन -** तो विद्यार्थी - तो दूरध्वनी - तो पती - तो कर्मचारी
**अनेकवचन -** ते हत्ती - ते पक्षी - ते शेतकरी
**स्त्रीलिंगी : अनेकवचन -** त्या गृहिणी - त्या विद्यार्थिनी - त्या अभिनेत्री
**एकवचन -** ती आई - ती भाजी - ती बाई
**अनेकवचन -** त्या होड्या - त्या बातम्या - त्या मिठाया - त्या मिश्या

## पाठ ६

१. २) पितात ३) खातात ४) पितात ५) पितात

२.

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| सार नाही,ताक :<br>तुम्ही सार पिता / घेता का?<br>मला सार चालत / आवडत नाही.<br>मला ताक चालतं /आवडतं. | भात नाही, चपाती :<br>तुम्ही भात खाता का?<br>मला भात चालत / आवडत नाही.<br>मला चपाती चालते / आवडते. | उपमा नाही, पोहे :<br>तुम्ही उपमा खाता का?<br>मला उपमा चालत / आवडत नाही.<br>मला पोहे चालतात / आवडतात. | आमरस नाही,कलिंगडाचा रस :<br>तुम्हीआमरस पिता / घेता का?<br>मला आमरस चालत / आवडत नाही.<br>मला कलिंगडाचा रस चालतो / आवडतो. |

३.

| गौरव | समीरा | रोहित | | गौरव | समीरा | रोहित | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| खात नाही | खाते | | भाज्या | पितो | | | पाणी |
| | | खातो | अंडी | | पिते | | चहा |
| | | खातो | चिकन | | पीत नाही | | कॉफी |
| | | खातो | आईस्क्रीम | | | पीत नाही | शीतपेये |
| | खाते | | कोशिंबीर | | | पीत नाही | दूध |
| खातो | | | मासे | | | पितो | फळांचा रस |
| खातो | | खात नाही | वरणभात | | | | |

४. उपाहारगृहामध्ये सोमवारी बटाटेवडे असतात.
उपाहारगृहामध्ये मंगळवारी पोहे असतात.
उपाहारगृहामध्ये बुधवारी मिसळपाव असतो.
उपाहारगृहामध्ये गुरुवारी इडली असते.
उपाहारगृहामध्ये शुक्रवारी समोसा असतो.
उपाहारगृहामध्ये शनिवारी थाळी असते.
उपाहारगृहामध्ये रविवारी ऑम्लेट असते.
उपाहारगृहामध्ये मंगळवारी भजी असतात.
उपाहारगृहामध्ये रोज चहा असतो.
उपाहारगृहामध्ये रोज कॉफी असते.
उपाहारगृहामध्ये आज डोसा आहे /...

५.

| मी | तू | तो | ती | ते | आम्ही | आपण | तुम्ही | ते | त्या | ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **मला** | **तुला** | त्याला | **तिला** | **त्याला** | आम्हाला | **आपल्याला** | **तुम्हाला** | त्यांना | **त्यांना** | **त्यांना** |

६. १) मला २) मला ३) तुला ४) तुला ५) तुला ६) तुला ७) तुला
७. २) तुला ३) त्याला / त्यांना ४) त्याला / त्यांना ५) तुला ६) मला ७) त्याला / त्यांना ८) त्यांना ९) त्यांना १०) आम्हाला
८. २) मी त्याला पत्र लिहितो आणि तो मला.
मी त्याला पत्र लिहिते आणि तो मला.
३) मी त्याला भेटतो आणि तो मला.
मी त्याला भेटते आणि तो मला.
४) मी तिला सल्ला देतो आणि ती मला.
मी तिला सल्ला देते आणि ती मला.
५) मी तिला प्रश्न विचारतो आणि ती मला.
मी तिला प्रश्न विचारते आणि ती मला.
६) मी त्याला गोष्ट सांगतो आणि तो मला.
मी त्याला गोष्ट सांगते आणि तो मला.
७) मी तिला शब्दांचे अर्थ विचारतो आणि ती मला.
मी तिला शब्दांचे अर्थ विचारते आणि ती मला.
८) मी त्याला फोटो पाठवतो आणि तो मला.
मी त्याला फोटो पाठवते आणि तो मला.
९. २) त्या मला पत्र लिहितात आणि मी त्यांना. आम्ही एकमेकांना पत्र लिहितो.
३) ते मला भेटतात आणि मी त्यांना. आम्ही एकमेकांना भेटतो.
४) ती मला सल्ला देते आणि मी तिला. आम्ही एकमेकांना सल्ला देतो.
५) तू मला प्रश्न विचारतेस आणि मी तुला. आपण एकमेकांना प्रश्न विचारतो.
६) त्या मला गोष्ट सांगतात आणि मी त्यांना. आम्ही एकमेकांना गोष्ट सांगतो.
१०. २) त्या आम्हाला पत्र लिहितात आणि आम्ही त्यांना. आम्ही एकमेकांना पत्र लिहितो.
३) ते तिला भेटतात आणि ती त्यांना. ते एकमेकांना भेटतात.
४) ती तुम्हाला सल्ला देते आणि तुम्ही तिला. तुम्ही एकमेकांना सल्ला देता.
५) तू मला प्रश्न विचारतोस आणि मी तुला. आपण एकमेकांना प्रश्न विचारतो.
६) त्या आम्हाला गोष्ट सांगतात आणि आम्ही त्यांना. आम्ही एकमेकांना गोष्ट सांगतो.
११. २) मी त्याला पत्र लिहितो आणि तो मला. आम्ही एकमेकांना पत्र लिहितो.
मी त्याला पत्र लिहिते आणि तो मला. आम्ही एकमेकांना पत्र लिहितो.
३) मी त्याला भेटतो आणि तो मला. आम्ही एकमेकांना भेटतो.
मी त्याला भेटते आणि तो मला. आम्ही एकमेकांना भेटतो.
४) मी तिला सल्ला देतो आणि ती मला. आम्ही एकमेकांना सल्ला देतो.
मी तिला सल्ला देते आणि ती मला. आम्ही एकमेकींना सल्ला देतो.

५) मी तिला प्रश्न विचारतो आणि ती मला. आम्ही एकमेकांना प्रश्न विचारतो.
मी तिला प्रश्न विचारते आणि ती मला. आम्ही एकमेकींना प्रश्न विचारतो.
६) मी त्याला गोष्ट सांगतो आणि तो मला. आम्ही एकमेकांना गोष्ट सांगतो.
मी त्याला गोष्ट सांगते आणि तो मला. आम्ही एकमेकांना गोष्ट सांगतो.
७) मी तिला शब्दांचे अर्थ विचारतो आणि ती मला. आम्ही एकमेकांना शब्दांचे अर्थ विचारतो.
मी तिला शब्दांचे अर्थ विचारते आणि ती मला. आम्ही एकमेकींना शब्दांचे अर्थ विचारतो.
८) मी त्यांना फोटो पाठवतो आणि त्या मला.आम्ही एकमेकांना फोटो पाठवतो.
मी त्यांना फोटो पाठवते आणि त्या मला. आम्ही एकमेकींना फोटो पाठवतो.

१२. १) मी / आम्ही २) त्यांना ३) त्याला ४) त्याला ५) तिला
१३. २) तो - त्याला ३) ती - त्याला ४) तो - तिला ५) ते - त्याला ६) तो - त्यांना ७) तो - त्याला ८) तो - त्याला ९) तो - तिला
१४. **क**) १) मला २) तुला ३) मला ४) तुला
**ख**) १) आम्हाला २) मला ३) तुम्हाला ४) आम्हाला
१५. २) असते - नसते - असतं ३) असतो - नसते ४) असतो - असतो / नसतो ५) असतं असतात
१६. १) आणि २) पण ३) पण ४) आणि ५) आणि ६) आणि ७) पण ८) आणि
१७. १) ख २) क ३) ग
१८. १) क) चैताली खूप उंच आहे. ख) ती मुले खूप उंच आहेत. ग) ती इमारत खूप उंच आहे.
२) क) ओंकार श्रीमंत आहे. ख) त्या बायका श्रीमंत आहेत. ग) तू श्रीमंत आहेस.
३) क) हे चित्र सुंदर आहे. ख) ह्या साड्या सुंदर आहेत. ग) श्वेता सुंदर आहे.
४) क) प्रतीक आळशी आहे. ख) तू आळशी आहेस. ग) आपण आळशी आहोत.
१९.

| | विशेषण | नाम |
|---|---|---|
| २ | लाल | फुले |
| ३ | फार | तहान |
| | थंड | पाणी |
| ४ | उत्तम | जेवण |
| ५ | सुरेल | गाणी |
| | चविष्ट | स्वयंपाक |
| | हुशार | मुलगी |
| ६ | महाग | फळे |
| | स्वस्त | भाज्या |

२०. १) सडपातळ २) लठ्ठ ३) ठेंगू ४) उंच ५) श्रीमंत ६) गरीब ७) गरम ८) थंड ९) रागीट १०) शांत
२१. २) आदित्य उजळ आहे. तो ठेंगू आणि स्थूल आहे. तो शांत आहे, पण चौकस आहे. तो अस्ताव्यस्त आहे, पण नेहमी निरोगी असतो.
६) जस्सी आणि इंदर गव्हाळ आहेत. ते (दोघेही) उंच आणि सडपातळ आहेत. ते रागीट आणि बेफिकीर आहेत.
दोघेही सतत आजारी असतात. (अनेक उत्तरे शक्य)

## पाठ ७

१. **हा ही हे या :** हा चहा, ही सी.डी., हे घड्याळ, ही टेबलं, हे कपडे, ही टूथपेस्ट, या भाज्या, ही बॅग
**तो ती ते त्या :** ते दूध, ती कॉफी, ती फळे, त्या खुर्च्या, ते पुस्तक, तो कॉम्प्युटर
२. २ - घ, ३-क, ४-ख, ५-छ, ६-ठ, ७-ज, ८-ट, ९-च, १०-झ, ११-ड, १२-ढ
३. २) ही ३) ती ४) तो ५) हे - ते ६) हे - ते ७) हा - तो
४. २) हे बाळ आहे. हे हसते / हसतं. हे खुष आहे. ३) ही बाई आहे. ही गाते. ही खुष आहे.
४) हे पर्यटक आहेत. हे भारतात येतात. हे खुष आहेत. ५) या विद्यार्थिनी आहेत. या मराठी शिकतात. या खुष आहेत.

५. **भाज्यांची नावे व सर्वनामे**

| क्रमांक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| १) | तो टोमॅटो | ते टोमॅटो |
| २) | तो बटाटा | ते बटाटे |
| ३) | ते वांगे / वांगं | ती वांगी |
| ४) | ती काकडी | त्या काकड्या |
| ५) | ते गाजर | ती गाजरे / गाजरं |
| ६) | तो फ्लॉवर | - |
| ७) | तो मटार | ते मटार |
| ८) | तो कांदा | ते कांदे |
| ९) | तो पालक | - |
| १०) | ती मिरची | त्या मिरच्या |

६. **फळांची नावे व सर्वनामे**

| क्रमांक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| १) | ते संत्रे / संत्रं | ती संत्री |
| २) | तो पेरू | ते पेरू |
| ३) | ते मोसंबे / मोसंबं | ती मोसंबी |
| ४) | ते अननस | ती अननस |
| ५) | ते डाळींब | ती डाळींबे/ डाळींबं |
| ६) | ते द्राक्षे / द्राक्षं | ती द्राक्षे |
| ७) | ते सफरचंद | ती सफरचंद |
| ८) | तो आंबा | ते आंबे |
| ९) | तो चिक्कू | ते चिक्कू |
| १०) | ते केळे / केळं | ती केळी |



७. २) चूक - आंबा काळा नसतो. ३) बरोबर ४) चूक - संत्री तुरट नसतात. ५) चूक - सफरचंद पांढरे नसते. ६) बरोबर
७) चूक - पपई कडू नसते. ८) चूक द्राक्षे तिखट नसतात.

८. २) केळी - ही केळी ३) मोसंबी - ही मोसंबी ४) द्राक्षे / द्राक्षं ही द्राक्षे / द्राक्षं ५) संत्रे / संत्रं - आवडते / आवडतं - ही संत्री
६) आंबा - हा आंबा ७) पेरू - हा पेरू ८) कलिंगड - हे कलिंगड ९) पपई - ही पपई १०) आंबे - हे आंबे

९. २) ही - हे - ही ३) हा - ही - हा ४) ही - ही ५) हा - ही - हा ६) हे - हा - हे ७) ही - या - ही ८) हे - ही - हे
९) या - ही - या १०) ही - हा - ही

१०. २) ते ३) तो ४) ती ५) त्या ६) ते ७) तो ८) ती ९) ते १०) ती ११) ती १२) ती १३) ती १४) ती

११. १) हा बूट नवीन आहे का? नाही, हा जुनाच आहे. / हे बूट नवीन आहेत का? नाही, हे जुनेच आहेत.
२) ही जीन्स नवीन आहे का? नाही, ही जुनीच आहे.
३) या चपला नवीन आहेत का? नाही, या जुन्याच आहेत.
४) हा चष्मा नवीन आहे का? नाही, हा जुनाच आहे.
५) ही झोळी नवीन आहे का? नाही, ही जुनीच आहे.
६) ही पर्स नवीन आहे का? नाही, ही जुनीच आहे.
७) ही सलवार नवीन आहे का? नाही, ही जुनीच आहे.
८) ही कानातली नवीन आहेत का? नाही, ही जुनीच आहेत.
९) या बांगड्या नवीन आहेत का? नाही, या जुन्याचआहेत.
१०) ही माळ नवीन आहे का? नाही, ही जुनीच आहे.

१२. **अ.** २) हे ३) हा ४) हा ५) हे ६) या क) हा ख) हे ग) या घ) हे छ) हा
**जोड्या** - २-घ, ३-छ, ४-क, ५- ख, ६- ग
**ब.** १) ते २) ती ३) ते ४) ते ५) तो ६) ते क) ती ख) तो ग) ते घ) ते च) ते छ) तो
**जोड्या** - १-ग, २-क, ३-ख, ४-च, ५-छ, ६-घ

१३. १) कसं २) कशी ३) कसा ४) कसा ५) कसा ६) कसं ७) कशी

१४. क) पंचावन्न ख) सदुसष्ठ ग) बासष्ठ घ) एकोणसाठ च) चौऱ्याहत्तर छ) एकोणऐंशी ज) अठ्ठ्याण्णव
झ) त्र्याऐंशी ट) अडुसष्ठ ठ) पंच्याण्णव ड) शंभर ढ) अठ्ठ्याऐंशी

१५. १) ६०, ६१, ६२, ६३, ६४ २) ७८, ८०, ८१, ८२, ८४ ३) ५०, ५२, ५४, ५६, ६० ४) ६३, ६६, ७५, ७८, ८४
५) ९१, ९४, ९७, १००

१६. क) ७४ - चौऱ्याहत्तर ख) ५७ - सत्तावन्न ग) ५३ - त्रेपन्न घ) ९८ - अठ्ठ्याण्णव च) ५९ - एकोणसाठ

१७. २) आठ वाजून तेहतीस मिनिटे
३) दोन वाजून चाळीस मिनिटे
४) पाच वाजून अठ्ठावीस मिनिटे
७) दहा वाजून नऊ मिनिटे आणि आठ सेकंद.
८) बारा.
९) पाच वाजून अठ्ठावन्न मिनिटे आणि एकावन्न सेकंद.
१०) चार वाजून बत्तीस मिनिटे आणि एकवीस सेकंद.

१८. १) तीन तास, पंचेचाळीस मिनिटे
२) दहा तास, वीस मिनिटे
३) सहा तास
४) एक तास, अकरा मिनिटे
५) बारा तास, पाच मिनिटे
६) सात तास, तीस मिनिटे आणि चौपन्न सेकंद.
८) सहा तास, पाच मिनिटे आणि पंचवीस सेकंद.
९) एक तास, बेचाळीस मिनिटे आणि अठ्ठावन्न सेकंद.
१०) दोन तास, अकरा मिनिटे आणि चौतीस सेकंद.



## पाठ ८

१. **अ)** १) आवर २) उचल ३) बदल ४) ठेव ५) धू ६) कर ७) पूस
**आ)** १) या २) बसा ३) जेवा ४) या
**इ)** १) ये २) बस ३) घे ४) घे ५) जेव ६) राहा ७) ये

२. २) मैत्रिणीबरोबर खेळ.
३) पुस्तक वाच.
४) मला मदत कर.
५) टी.व्ही. बघ.
६) गाणी ऐक.
७) मैत्रिणीला घरी बोलव.
८) भाजी चीर.
९) खोली आवर.
१०) झाडांना पाणी घाल.

३. २) बटाटे आण / आणा.
३) खरं बोल.
४) गाणी ऐक / ऐका.
५) हा चित्रपट बघ / बघा.
६) पटपट जेव.
७) कपडे वाळत घाल / घाला.
८) गाणे म्हण / म्हणा.
९) गाडी हळू चालव / चालवा.
१०) भरभर चाल / चाला.

४. १) दे / द्या २) ने / न्या ३) पी / प्या ४) बघ

५. २) २ ३) १ ४) २ ५) २ ६) २ ७) १ ८) २ ९) १ १०) २ ११) १ १२) २ १३) १ १४) १

६. २) लिहा ३) बघा ४) या - करा ५) ये - कर ६) बनवा - राहा - राहा ७) शोधा ८) दे ९) भर / भरा

७.

| धातू | क्रियापद | एकवचन | अनेकवचन | नकारार्थी एकवचन | नकारार्थी अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| | करणे | कर | करा | करू नकोस | करू नका |
| | वाचणे | वाच | वाचा | वाचू नकोस | वाचू नका |
| | आणणे | आण | आणा | आणू नकोस | आणू नका |
| | ऐकणे | ऐक | ऐका | ऐकू नकोस | ऐकू नका |
| | खेळणे | खेळ | खेळ | खेळू नकोस | खेळू नका |
| | सांगणे | सांग | सांग | सांगू नकोस | सांगू नका |
| | बघणे | बघ | बघा | बघू नकोस | बघू नका |
| | जेवणे | जेव | जेव | जेवू नकोस | जेवू नका |
| | झोपणे | झोप | झोपा | झोपू नकोस | झोपू नका |
| | बोलणे | बोल | बोला | बोलू नकोस | बोलू नका |
| | म्हणणे | म्हण | म्हणा | म्हणू नकोस | म्हणू नका |
| | ठेवणे | ठेव | ठेवा | ठेवू नकोस | ठेवू नका |
| | घालणे | घाल | घाला | घालू नकोस | घालू नका |
| | चालणे | चाल | चाला | चालू नकोस | चालू नका |
| | पाठवणे | पाठव | पाठवा | पाठवू नकोस | पाठवू नका |
| | दाखवणे | दाखव | दाखवा | दाखवू नकोस | दाखवू नका |
| | चालवणे | चालव | चालवा | चालवू नकोस | चालवू नका |
| | विचारणे | विचार | विचारा | विचारू नकोस | विचारू नका |
| | शिकवणे | शिकव | शिकवा | शिकवू नकोस | शिकवू नका |
| | सुचवणे | सुचव | सुचवा | सुचवू नकोस | सुचवू नका |
| | बोलवणे | बोलव | बोलवा | बोलवू नकोस | बोलवू नका |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अकारान्त धातू | उठणे | ऊठ | उठा | उठू नकोस | उठू नका |
| | सुटणे | सूट | सुटा | सुटू नकोस | सुटू नका |
| | लुटणे | लूट | लुटा | लुटू नकोस | लुटू नका |
| | पुसणे | पूस | पुसा | पुसू नकोस | पुसू नका |
| | घुसणे | घूस | घुसा | घुसू नकोस | घुसू नका |
| | शिवणे | शीव | शिवा | शिवू नकोस | शिवू नका |
| | फिरणे | फीर | फिरा | फिरू नकोस | फिरू नका |
| | शिकणे | शीक | शिका | शिकू नकोस | शिकू नका |
| | विकणे | वीक | विका | विकू नकोस | विकू नका |
| | दिसणे | दीस | दिसा | दिसू नकोस | दिसू नका |
| | निघणे | नीघ | निघा | निघू नकोस | निघू नका |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आकारान्त धातू | खाणे | खा | खा | खाऊ नकोस | खाऊ नका |
| | जाणे | जा | जा | जाऊ नकोस | जाऊ नका |
| | गाणे | गा | गा | गाऊ नकोस | गाऊ नका |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| इकारान्त क्रियापदे | पिणे | पी | प्या | पिऊ नकोस | पिऊ नका |
| | भिणे | भी | भ्या | भिऊ नकोस | भिऊ नका |
| | लिहिणे | लिही | लिहा | लिहू नकोस | लिहू नका |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उकारान्त क्रियापदे | धुणे | धू | धुवा | धुऊ नकोस | धुऊ नका |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| एकारान्त धातू | घेणे | घे | घ्या | घेऊ नकोस | घेऊ नका |
| | नेणे | ने | न्या | नेऊ नकोस | नेऊ नका |
| | देणे | दे | द्या | देऊ नकोस | देऊ नका |
| | येणे | ये | या | येऊ नकोस | येऊ नका |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ओकारान्त धातू | होणे | हो | व्हा | होऊ नकोस | होऊ नका |

८. १) आण २) उचल ३) आणा ४) लावा ५) सांग.

९. २) क ३) ज ४) झ ५) न ६) ग, प ७) घ, त ८) थ ९) छ, ध १०) ख, च.

१०. २) लिहा ३) भरा ४) ऐका ५) करा ६) उघडा ७) राखा ८) करू नका

११. ३) कपडे व्यवस्थित शीव. ४) खूप शीक. ५) महाग विकू नकोस. ६) लवकर निघा. ७) काळोखात फिरू नका.

१२. २) बोलावता ३) ऐकतेस ४) लिहिता ५) पाठवतेस ६) चालवता ७) देता / देतेस ८) बसता ९) समजावतोस १०) उठतेस

१३.

| क्रियापद | तू | तुम्ही |
|---|---|---|
| ऐकणे | ऐकतोस का ? | ऐकता का ? |
| | ऐकतेस का ? | |
| बोलणे | बोलतोस का ? | बोलता का ? |
| | बोलतेस का ? | |
| पाठवणे | पाठवतोस का ? | पाठवता का ? |
| | पाठवतेस का ? | |
| दाखवणे | दाखवतोस का ? | दाखवता का ? |
| | दाखवतेस का ? | |
| ठेवणे | ठेवतोस का ? | ठेवता का ? |
| | ठेवतेस का ? | |
| चालवणे | चालवतोस का ? | चालवता का ? |
| | चालवतेस का ? | |
| बसणे | बसतोस का ? | बसता का ? |
| | बसतेस का ? | |
| बोलावणे | बोलावतोस का ? | बोलावता का ? |
| | बोलावतेस का ? | |

१४. १-ख, घ, छ, २-क ३-ख, घ, छ, ४-ख, छ, ५-ग, ६-च

## पाठ ९



१. २) साक्षातची छत्री, केटची छत्री, जुईची छत्री
३) विशालचे बूट, अपर्णाचे बूट, आस्थाचे बूट
४) सायलीचा कॅमेरा, जुलियाचा कॅमेरा, यशचा कॅमेरा
५) सोहमच्या सायकली, जॉयच्या सायकली, डेविडच्या सायकली
६) युसुफचे मांजर, निधीचे मांजर, स्वप्नाचे मांजर
७) अभिषेकची पुस्तके, रिझवानाची पुस्तके, गौरीची पुस्तके

२. २) तानियाचे ३) केदारची ४) वैशालीचा ५) समीर आणि तृप्तीचे फोटो ६) मेहेरची ७) अशोकच्या ८) सलमानची

३. १) रंजन अरुंधतीचा भाऊ आहे.
२) शीला सतीशची बायको आहे.
३) सोनाली विशाखाची मैत्रीण आहे.
४) करुणा करणची बहीण आहे.
५) कुसुम नितीनची आई आहे.
६) सुमित आणि वर्षा सुनिधीची मुलं आहेत.
७) लता सुनीलची काकी आहे.
८) सुरेश शोभाचा काका आहे.
९) प्रतीक अरविंदचा मामा आहे.
१०) रवी सर्वेशचा भाऊ आहे.
११) सीमा आणि मयंक मिहीरची भावंडं आहेत.
१२) राजेंद्र आणि प्रसाद सुशांतचे मामा आहेत.
१३) संजीवनी आणि मेघा चैतालीच्या मावश्या आहेत.

४. १) पूजा २) अमित ३) दिनेश ४) हेमंत ५) निखिल ६) कोमल ७) रुचिता
२) हा अमितचा फोन आहे.
३) हे दिनेशचं घड्याळ आहे.
४) ही हेमंतची पेनं आहेत.
५) या निखिलच्या बाटल्या आहेत.
६) ही कोमलची चावी आहे.
७) हे रुचिताचा चश्मा आहेत.

५. १) माझे / माझं २) माझी ३) माझा ४) माझे

६. १) हे माझे बाबा आहेत. यांचं वय ५४ वर्षं आहे. / हे ५४ वर्षांचे आहेत. हे व्यावसायिक आहेत.
२) ही माझी आजी. हिचं वय ८० वर्षं आहे. / ही ८० वर्षांची आहे. ही गृहिणी आहे.
३) ही माझी ताई. हिचं वय २४ वर्षं आहे. / ही २४ वर्षांची आहे. ही विद्यार्थिनी आहे.
४) हा माझा भाऊ. याचं वय २० वर्षं आहे. / हा २० वर्षांचा आहे. हा विद्यार्थी आहे.

७. १) आजोबा २) आत्या ३) मामा ४) वहिनी ५) आई ६) आजी ७) काका ८) मावशी

८.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मी | माझी | आई | माझा / माझे | मामा |
| मी | माझा | भाऊ | माझी / माझ्या | आजी |
| तू | तुझे / तुझा | बाबा | तुझी | बहीण |
| तू | तुझी | काकी / काकू | तुझी | मामी |
| ते | त्यांचे / त्यांचा | काका | त्यांचे | आजोबा |
| त्या | त्यांची | मुले | त्यांच्या | बहिणी |
| आम्ही | आमची / आमच्या | आजी | आमची / आमच्या | आत्या |
| आपण | आपली | मावशी | आपला / आपले | मामा |
| तो | त्याची | आई | त्याचे / त्याचा | बाबा |

९. २) त्याचा / त्यांचा ३) तिचा ४) तुमचं ५) आपला ६) तुमची ७) तुझं ८) आपला ९) आमचं १०) त्यांचा
११) तुमची १२) तुमची १३) तुझी १४) तिचे १५) माझा

१०. १) त्याचं २) माझी ३) त्याचा ४) त्यांची ६) तुझा ७) तुमचा

११. **अ.**

शशिकांत पाटील - सोनालीचे आजोबा,
रवींद्र पाटील - सोनालीचा मामा,
वैशाली पाटील - सोनालीची मामी,
मनीषा जाधव - सोनालीची आई,
आशुतोष जाधव - सोनालीचा भाऊ,
शशांक माने - सोनालीचा नवरा,
राज - सोनालीचा मुलगा,
नम्रता - सोनालीची मुलगी

**आ.**

| | |
|---|---|
| शशिकांत पाटील | तिचे आजोबा |
| सुजाता पाटील | तिची आजी |
| वैशाली पाटील | तिची मामी |
| रवींद्र पाटील | तिचा मामा |
| मनीषा जाधव | तिची आई |
| प्रकाश जाधव | तिचे बाबा |
| आशुतोष जाधव | तिचा भाऊ |
| **सोनाली माने** | |
| शशांक माने | तिचा नवरा |
| राज | तिचा मुलगा |
| नम्रता | तिची मुलगी |

१३.

| | कोण | काय |
|---|---|---|
| १) अपर्णा दर शनिवारी एक सिनेमा पाहते. | अपर्णा | सिनेमा |
| २) सुरेश अभ्यास करतोय. | सुरेश | अभ्यास |
| ३) डिसेंबरमध्ये पुण्यात खूप थंडी असते. | ------ | थंडी |
| ४) चिन्मय चहा करतोय. | चिन्मय | चहा |
| ५) मुलं किती मनसोक्त फुटबॉल खेळतायत! | मुलं | फुटबॉल |

१४. २) राहुल औषध घेतो.
३) परिणीता सामान भरते.
४) महेश चित्रपट पाहतो.
५) बाळ चॉकलेट खातं.

१५. १) शेत २) कपडे ३) मासे ४) लेख ५) चप्पल

१६. **हळू** - गोगलगाय, कासव, हातगाडी **जलद** - वीज, विमान, ससा

१७. १) आम्ही क्वचित फास्टफूड खातो.
२) उन्हाळ्यात भरपूर पाणी प्यावे.
३) आई अनेकदा सांगते, ''फास्टफूड खाऊ नका''.
५) घाटात गाडी हळू चालवावी.
६) पटकन आवर आणि चल. / आवर आणि पटकन चल.
७) अरे, ती काचेची वस्तु आहे. ती सावकाश ठेव.

१८. १) एकशे पाच २) दोनशे बावीस ३) तिनशे सेहेचाळीस ४) चारशे चौदा ५) पाचशे तेहतीस ७) सातशे सत्त्याऐंशी
८) आठशे अडुसष्ट ९) नऊशे शहाण्णव १०) एकहजार एक

१९. १) ११० २) २४७ ३) ३१७ ५) ५२५ ६) ६५१ ७) ७७० ८) ८७८ ९) ९९९ १०) १००९

२०. २) पाचशे दहा रुपये. ३) एकशे पन्नास रुपये. ४) एकहजार बारा रुपये. ५) पाचशे सहा रुपये.

## पाठ १०



१. १) बागकाम २) चित्र ३) नाच ४) यायला ५) होडी

२. २) फुटबॉल खेळणे - फुटबॉल खेळायला आवडते.
३) कविता करणे - कविता करायला आवडते.
४) गाणी ऐकणे - गाणी ऐकायला आवडते.
५) गाडी चालवणे - गाडी चालवायला आवडते.
६) टी.व्ही. बघणे - टी.व्ही. बघायला आवडते.

३. २) मला नाटक / सिनेमा बघायला आवडतं.
३) मला गायला आवडतं.
४) मला चित्र काढायला आवडतं.
५) मला बागकाम करायला आवडतं.
६) मला फिरायला आवडतं.
७) मला चित्र रंगवायला आवडतं.
८) मला कविता करायला आवडतं.
९) मला वाचन करायला आवडतं.
१०) मला गाणी ऐकायला आवडतं.
११) मला खेळायला आवडतं.
१२) मला पत्र लिहायला आवडतं.
१३) मला गप्पा मारायला आवडतं.
१४) मला स्वयंपाक करायला आवडतं.
१५) मला सायकल चालवायला आवडतं.

४. १) बनवायला २) बघायला ३) खेळायला ४) चालवायला

५.

| | | | |
|---|---|---|---|
| वाचणे | वाचायला | पिणे | प्यायला |
| लिहिणे | लिहायला | करणे | करायला |
| खेळणे | खेळायला | वाजवणे | वाजवायला |
| गाणे | गायला | खाणे | खायला |
| देणे | द्यायला | सांगणे | सांगायला |
| बोलणे | बोलायला | ऐकणे | ऐकायला |

६. २) सौ. कोकीळ कागद होडी बनवायला वापरतात.
३) सौ. कोकीळ हेअरपिन दार उघडायला वापरतात.
४) सौ. कोकीळ मोबाइल फोटो काढायला वापरतात.
५) सौ. कोकीळ चमचा खिळा घट्ट करायला वापरतात.
६) (अनेक उत्तरे शक्य)

७. २) - घ ३) - झ ४) - ख ५) - ग / ट ६) - ग / ट ७) - क ८) - ज ९) - च

८. २) आवडत नाही / वेळ नसतो.
३) बागकाम करायला आवडते.
४) मला हल्ली घर आवरायला वेळ नसतो.
५) तुला नेहमी झोपायला आवडते.
६) आम्हाला आता खेळायला वेळ नाही.
७) तिला कधीतरी पुस्तके वाचायला आवडतात. (अनेक उत्तरे शक्य)

९. **अ.**

| | | |
|---|---|---|
| ती जाहिरात | ते ठिकाण | ते भाडे |
| ते घर | तो संपर्क | ती जागा |
| ते स्टेशन | तो ताबा | तो फ्लॅट |

२) स्टेशन  ३) फ्लॅट  ४) भाडे  ५) संपर्क

**आ.**

| | मुख्य ठिकाण | क्षेत्रफळ/एरिया | संपर्क |
|---|---|---|---|
| जाहिरात १ | नालासोपारा | १ रुमकिचन | ९६१९३९३७५४ |
| जाहिरात २ | डोंबिवली | १ बीएचके | ९८२१६८१७१९ |
| जाहिरात ३ | कांदिवली | १ बीएचके | ९८२०२९२३८१ |
| जाहिरात ४ | बदलापूर | २ बीएचके | ९८२१८१८८८२ |

अ-३, ब-१, क-२, ड-४

१०. ३) मला जरा मोबाइल देतोस? का रे, फोन करायचाय? नाही, मला एस.एम.एस करायचाय.
४) मला जरा इस्त्री देतेस? का गं, इस्त्री करायचीये? नाही, मला केस सरळ करायचेत.
२) मला जरा चमचा देतेस? का गं, औषध प्यायचंय? नाही, मला स्क्रू घट्ट करायचाय.
५) मला जरा कागद देतोस? का रे, काही लिहायचंय? नाही, मला होडी बनवायचीये.

११. २) कुठे काय, वर तर पतंग आहे.
३) कुठे काय, पुढे तर गाढव आहे.
४) कुठे काय, मागे तर कचऱ्याचा डबा आहे.
५) कुठे काय, ऑफिस जवळ तर पोस्ट ऑफिस आहे.
६) कुठे काय, तिथे लांब तर डोंगर आहे.

१२. २) नाही, मला आईस्क्रीम खायचंय.
३) नाही, मला झोपायचंय.
४) नाही, मला मॅच बघायचीये.
५) नाही, मला अभ्यास करायचाय.

१३. १) ग  २) घ  ३) क  ४) च  ५) ख  ६) छ

| शब्दसंग्रह दृष्टिक्षेप | Glossary Overview | शब्दसूची दृष्टिक्षेप |
|---|---|---|
| मराठी | English | हिन्दी |
| इंटरनॅशनल फोनेटिक स्क्रिप्ट | International Phonetic Alphabet (IPA) | इंटरनॅशनल फोनेटिक स्क्रिप्ट |
| एकवचन / अनेकवचन | Singular/Plural | एकवचन / बहुवचन |
| पुल्लिंग तो / ते | Masculine 'he' / 'they' | पुल्लिंग वह / वे |
| स्त्रीलिंग ती / त्या | Feminine 'she' / 'they' | स्त्रीलिंग वह / वे |
| नपुंसकलिंग ते / ती | Neutral 'it'/ 'they' | - |

## शब्दसंग्रह | GLOSSARY

### पाठ विभाजन | Chapter Divisions

| | | |
|---|---|---|
| 1 | चला, शिकू या<br>t̪səla, ʃiku: ja | Let's learn.<br>चलो, सीखें। |
| 2 | संवाद<br>səmʋad̪ | Conversation<br>संवाद |
| 3 | सराव<br>sərau | Practice<br>अभ्यास |
| 4 | व्याकरण<br>ʋjakrəɳ | Grammar<br>व्याकरण |
| 5 | शब्दसंपदा<br>ʃəbd̪əsəmpəd̪a | Vocabulary<br>शब्द सम्पदा |
| 6 | करा आणि शिका<br>kəra aɳi ʃika | Do and learn.<br>करें और सीखें। |
| 7 | दृष्टिक्षेप<br>d̪rʂʈikʂep | Overview<br>विवरण |
| 8 | आता मला हे येतं<br>at̪a məla he jet̪ə | Now I know this. / Now I can do this.<br>अब मुझे यह आता है। |
| 9 | उत्तम<br>ut̪t̪əm | Excellent<br>बढ़िया / उत्तम |
| 10 | चांगलं<br>t̪sanglə | Good<br>अच्छा |
| 11 | जेमतेम<br>ʤemt̪em | So so<br>ठीक |
| 12 | फारच कमी<br>pʰarət̪s kəmi: | Very little<br>बहुत कम |

## पाठ १ | CHAPTER 1

| क्र./No. | शब्द/वाक्य / Word/Sentence | अर्थ / Meaning | उदाहरण / Example |
|---|---|---|---|
| 1. | ती ओळख<br>त्या ओळखी<br>t̪i: oɭəkʰ<br>t̪ja oɭkʰi: | acquaintance / introduction<br>जान पहचान | |
| 2. | अभिवादन करणे<br>əbʰiʋad̪ən kərɳe | to greet<br>अभिवादन करना | |
| 3. | आपले नाव-गाव आणि व्यवसाय सांगणे व इतरांना त्याबद्दल विचारणे<br>aple naʋ-gaʋ aɳi ʋjəʋəsaj saŋgɳe ʋə it̪əranna t̪jabəd̪d̪əl ʋiʧarɳe | to introduce oneself (name, place and profession)<br>अपना परिचय देना (नाम, काम, ठिकाना) | |
| 4. | आवडता रंग सांगणे<br>aʋəd̪ta rəŋgə saŋgɳe | to tell ones favourite color<br>पसंदीदा रंग बताना | |
| 5. | मराठी वर्णमाला वाचणे व लिहिणे<br>məraʈʰi: ʋərɳəmala ʋat̪sɳe ʋə lihiɳe | to read and write Marathi alphabet.<br>मराठी वर्णमाला पढ़ना और लिखना | |
| 6. | सोपे मराठी शब्द आणि वाक्ये वाचणे आणि लिहिणे.<br>sope məraʈʰi: ʃəbd̪ə<br>aɳi ʋakje ʋat̪sɳe aɳi lihiɳe. | to read and write simple Marathi words and sentences<br>सरल मराठी शब्द और वाक्य पढ़ना और लिखना | |
| 7. | प्रश्नशब्द - काय, कोणता, कुठे<br>prəʃnəʃəbd̪ə - kaj, koɳta, kuʈʰe | interrogatives : what, which, where<br>प्रश्नसूचक शब्द : क्या, कौनसा, कहाँ | |
| 8. | चला, आपण एकमेकांची ओळख करून घेऊ या.<br>t̪səla, apəɳ ekmekaɲʧi:<br>oɭəkʰ kəru:n gʰeu:ja | Come, let's get to know each other.<br>चलो, एक दूसरे से परिचय करें। | |
| 9. | तो नमस्कार<br>t̪o nəməskar | Hello ! / Welcome ! / Greetings !<br>नमस्कार / नमस्ते ! | |
| 10. | माझं / माझे<br>mad̪ʒʰə / mad̪ʒʰe | my<br>मेरा | माझं नाव नेहा जोशी आहे.<br>My name is Neha Joshi.<br>मेरा नाम नेहा जोशी है। |
| 11. | आपलं / आपले<br>aplə / aple | your (formal)<br>आपका | आपलं नाव काय ?<br>What is your name?<br>आपका नाम क्या है ? |
| 12. | ते नाव<br>ती नावे<br>t̪e naʋ<br>t̪i: naʋe | name<br>नाम | माझं नाव दीपक (आहे).<br>My name is Deepak.<br>मेरा नाम दीपक है। |
| 13. | काय<br>kaj | what<br>क्या | हे काय आहे ?<br>What is this?<br>यह क्या है ? |

पाठ १

| | | | |
|---|---|---|---|
| 14. | मी<br>mi: | I<br>मैं | मी शिक्षक आहे.<br>I am a teacher.<br>मैं शिक्षक हूँ। |
| 15. | अच्छा<br>əʧʧʰa | okay / alright<br>अच्छा | अच्छा, सोमवारी भेटू.<br>Alright, see you on Monday.<br>अच्छा, सोमवार को मिलते हैं। |
| 16. | तो शिक्षक<br>ते शिक्षक<br>t̪o ʃikṣək<br>t̪e ʃikṣək | (male) teacher<br>शिक्षक / अध्यापक | डॉ. जोन्स शिक्षक आहेत.<br>Dr. Jones is a teacher.<br>डॉ. जोन्स शिक्षक हैं। |
| 17. | ती शिक्षिका<br>त्या शिक्षिका<br>t̪i: ʃikṣika<br>t̪ja ʃikṣika | (female) teacher<br>शिक्षिका | चतुरा शिक्षिका आहे.<br>Chatura is a (female) teacher.<br>चतुरा शिक्षिका है। |
| 18. | बरंय<br>bərəj | okay / alright<br>अच्छा | बरंय, मी आता निघतो.<br>Alright, I will take your leave now.<br>अच्छा, अब मैं चलता हूँ। |
| 19. | उद्या भेटू<br>ud̪ja bʰet̪u: | - | See you tomorrow.<br>कल मिलते हैं। |
| 20. | टाटा<br>t̪at̪a | - | Bye<br>टाटा ! |
| 21. | ती लेखिका<br>त्या लेखिका<br>t̪i: lekʰika<br>t̪ja lekʰika | (woman) writer<br>लेखिका | जेन ऑस्टिन लेखिका आहे.<br>Jane Austen is a writer.<br>जेन ऑस्टिन लेखिका है। |
| 22. | आपणच<br>apəṇəts | you / yourself<br>आप ही | आपणच का माधुरी पुरंदरे ?<br>Are you Madhuri Purandare ?<br>क्या आप ही माधुरी पुरंदरे हैं ? |
| 23. | लहान मुलांसाठीची<br>ləhan mulansat̪ʰi:ʧi: | meant for children<br>छोटे बच्चों की | लहान मुलांसाठीची पुस्तके सोपी असतात.<br>Books for children are simple.<br>छोटे बच्चों की किताबें आसान होती हैं । |
| 24. | ते पुस्तक<br>ती पुस्तके<br>t̪e pust̪ək<br>t̪i: pust̪əke | book<br>किताब | ते पुस्तक आहे.<br>That is a book.<br>वह किताब है। |
| 25. | वाचली आहेत (वाचणे)<br>ʋat̪sli: ahet̪ (ʋat̪sṇe) | to read<br>पढ़ना | मी ही पुस्तके वाचली आहेत.<br>I have read these books.<br>मैंने ये किताबें पढ़ी हैं। |
| 26. | मला<br>məla | to me / me<br>मुझे | मला आपली पुस्तकं आवडतात.<br>Your books appeal to me.<br>मुझे आपकी किताबें अच्छी लगती हैं। |
| 27. | आपली<br>apli: | your<br>आपकी | |
| 28. | आवडतात (आवडणे)<br>aʋəd̪t̪at̪ | to like<br>अच्छा लगना | मला पुस्तके आवडतात.<br>I like books.<br>मुझे किताबें अच्छी लगती हैं। |
| 29. | धन्यवाद<br>dʰənjəʋad̪ | - | Thank you !<br>धन्यवाद ! / शुक्रिया ! |

| | | | |
|---|---|---|---|
| 30. | उत्तरे देऊ या.<br>uttəre deu: ja | - | Let's answer.<br>उत्तर दें। |
| 31. | आणि<br>aɳi | and<br>और | मेरी आणि मोनिका डॉक्टर आहेत.<br>Mary and Monica are doctors.<br>मेरी और मोनिका डॉक्टर हैं। |
| 32. | आपण<br>apəɳ | you (formal)<br>आप | आपण काय करता ?<br>What do you do?<br>आप क्या करतें हैं। |
| 33. | करता (करणे)<br>kərta (kərɳe) | to do<br>करना | तुम्ही काय करता ?<br>What do you do?<br>आप क्या करते हैं ? |
| 34. | तुम्ही<br>tumʰi: | you<br>आप | तुम्ही कुठले ?<br>Where are you from?<br>आप कहाँ से हैं ? |
| 35. | तो विद्यार्थी<br>ते विद्यार्थी<br>to ʋidjartʰi:<br>te ʋidjartʰi: | student<br>विद्यार्थी | माधव विद्यार्थी आहे.<br>Madhav is a student.<br>माधव विद्यार्थी है। |
| 36. | प्रश्न विचारू या.<br>prəʃnə ʋitʃaru: ja | - | Let's ask questions.<br>प्रश्न पूछें। |
| 37. | रिकाम्या जागी पुढीलपैकी योग्य शब्द लिहू या.<br>rikamja dʒagi pudʰilpəiki jogjə ʃəbdə lihu: ja | - | Fill in the blanks with appropriate words.<br>नीचे दिए गए शब्दों से रिक्त स्थानों कीं पूर्ति करें। |
| 38. | ते अभिवादन<br>ती अभिवादने<br>te əbʰiʋadən<br>ti: əbʰiʋadəne | greeting<br>अभिवादन | 'नमस्कार' हे अभिवादन आहे.<br>'Namaskar' is a greeting.<br>'नमस्कार' यह अभिवादन है। |
| 39. | तो प्रश्न<br>ते प्रश्न<br>to prəʃnə<br>te prəʃnə | question<br>प्रश्न | हा प्रश्न कठीण आहे.<br>This question is difficult.<br>यह प्रश्न कठिन है। |
| 40. | ते उत्तर<br>ती उत्तरे<br>te uttər<br>ti: uttəre | answer, reply<br>उत्तर | राम उत्तर देतो.<br>Ram replies.<br>राम उत्तर देता है। |
| 41. | निरोप घेणे<br>nirop gʰeɳe | to bid farewell<br>विदा लेना | आता मी निरोप घेतो.<br>I take your leave now.<br>अब मैं निकलता हूँ। |
| 42. | ऐकू या आणि वाचू या.<br>əiku: ja aɳi ʋatsu: ja | - | Let's listen and read.<br>सुनें और पढ़ें। |
| 43. | तो स्वर<br>ते स्वर<br>to sʋər<br>te sʋər | vowel<br>स्वर | मराठीत १४ स्वर आहेत.<br>There are 14 vowels in Marathi.<br>मराठी में १४ स्वर हैं। |

| | | | |
|---|---|---|---|
| 44. | तो स्वरादी<br>ते स्वरादी<br>ṯo sʋəraḏi:<br>ṯe sʋəraḏi: | post-vowel<br>स्वरादी | मराठीत २ स्वरादी आहेत.<br>There are 2 post-vowels in Marathi.<br>मराठी में २ स्वरादि हैं। |
| 45. | खालील अक्षरे योग्य क्रमात लावू या.<br>kʰalil əkṣəre jogjə krəmaṯ laʋu: ja. | - | Let's arrange the following alphabets in an appropriate order.<br>नीचे दिए गए अक्षरों को योग्य क्रम में लगाएँ। |
| 46. | रिकाम्या जागी योग्य स्वर व स्वरादी लिहू या.<br>rikamja ḏʒagi jogjə sʋər ʋə sʋəraḏi: lihu: ja. | - | Fill in the blanks with appropriate vowels and post-vowels.<br>योग्य स्वरों और स्वरादियों से रिक्त स्थानों कीं पूर्ति करें। |
| 47. | नाव<br>naʋ | [12] | -- |
| 48. | काय<br>kaj | [13] | -- |
| 49. | आहे (असणे)<br>ahe (əsṉe) | to be<br>होना | मी हुशार आहे.<br>I am intelligent.<br>मैं होशियार हूँ। |
| 50. | विद्यार्थी<br>ʋiḏjarṯʰi: | [35] | -- |
| 51. | आणि<br>aṉi | [31] | -- |
| 52. | इथे / इकडे<br>iṯʰe / ikḏe | here<br>यहाँ | इथे बस.<br>Sit here.<br>यहाँ बैठ। |
| 53. | शिकतो (m) /<br>शिकते (f)<br>(शिकणे)<br>ʃikṯo (m) / ʃikṯe (f) (ʃikṉe) | to learn<br>सीख़ना | मी मराठी शिकतो / शिकते.<br>I learn Marathi.<br>मैं मराठी सीख़ता / सीख़ती हूँ। |
| 54. | अहो, तुम्ही आशा देशपांडे ना ?<br>əho, ṯumʰi: aʃa ḏeʃpanḏe na? | - | Excuse me, aren't you Asha Deshpande?<br>क्षमा करें / जरा सुनिए, क्या आप ही आशा देशपांडे हैं ? |
| 55. | मराठी विभागात<br>məraṯʰi: ʋibʰagaṯ | in the Department of Marathi<br>मराठी विभाग में | मराठी विभागात बरेच विद्यार्थी आहेत.<br>There are many students in the Department of Marathi.<br>मराठी विभाग में बहुत विद्यार्थी हैं। |
| 56. | ती प्राध्यापिका<br>त्या प्राध्यापिका<br>ṯi: pradʰjapika<br>ṯja pradʰjapika | professor (female)<br>प्राध्यापिका | आशा देशपांडे प्राध्यापिका आहेत.<br>Asha Deshpande is a Professor.<br>आशा देशपांडे प्राध्यापिका हैं। |
| 57. | उदाहरण पाहू या आणि शब्द पूर्ण करू या.<br>uḏahərəṉ pahu: ja aṉi ʃəbḏə pu:rṉə kəru: ja. | - | Let's look at the examples and complete the words.<br>उदाहरण देखें और शब्द पूर्ण करें। |
| 58. | मोठ्याने वाचू या आणि लिहू या.<br>moṯʰjane ʋaṯsu: ja aṉi lihu: ja. | - | Let's read aloud and write.<br>जोर से पढ़ें और लिखें। |

| | | | |
|---|---|---|---|
| 59. | अजब<br>ədʒəb | strange, wonderful, surprising<br>अजीब, अनोखा | तू अजबच आहेस.<br>You are so strange.<br>तू अजीब ही है। |
| 60. | तो खण<br>ते खण<br>t̪o kʰəɳ<br>t̪e kʰəɳ | drawer<br>ख़ाना | टेबलाचा खण उघड.<br>Open the drawer of the table.<br>टेबल का ख़ाना खोलो। |
| 61. | झटपट<br>dʒʰət̪pət̪ | quickly, fast<br>जल्दी | जरा झटपट काम कर.<br>Please work quickly.<br>ज़रा जल्दी काम कर। |
| 62. | थरथर<br>t̪ʰərt̪ʰər | shiver on account of fear<br>थरथरना / डर से काँपना | तो भीतीने थरथर कापतो.<br>He shivers because of fear.<br>वह डर से थर थर काँपता है। |
| 63. | ते गवत<br>t̪e gəʋət̪ | grass, hay<br>घास | ते गवत हिरवे आहे.<br>That grass is green.<br>वह घास हरी है। |
| 64. | तो तज्ज्ञ<br>ते तज्ज्ञ<br>t̪o t̪əd̪njə<br>t̪e t̪əd̪njə | expert<br>विशेषज्ञ | तो भाषेचा तज्ज्ञ आहे.<br>He is a language expert.<br>वह भाषा विशेषज्ञ है। |
| 65. | तो कप<br>ते कप<br>t̪o kəp<br>t̪e kəp | cup<br>कप | हा कप काचेचा आहे.<br>This cup is made of glass.<br>यह कप काँच का है। |
| 66. | ते छत<br>ती छते<br>t̪e tʃʰət̪<br>t̪i: tʃʰət̪e | roof<br>छत | हे छत उंच आहे.<br>This roof is high.<br>यह छत उँची है। |
| 67. | तो ढग<br>ते ढग<br>t̪o ɖʰəg<br>t̪e ɖʰəg | cloud<br>बादल | तो पाहा, काळा ढग.<br>Look, a black cloud !<br>वह देखो, काला बादल। |
| 68. | नमन<br>nəmən | to bow with devotion / respect<br>नमन | राम देवाला नमन करतो.<br>Ram bows before God.<br>राम भगवान का नमन करता है। |
| 69. | लवकर<br>ləʋkər | early, fast<br>जल्दी | मी लवकर उठतो.<br>I get up early.<br>मैं जल्दी उठता हूँ। |
| 70. | ते बदक<br>ती बदके<br>t̪e bəd̪ək<br>t̪i: bəd̪ke | duck<br>बतख | एक बदक पोहते.<br>A duck swims.<br>एक बतख तैरती है। |
| 71. | ऐकू या आणि भरू या.<br>əiku: ja aɳi bʰəru: ja. | - | Listen and fill up.<br>सुनें और पूर्ति करें। |
| 72. | तो मका<br>t̪o məka | maize<br>मकई | मका हे धान्य आहे.<br>Maize is a crop.<br>मक्का एक तरह का अनाज है। |

पाठ ९

| | | | |
|---|---|---|---|
| 73. | तुझा<br>t̪udʒʰa | your<br>तुम्हारा | मी तुझा मामा.<br>I am your maternal uncle.<br>मैं तुम्हारा मामा हूँ। |
| 74. | मामा<br>mama | uncle (maternal)<br>मामा | |
| 75. | दे (देणे)<br>d̪e (d̪eɳe) | to give<br>देना | मला पाणी दे/द्या.<br>Give me water.<br>मुझे पानी दो। |
| 76. | मुका<br>muka | kiss<br>चुंबन | मला मुका दे.<br>Kiss me.<br>मुझे चूम। |
| 77. | तो पतंग<br>ते पतंग<br>t̪o pət̪əngə<br>t̪e pət̪əngə | kite<br>पतंग | संक्रांतीला पतंग उडवतात.<br>Kites are flown on Sankranti.<br>संक्रान्ति के दिन पतंग उडाते है। |
| 78. | ते आभाळ<br>t̪e abʰaɭ | sky<br>आकाश | आभाळ निळे असते.<br>The sky is blue.<br>आकाश नीला है। |
| 79. | उडे (उडणे)<br>uɖe (uɖɳe) | to fly<br>उड़ना | माशी उडते.<br>The fly flies.<br>मक्खी उड़ती है। |
| 80. | ढगात<br>dʰəgat̪ | in the clouds<br>बादलों में | ढगात चांदोमामा दडे.<br>The moon hides in the clouds.<br>बादलों में चन्दामामा छिपता है। |
| 81. | तो चांदोमामा<br>(तो चंद्र)<br>t̪o t̪sand̪omama<br>(t̪o ʧənd̪rə) | the moon (a fond reference in nursery rhymes or children's poems)<br>चन्दामामा, चाँद | चांदोमामा पाहून बाळ हसले.<br>The child smiled looking at the moon in the sky.<br>चन्दामामा को देख, वह बालक हसाँ। |
| 82. | दडे (दडणे)<br>d̪əɖe (d̪əɖɳe) | to hide<br>छुपना | हत्तीच्या मागे हरिण दडले आहे.<br>The deer is hidden behind the elephant.<br>हाथी के पीछे हिरण छिपा है। |
| 83. | ते घड्याळ<br>ती घड्याळे<br>t̪e gʰədjaɭ<br>t̪i: gʰədjaɭe | watch, clock<br>घडी | भिंतीवर एक घड्याळ आहे.<br>There is a clock on the wall.<br>दीवार पर एक घड़ी है। |
| 84. | तो थवा<br>ते थवे<br>t̪o t̪ʰəʋa<br>t̪e t̪ʰəʋe | flock<br>झुंड | आकाशात पक्ष्यांचा थवा उडत आहे.<br>A flock of birds is flying in the sky.<br>आसमान में पंछियों का झुंड उड़ रहा है। |
| 85. | ती हम्मा<br>त्या हम्मा<br>(ती गाय, त्या गाई)<br>t̪i həmma<br>t̪ja həmma<br>(t̪i: gaj, t̪ja gai:) | cow - a typical word used in nursery rhymes in Marathi to refer to a cow)<br>गाय | हम्मा दूध देते.<br>The cow gives milk.<br>गाय दूध देती है। |

पाठ 9

| | | | |
|---|---|---|---|
| 86. | गोड<br>goḍ | sweet<br>मीठा / मीठी / मीठे | साखर गोड असते.<br>Sugar is sweet.<br>शक्कर मीठी होती है। |
| 87. | ते दूध<br>ती दुधे<br>t̪e d̪u:dʰ / t̪i: d̪udʰe | milk<br>दूध | गाय दूध देते.<br>The cow gives milk.<br>गाय दूध देती है। |
| 88. | देते (देणे)<br>d̪et̪e (d̪eɳe) | [75] | -- |
| 89. | ती चिऊ<br>त्या चिऊ<br>t̪i: ʧiu:<br>t̪ja ʧiu: | sparrow (form used esp. in nursery rhymes or children"s poems)<br>गौरैया | ती चिऊ बघ.<br>Look at that sparrow!<br>वह गौरैया देख। |
| 90. | अंगणात<br>(ते अंगण<br>ती अंगणे)<br>əŋgɳat̪<br>(t̪e əŋgəɳ<br>t̪i: əŋgɳe) | in the courtyard<br>आँगन में | मुले अंगणात खेळत आहेत.<br>Children are playing in the courtyard.<br>बच्चे आँगन में खेल रहे हैं। |
| 91. | येते (येणे)<br>jet̪e (jeɳe) | to come<br>आना | शिक्षिका वर्गात येते.<br>The (female) teacher comes to the class.<br>शिक्षिका कक्षा में आती है। |
| 92. | तो भटजी<br>ते भटजी<br>t̪o bʰəʈʤi:<br>t̪e bʰəʈʤi: | Hindu priest<br>पंडित | भटजी लग्न लावतो.<br>The priest conducts the marriage.<br>पंडित शादी करवाते हैं। |
| 93. | तो ससा<br>ते ससे<br>t̪o səsa<br>t̪e səse | hare, rabbit<br>खरगोश | ससा पांढरा असतो.<br>The hare is white.<br>खरगोश सफेद रंग का होता है। |
| 94. | ते पाणी<br>t̪e paɳi: | water<br>पानी | राम पाणी पितो.<br>Ram drinks water.<br>राम पानी पीता है। |
| 95. | डुले (डुलणे)<br>ḍule (ḍulɳe) | to sway<br>डोलना | कमळ पाण्यावर डुलते.<br>A lotus sways on the water.<br>कमल पानी पर हिलता है। |
| 96. | तुरुतुरु<br>t̪uruʈuru | to run with short & quick steps.<br>छोटे छोटे कदमों से जल्दी जल्दी चलना | कोंबडी तुरुतुरु चालते.<br>A hen runs with short and quick steps.<br>मुर्गी छोटे छोटे कदमों से जल्दी जल्दी चलती है। |
| 97. | ती गाडी<br>त्या गाड्या<br>t̪i: gaḍi:<br>t̪ja gaḍja | a train<br>गाड़ी | ही गाडी दिल्लीला जाते.<br>This train goes to New Delhi.<br>यह गाड़ी दिल्ली जाती है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 98. | झुकझुक<br>dʒʰukdʒʰuk | rhythmic sound of a running train in olden days (mostly used by children)<br>रेलगाडी की छुकछुक | गाडी झुकझुक जाई.<br>The train goes whistling.<br>रेलगाड़ी छुकछुक चलती है। |
| 99. | जाई (जाणे)<br>d̲ʒai: (d̲ʒan̲e) | a poetic form of verb for 'to go'<br>'जाना' इस क्रिया का एक काव्य रूप | |
| 100. | ते बाळ<br>ती बाळे<br>t̲e bal̲<br>t̲i: bal̲e | child<br>बालक, बच्चा | हे बाळ बिंदूचे आहे.<br>This is Bindoo's child.<br>यह बिंदू का बच्चा है। |
| 101. | कसे / कसं<br>kəse / kəsə | how<br>कैसा / कैसे | हे पुस्तक कसे / कसं आहे ?<br>How is this book?<br>यह पुस्तक कैसी है ? |
| 102. | ते गाणे<br>ती गाणी<br>t̲e gan̲e<br>t̲i: gan̲i: | song<br>गाना | हे गाणे छान आहे.<br>This song is good.<br>यह गाना अच्छा है। |
| 103. | गाई (गाणे)<br>gai: (gan̲e) | to sing<br>गाना | बाळ माझे कसे गोड गाणे गाई.<br>How sweetly my child sings !<br>मेरा बच्चा कितना अच्छा गाता है। |
| 104. | करतोस / करतेस (करणे)<br>kərt̲os / kərt̲es (kərn̲e) | [33] | -- |
| 105. | शिकतोय / शिकतेय (शिकणे)<br>ʃikt̲oj / ʃikt̲ej (ʃikn̲e) | [53] | -- |
| 106. | प्रश्न लिहू या.<br>prəʃnə lihu: ja. | - | Let's form questions.<br>प्रश्न लिखें। |
| 107. | तो गुळाचा गणपती<br>t̲o gul̲atsa gən̲pət̲i: | literally: an idol of lord Ganesh made of jaggery. (fig.: a lethargic person doing nothing, a lazy fellow, good for nothing)<br>आलसी गणेश | तो गुळाचा गणपती आहे.<br>He is a lazy person.<br>वह आलसी व्यक्ति / आदमी है। |
| 108. | गप्पा मारतो (मारणे)<br>त्या गप्पा<br>gəppa mart̲o (marn̲e)<br>t̲ja gəppa | to chat<br>गपशप करना | तो खूप गप्पा मारतो.<br>He chats a lot.<br>वह बहुत गपशप करता है। |
| 109. | जेवतो (जेवणे)<br>dʒeʊt̲o (dʒeʊn̲e) | to have a meal<br>खाना खाना, भोजन करना | मी सकाळी १० वाजता जेवतो / जेवते.<br>I have my meal at 10 a.m.<br>मैं सुबह १० बजे खाना खाता / खाती हूँ। |

| | | | |
|---|---|---|---|
| 110. | माश्या मारतो /<br>माश्या मारत बसतो<br>(मारणे, मारत बसणे)<br>ती माशी, त्या माश्या<br>maʃa marto /<br>maʃa marət̪ bəsto<br>(marɳe, marət̪ bəsɳe)<br>t̪i: maʃi:, t̪ja maʃa | to sit idle, sit without any work<br>मक्खी मारना | तो फक्त माश्या मारतो. / तो फक्त माश्या मारत बसतो.<br>He simply sits idle.<br>वह बस बैठा रहता है। |
| 111. | झोपा काढतो<br>(काढणे)<br>ती झोप, त्या झोपा<br>d̪ʒʰopa kaɖʰt̪o<br>(kaɖʰɳe)<br>t̪i: d̪ʒʰop, t̪ja d̪ʒʰopa | literally to sleep for hours together. fig.: to sit idle, to vile away time.<br>नींद निकालना | केव्हाही झोपा काढतो.<br>Don't you feel ashamed to sleep all the time?<br>हमेशा सोते रहने में तुम्हे शर्म नही आती ? |
| 112. | बघतो (बघणे)<br>bəgʰt̪o (bəgʰɳe) | to see, to watch<br>देखना | मी टी.व्ही. बघतो.<br>I watch TV.<br>मैं टी.वी. देखता हूँ। |
| 113. | थोडक्यात<br>t̪ʰoɖkjat̪ | in short/ in brief<br>संक्षेप में | थोडक्यात लिहा.<br>Write briefly.<br>संक्षेप में लिखें। |
| 114. | तू<br>t̪u: | you<br>तू / तुम | तू हुशार आहेस.<br>You are smart.<br>तू होशियार है। |
| 115. | काहीही<br>kahi:hi: | anything<br>कुछ भी | तो काहीही बोलतो.<br>He just says anything.<br>वह कुछ भी बोलता है। |
| 116. | नाहीस (नाही)<br>nahi:s (nahi:) | not<br>नहीं | तू काहीही करत नाहीस.<br>You don't do anything.<br>तुम कुछ नहीं करते. |
| 117. | खायला काळ नि भुईला भार<br>kʰajla kaɭ ni bʰui:la bʰar | - | an idiomatic expression. literally: eating exuberantly & becoming just a burden on the earth. fig.: living idly all day long |
| 118. | आपला / तुमचा / तुझा देश कोणता ?<br>apla / t̪umt̪sa / t̪ud̪ʒʰa deʃ kont̪a | - | Where are you from?<br>आप कहाँ से हैं? |
| 119. | तो देश<br>ते देश<br>t̪o deʃ<br>t̪e deʃ | country<br>देश | भारत माझा देश आहे.<br>India is my country.<br>भारत मेरा देश है। |
| 120. | तो रंग<br>ते रंग<br>t̪o rəŋgə<br>t̪e rəŋgə | colour<br>रंग | तो पांढरा रंग आहे.<br>That is white color.<br>वह सफेद रंग है। |
| 121. | लाल<br>lal | red<br>लाल | मला लाल रंग आवडतो.<br>I like red color.<br>मुझे लाल रंग पसंद है। |

पाठ ९

| | | | |
|---|---|---|---|
| 122. | केशरी<br>keʃri: | saffron<br>केसरी | मला केशरी रंग आवडतो.<br>I like saffron color.<br>मुझे केसरी रंग पसंद है। |
| 123. | निळा<br>niḷa | blue<br>नीला | - |
| 124. | हिरवा<br>hirʋa | green<br>हरा | - |
| 125. | पिवळा<br>piʋḷa | yellow<br>पीला | - |
| 126. | जांभळा<br>ḍʒambʰḷa | purple<br>जामुनी | - |
| 127. | गुलाबी<br>gulabi: | pink<br>गुलाबी | - |
| 128. | पांढरा<br>panḍʰra | white<br>सफेद | - |
| 129. | काळा<br>kaḷa | black<br>काला | - |
| 130. | राखाडी<br>rakʰaḍi: | grey<br>राख रंग | - |
| 131. | तपकिरी<br>ṭəpkiri: | brown<br>भूरा | - |
| 132. | ती भाकर / भाकरी<br>त्या भाकऱ्या<br>ṭi: bʰakər (bʰakri:)<br>ṭja bʰakrja | thick, coarse flatbread<br>भाकरी | मी साधी भाकर खातो.<br>I eat simple 'bhakari'.<br>मैं सादी भाकरी / रोटी खाता हूँ। |
| 133. | तो लाडू<br>ते लाडू<br>ṭo laḍu:<br>ṭe laḍu: | popular sweet balls<br>लड्डू | तुम्ही खा सगळे लाडू.<br>You eat all laddoos (sweets)<br>आप खाएँ सारे लड्डू। |
| 134. | ती पालेभाजी<br>त्या पालेभाज्या<br>ṭi: palebʰadʒi:<br>ṭja palebʰadʒja | leafy vegetable<br>पत्ते वाली सब्जी | मी पालेभाजी खातो.<br>I eat leafy vegetable.<br>मैं पत्ते वाली सब्जी खाता हूँ। |
| 135. | श्रीखंडपुरी<br>ʃri:kʰənḍəpuri: | shrikhand (yoghurt dessert) with puri<br>श्रीखण्ड पूरी | तुम्ही खा श्रीखंडपुरी.<br>You eat shrikhand (yoghurt dessert) with puri.<br>आप श्रीखण्ड पूरी खाइए। |
| 136. | कुस्तीसाठी<br>kusṭi:saṭʰi: | to wrestle<br>कुश्ती के लिए | या आता कुस्तीसाठी.<br>Now let's wrestle.<br>अब आओ कुश्ती लड़ें। |
| 137. | राहता (राहणे)<br>rahṭa (rahṇe) | to live, reside<br>रहना | आपण कुठे राहता ?<br>Where do you live ?<br>आप कहाँ रहते हैं ? |

पाठ ९

पाठ २ | CHAPTER 2

| क्र./No. | शब्द/वाक्य / Word/Sentence | अर्थ / Meaning | उदाहरण / Example |
|---|---|---|---|
| 138. | स्वत:ची मातृभाषा सांगणे आणि इतरांची विचारणे.<br>sʋət̪əhtʃi: mat̪rbʰaʂa saŋgɳe aɳi it̪əraɳtʃi: ʋitʃarɳe | to tell one's mother tongue and ask that of others.<br>अपनी मातृभाषा बताना और दूसरे की पूछना | |
| 139. | स्वत:चे राष्ट्रीयत्व सांगणे आणि इतरांचे विचारणे.<br>sʋət̪əhtse raʂt̪ri:jət̪ʋə saŋgɳe aɳi it̪əraɳtse ʋitʃarɳe | to tell one's nationality and ask that of others.<br>अपना राष्ट्रीयत्व बताना और दूसरे का पूछना | |
| 140. | स्वत:ची खुशाली सांगणे आणि इतरांची विचारणे.<br>sʋət̪əhtʃi: kʰuʃali: saŋgɳe aɳi it̪əraɳtʃi: ʋitʃarɳe | to tell about one's well-being and ask that of others.<br>अपना कुशल-क्षेम बताना और दूसरे का पूछना। | |
| 141. | घरी काय काय करता, हे विचारणे आणि सांगणे.<br>gʰəri: kaj kaj kərt̪a, he ʋitʃarɳe aɳi saŋgɳe | to tell and ask, what one does at home.<br>घर पर क्या क्या करते हैं, यह बताना और पूछना। | |
| 142. | तो महिना<br>ते महिने<br>t̪o məhina<br>t̪e məhine | Month / months<br>महीना / महीने | |
| 143. | मराठी वाक्ये वाचणे.<br>marat̪ʰi: ʋakje ʋat̪sɳe | To read Marathi sentences.<br>मराठी वाक्य पढ़ना। | |
| 144. | प्रश्नशब्द - कोण/कोणती, कसा, कशी, कसे<br>prəʃnəʃəbd̪ə - kont̪i:, koɳ, kəse, kəʃa, kəsa, kəʃi: | Interrogatives: who / which / how<br>प्रश्नसूचक शब्द : कौन/कौनसी, कैसा, कैसी, कैसे | |
| 145. | आपली / तुमची / तुझी मातृभाषा कोणती<br>apli: / t̪umtʃi: / t̪udʒʰi: mat̪rbʰaʂa kont̪i | What is your mother tongue?<br>आपकी / तुम्हारी / तेरी मातृभाषा क्या है? | |
| 146. | माझी<br>madʒʰi: | my<br>मेरी | माझी मातृभाषा हिंदी आहे.<br>Hindi is my mother tongue.<br>हिन्दी मेरी मातृभाषा है। |
| 147. | ती मातृभाषा<br>त्या मातृभाषा<br>t̪i: mat̪rbʰaʂa<br>t̪ja mat̪rbʰaʂa | mother tongue<br>मातृभाषा | माझी मातृभाषा मराठी आहे.<br>Marathi is my mother tongue.<br>मेरी मातृभाषा मराठी है। |
| 148. | आपण कोण<br>apəɳ koɳ | - | Who are you ?<br>आप कौन? / आपकी तारीफ? |
| 189. | भारतीय<br>bʰarət̪i:jə | Indian<br>भारतीय | मी भारतीय आहे.<br>I am an Indian.<br>मैं भारतीय हूँ। |

पाठ २

| | | | |
|---|---|---|---|
| 150. | इंग्रज<br>iŋgrəd̪ʒ | British<br>अंग्रेज | मी इंग्रज आहे.<br>I am British.<br>मैं अंग्रेज हूँ। |
| 151. | ते जोडाक्षर<br>ती जोडाक्षरे<br>t̪e d̪ʒoɖakʂər<br>t̪i: d̪ʒoɖakʂəre | conjunct letter<br>संयुक्ताक्षर | 'हे' जोडाक्षर आहे.<br>'This' is a conjunct letter.<br>'यह' एक संयुक्ताक्षर है। |
| 152. | ते अक्षर<br>ती अक्षरे<br>t̪e akʂər<br>t̪i: akʂəre | letter / alphabet<br>अक्षर | 'हे' एक अक्षर आहे.<br>'This' is a letter.<br>'यह' एक अक्षर है। |
| 153. | ती खुशाली<br>t̪i: kʰuʃali: | well-being<br>हाल चाल | तुझी खुशाली कळव.<br>Let me know how you are.<br>मुझे अपना हाल-चाल बताओ। |
| 154. | विचारू या (विचारणे)<br>ʋiʧaru: ja (ʋiʧarɳe) | - | Let us ask.<br>चलो, पूछते हैं। |
| 155. | तो / ते (आदरार्थी) काका<br>ते काका<br>t̪o / t̪e kaka<br>t̪e kaka | paternal uncle<br>चाचा | माझे काका मुंबईत राहतात.<br>My uncle lives in Mumbai.<br>मेरे चाचा मुंबई में रहते हैं। |
| 156. | कसे आहात तुम्ही<br>kəse ahat̪ t̪umʰi: | - | How are you?<br>आप कैसे हैं? |
| 157. | मजेत<br>məd̪ʒet̪ | fine<br>मजे में | मी मजेत आहे.<br>I am fine.<br>मैं मजे में हूँ। |
| 158. | मस्त<br>məst̪ə | very fine<br>बढ़िया | मी मस्त आहे.<br>I am doing very fine.<br>बढ़िया! मेरा बहुत अच्छा चल रहा है। |
| 159. | आपण / तुम्ही कसे / कशा आहात<br>apəɳ / t̪umʰi: kəse / kəʃa ahat̪ | - | How are you (formal)?<br>आप कैसे / कैसी हैं ? |
| 160. | बरा/ बरी<br>bəra/ bəri: | okay<br>ठीक | मी बरा (m) / बरी (f) आहे.<br>I am okay.<br>मैं ठीक हूँ। |
| 161. | ठणठणीत<br>ʈʰəɳʈʰəɳi:t̪ | hale and hearty<br>चंगा/ दुरुस्त | मी ठणठणीत आहे.<br>I am hale and hearty.<br>मैं चंगा हूँ। |
| 162. | ठीक<br>ʈʰi:k | fine<br>ठीक | मी ठीक आहे.<br>I am fine.<br>मैं ठीक हूँ। |
| 163. | उत्तम<br>ut̪t̪əm | excellent<br>बढ़िया | मी उत्तम आहे.<br>I am doing great.<br>मैं अच्छा हूँ। |
| 164. | तू कसा/ कशी आहेस<br>t̪u: kəsa/ kəʃi: ahes | - | How are you (informal)?<br>तू कैसा / कैसी है? |
| 165. | तुम्ही काय करता<br>t̪umʰi: kaj kərt̪a | - | What are you (by profession) /<br>What do you do ?<br>आप क्या करते हैं? |

पाठ २

| | | | |
|---|---|---|---|
| 166. | तुम्ही दिवसभरात (दिवसभर) घरी काय काय करता<br>tumʰi: d̪iʋəsbʰərat̪ (d̪iʋəsbʰər) gʰəri: kaj kərt̪a | throughout the day<br>दिनभर | तुम्ही दिवसभरात काय काय करता ?<br>What do you do throughout the day?<br>आप दिनभर क्या क्या करते हैं ? |
| 167. | घरी<br>gʰəri: | at home<br>घर पर | मी घरी पेपर वाचतो.<br>I read newspaper at home.<br>मैं घर पर अखबार पढ़ता हूँ। |
| 168. | आराम करते<br>(करणे)<br>तो आराम<br>aram kərt̪e<br>(kərɳe)<br>t̪o aram | to take rest<br>आराम करना | आराम कर.<br>Take rest.<br>आराम कर। |
| 169. | करते (करणे)<br>kərt̪e (kərɳe) | to do<br>करना | काम कर.<br>Do some work !<br>काम कर ! |
| 170. | अभ्यास करते<br>(करणे)<br>तो अभ्यास<br>əbʰjas kərt̪e (kərɳe)<br>t̪o əbʰjas | to study<br>पढ़ाई करना | तो अभ्यास करतो.<br>He studies.<br>वह पढ़ाई करता है। |
| 171. | साफसफाई करते<br>(करणे)<br>ती साफसफाई<br>safsəfai: kərt̪e (kərɳe)<br>t̪i: safsəfai: | to clean<br>साफसफाई करना | चला, साफसफाई करू.<br>Let's start cleaning.<br>चलो, साफसफाई करते हैं। |
| 172. | खेळ खेळतो<br>(खेळणे)<br>तो खेळ<br>ते खेळ<br>kʰeɭ kʰeɭt̪o<br>(kʰeɭɳe)<br>t̪o kʰeɭ<br>t̪e kʰeɭ | to play a game<br>खेल खेलना | मी घरी खेळ खेळतो.<br>I play games at home.<br>मैं घर पर खेल खेलता हूँ। |
| 173. | स्वयंपाक करतो<br>(करणे)<br>तो स्वयंपाक<br>sʋəjəmpak kərt̪o (kərɳe)<br>t̪o sʋəjəmpak | to cook<br>खाना बनाना | ती स्वयंपाक करते.<br>She cooks.<br>वह खाना बनाती है। |
| 174. | पुस्तक<br>pust̪ək | [24] | |
| 175. | वाचते (वाचणे)<br>ʋat̪st̪e (ʋat̪sɳe) | to read<br>पढ़ना | मी पुस्तक वाचते.<br>I read a book.<br>मैं किताब पढ़ती हूँ। |
| 176. | बुद्धिबळ खेळतो<br>(खेळणे)<br>ते बुद्धिबळ<br>bud̪d̪ʰibəɭ kʰeɭt̪o (kʰeɭɳe)<br>t̪e bud̪d̪ʰibəɭ | to play chess<br>शतरंज खेलना | तो बुद्धिबळ खेळतो.<br>He plays chess.<br>वह शतरंज खेलता है। |

पाठ २

| | | | |
|---|---|---|---|
| 177. | बघतो (बघणे)<br>bəgʰt̪o (bəgʰɳe) | [112] | |
| 178. | हा महिना कोणता आहे ?<br>ha məhina koɳt̪a ahe? | - | Which month is this?<br>यह महीना कौनसा है? |
| 179. | पुढचा<br>puɖʰtsa | next<br>अगला | पुढचा महिना कोणता ?<br>Which is the next month?<br>अगला महीना कौनसा है ? |
| 180. | ती शिवी<br>त्या शिव्या<br>t̪i: ʃiʋi:<br>t̪ja ʃiʋja | abusive word<br>गाली | शिवी देऊ नये.<br>One should not abuse.<br>गाली नहीं देनी चाहिए। |
| 181. | आता शिव्यासुद्धा<br>at̪a ʃiʋjasud̪d̪ʰa | - | Now abuses too !<br>अब गालियाँ भी ! |
| 182. | ते गाढव<br>ती गाढवे<br>t̪e gaɖʰəʋ<br>t̪i: gaɖʰʋe | ass, donkey (used here as an abuse for stupidity)<br>गधा! | तो गाढव विचार करत नाही !<br>That donkey doesn't think !<br>वह गधा सोचता नहीं है। |
| 183. | तो बैल<br>ते बैल<br>t̪o bəi̯l<br>t̪e bəi̯l | bull (used here as an abuse for stupidity)<br>साँड! | तो बैल आहे !<br>He is a mutt!<br>वह निरा बैल है ! |
| 184. | घोड्या<br>तो घोडा<br>ते घोडे<br>gʰoɖja<br>t̪o gʰoɖa<br>t̪e gʰoɖe | oh, you horse! (used here as an abuse for stupidity)<br>घोडा / साँड कहीं का! | घोड्या, काहीतरी काम कर !<br>You ass, do something !<br>साँड कहीं का, कुछ तो काम कर ! |
| 185. | कुत्र्या<br>तो कुत्रा<br>ते कुत्रे<br>kut̪rja<br>t̪o kut̪ra<br>t̪e kut̪re | dog (used here as an abuse) / oh, you son of a bitch !<br>कुत्ते ! | कुत्र्या, जरा नीट वाग !<br>You son of a bitch, behave yourself!<br>अरे कुत्ते, तमीज़ से पेश आ ! |
| 186. | तो मूर्ख<br>ते मूर्ख<br>t̪o mu:rkʰə<br>t̪e mu:rkʰə | fool, stupid<br>मूर्ख | त्याला सगळे मूर्ख म्हणतात.<br>All call him a fool.<br>उसे सभी मूर्ख कहते हैं। |
| 187. | तो बेअक्कल<br>ते बेअक्कल<br>t̪o beəkkəl<br>t̪e beəkkəl | senseless, fool<br>बुद्धू, बेअक्कल, मूर्ख | एवढं कळत नाही तुला ? बेअक्कल.<br>Don't you understand that much, you fool ?<br>मूर्ख / बेअक्कल, तुझे इतना भी नहीं समझ में आता ? |
| 188. | तो मठ्ठ<br>ते मठ्ठ<br>t̪o məʈʰʈʰə<br>t̪e məʈʰʈʰə | stupid<br>बुद्धू | त्या वर्गात तीन मठ्ठ मुले आहेत.<br>There are three stupid students in that class.<br>उस कक्षा में तीन बुद्धू छात्र हैं। |

पाठ २

| | | | |
|---|---|---|---|
| 189. | तो अकलेचा कांदा<br>ते अकलेचे कांदे<br>to əkletsa kanda<br>te əkletse kande | mutton headed<br>बेवकूफ | तो तर अकलेचा कांदाच आहे.<br>He is a muttonhead.<br>वह बेवकूफ है। |
| 190. | बुद्दू<br>buddu: | - | Foolish ! / Stupid !<br>बुद्धू ! |
| 191. | चक्रम<br>ʧəkrəm | - | Weirdo !<br>घनचक्कर ! |
| 192. | नालायक<br>nalajək | incompetent, worthless<br>नालायक / निकम्मा | गोविंद नालायक आहे.<br>Govind is good for nothing.<br>गोविंद नालायक है। |
| 193. | निर्लज्ज<br>nirlədʒdʒə | shameless<br>निर्लज्ज / बेशरम | निर्लज्ज माणूस नेहमी सुखी असतो.<br>A shameless person is always happy.<br>निर्लज्ज आदमी सदा सुखी रहता है। |
| 194. | बेशरम<br>beʃərəm | shameless<br>निर्लज्ज / बेशरम | तू बेशरम आहेस.<br>You are a shameless person.<br>तुम बेशरम हो। |
| 195. | साल्या<br>salja | literally: wife's brother (used here as an abuse)<br>साले | साल्या, मला शहाणपणा शिकवू नको.<br>You creep, don't teach me wisdom!<br>साले, मुझे अक्ल मत सिखा। |
| 196. | हरामखोर<br>həramkʰor | cheat / scoundrel<br>हरामखोर | हरामखोर, मला शिव्या देतोस ?<br>You cheat, are you abusing me ?<br>धूर्त / हरामखोर, मुझे गाली देता है ? |
| 197. | पंढरपूरच्या वेशीवरती<br>pənḍʰərpu:rʧja<br>ʋeʃi:ʋərti: | on the outskirts of Pandharpur<br>पंढरपुर के उपकण्ठ पर | |
| 198. | आहे एक छोटी शाळा<br>ahe ek ʧʰoti: ʃaḷa | - | There is a school.<br>वहाँ एक विद्यालय है। |
| 199. | सगळी मुलं लख्ख गोरी<br>səgḷi: mulə ləkʰkʰə gori: | - | All children are fair skinned.<br>सारे बच्चे एकदम गोरे हैं। |
| 200. | एक मुलगा कुट्ट काळा<br>ek mulga kuṭṭə kaḷa | - | One boy is absolutely dark.<br>एक लड़का काला कलूटा है। |
| 201. | खूप करतो दंगामस्ती<br>kʰu:p kərto dəŋgaməsti: | - | He does a lot of mischief.<br>वह खूब दंगा मस्ती करता है। |
| 202. | खोड्या करण्यात आहे अट्टल<br>kʰoḍja kərṇjat ahe əṭṭəl | - | He is number one in playing pranks.<br>मस्ती करने में वह अव्वल है। |
| 203. | मास्तर म्हणतात<br>mastər mʰəṇtat | - | the teacher says<br>मास्टरजी कहते हैं |
| 204. | "करणार काय"<br>kərṇar kaj | - | What to do ?<br>क्या करें ? |
| 205. | न जाणो<br>nə dʒaṇo | - | Who knows ?<br>कौन जाने ? |
| 206. | असेल विठ्ठल<br>əsel ʋiṭʰṭʰəl | - | He could be Lord Vitthal.<br>वह भगवान विठ्ठल हो सकते हैं। |

पाठ ३ | CHAPTER 3

| क्र./No. | शब्द/वाक्य / Word/Sentence | अर्थ / Meaning | उदाहरण / Example |
|---|---|---|---|
| 207. | तो परिचय<br>ते परिचय | introduction, acquaintance<br>परिचय, जान पहचान | |
| 208. | संपर्क साधणे. | to contact someone<br>संपर्क साधना। | |
| 209. | किती वाजले हे विचारणे आणि वेळ सांगणे. | to ask for the time and to tell it<br>वक्त पूछना और बताना। | |
| 210. | देशाचे नाव | name of the country<br>देश का नाम | |
| 211. | प्रश्नशब्द: कुठले, कुठल्या/किती | Interrogatives: from where / how many<br>प्रश्नसूचक शब्द: कहाँ से / कितने | |
| 212. | तो वर्ग<br>ते वर्ग | classroom, class<br>कक्षा | तुमचा वर्ग कुठे आहे?<br>Where is your classroom?<br>आपकी कक्षा कहाँ है? |
| 213. | मराठी वर्गात | - | in the Marathi class<br>मराठी कक्षा में |
| 214. | तुम्ही कुठल्या? | - | Where are you from?<br>आप कहाँ से हैं? |
| 215. | आणि | [31] | - |
| 216. | ठीक | alright<br>ठीक | मी ठीक आहे.<br>I am alright.<br>मैं ठीक हूँ। |
| 217. | टाटा | [19] | - |
| 218. | सुप्रभात | good morning<br>शुभ प्रभात | सुप्रभात, गुरुजी.<br>Good Morning, teacher!<br>सुप्रभात गुरुजी। |
| 219. | ती वेळ<br>त्या वेळा | time<br>समय | आता वेळ आहे बातम्यांची.<br>It is time for the news.<br>अब समय है समाचार का। |
| 220. | माफ कर (करणे) | to forgive<br>माफ करना | मला माफ करा.<br>Forgive me!<br>मुझे माफ कीजिए। |
| 221. | ती चूक<br>त्या चुका | mistake<br>गलती | माझी चूक झाली.<br>It was my mistake.<br>मुझसे गलती हूई। |
| 222. | ती बातमी<br>त्या बातम्या | news<br>समाचार | आता बातम्या ऐका.<br>Now listen to the news.<br>अब समाचार सुनिए। |
| 223. | ते सर्वनाम<br>ती सर्वनामे | pronoun<br>सर्वनाम | 'मी' हे सर्वनाम आहे.<br>'I' is a pronoun.<br>'मैं' एक सर्वनाम है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 224. | तू | [114] | - |
| 225. | तो | he<br>वह | तो घरी आहे.<br>He is at home.<br>वह घर पर है। |
| 226. | ती | she<br>वह | ती मुलगी आहे.<br>She is a girl.<br>वह लड़की है। |
| 227. | ते | it<br>वह | ते पुस्तक आहे.<br>It is a book.<br>वह पुस्तक है। |
| 228. | आम्ही | we<br>हम | आम्ही जातो.<br>We go.<br>हम जाते हैं। |
| 229. | आपण | you (formal)<br>आप | आपण कुठे राहता ?<br>Where do you stay?<br>आप कहाँ रहते हैं ? |
| 230. | ते, त्या, ती | they<br>वे | ते / त्या / ती सर्व दिल्लीत राहतात.<br>They live in Delhi.<br>वे दिल्ली में रहते हैं। |
| 231. | राहतो / राहते (राहणे) | to live, to reside<br>रहना | मी मुंबईत राहतो / राहते.<br>I live in Mumbai.<br>मैं मुंबई में रहता / रहती हूँ। |
| 232. | आई-बाबांबरोबर<br>(आई-बाबा) | parents<br>माता-पिता | ती आई-बाबांबरोबर राहते.<br>She lives with her parents.<br>वह अपने माता-पिता के साथ रहती है। |
| 233. | सध्या | now a days<br>आजकल | मी सध्या मराठी शिकतो.<br>I learn Marathi nowadays.<br>आजकल मैं मराठी सीखता हूँ। |
| 234. | साहेब | Sahib/ Sir<br>साहब / साहिब | माफ करा साहेब !<br>Forgive me, Sir !<br>माफ कीजिए साहब ! |
| 235. | तो व्यापार<br>ते व्यापार | trade<br>व्यापार | तो व्यापार करतो.<br>He engages in trade.<br>वह व्यापार करता है। |
| 236. | जोड्या लावू या. | - | Let's match the columns.<br>जोड़ियाँ लगाएँ। |
| 237. | नमस्कार मंडळी | - | Hello, friends !<br>नमस्कार, दोस्तों ! |
| 238. | तो दिवस<br>ते दिवस | day<br>दिन | आठवड्यात सात दिवस असतात.<br>There are seven days in a week.<br>सप्ताह में सात दिन होते हैं। |
| 239. | आपला | your<br>आपका | मी आपला टूर गाईड.<br>I am your tour guide.<br>मैं आपका टूर गाईड हूँ। |

| | | | |
|---|---|---|---|
| 240. | किंवा | or<br>या | किंवा, आता आपण एक खेळ खेळू या.<br>Or, let's play a game now.<br>या फिर हम अब एक खेल खेलते हैं। |
| 241. | तो चेंडू<br>ते चेंडू | ball<br>गेंद | तो चेंडू कुठे आहे ?<br>Where is that ball?<br>वह गेंद कहाँ है ? |
| 242. | टाकतो (टाकणे) | to throw<br>फेंकना | मी आता हा चेंडू टाकतो.<br>Now, I throw this ball.<br>मैं अब यह गेंद फेंकता हूँ। |
| 243. | झेला (झेलणे) | to catch/ hold<br>पकड़ना | हा चेंडू झेला.<br>Catch the ball.<br>यह गेंद पकडो। |
| 244. | स्वत:बद्दल | about oneself<br>अपने / खुद के बारे में। | स्वत:बद्दल सांगा.<br>Tell about yourself<br>अपने बारे में बताएँ। |
| 245. | सांगा (सांगणे) | to tell<br>कहना | |
| 246. | पकड (पकडणे) | to catch<br>पकड़ना | चेंडू पकडा.<br>Please catch the ball !<br>बॉल पकड़ो ! |
| 247. | प्राध्यापिका | [56] | |
| 248. | ते मूल<br>ती मुले/ मुलं | children<br>बच्चे | मला दोन मुले आहेत.<br>I have two children.<br>मेरे दो बच्चे हैं। |
| 249. | घ्या (घेणे) | to take<br>लेना | हा घ्या बॉल.<br>Here, take the ball.<br>लो, बॉल ले लो। |
| 250. | ती बायको<br>त्या बायका | wife<br>पत्नी | मधुरा अनिकेतची बायको आहे.<br>Madhura is Aniket's wife.<br>मधुरा अनिकेत की पत्नी है। |
| 251. | मीपण | me too<br>मैं भी | मीपण प्राध्यापक आहे.<br>I, too, am a professor.<br>मैं भी प्राध्यापक हूँ। |
| 252. | ती/ त्या काकी<br>त्या काकी | aunt (wife of paternal uncle)<br>चाची | ती माझी काकी आहे.<br>She is my aunt.<br>वह मेरी चाची है। |
| 253. | उतरणार (उतरणे) | to come / get down, get off<br>उतरना | तुम्ही कुठे उतरणार ?<br>Where will you alight ?<br>आप कहाँ उतरेंगे ? |
| 254. | ती आजी<br>त्या आज्या | grandmother<br>दादी, नानी | माझी आजी मुंबईत राहते.<br>My grandmother lives in Mumbai.<br>मेरी दादी / नानी मुंबई में रहती है। |
| 255. | नेसलेल्या | worn<br>पहनी हुई | साडी नेसलेल्या मुली छान दिसतात.<br>Girls wearing sarees look good.<br>साड़ी पहनी हुई लड़कियाँ अच्छी दिखती हैं। |

| | | | |
|---|---|---|---|
| 256. | ठाण्याला | at Thane (railway station of a district at the outskirts of Mumbai)<br>ठाणे में | मी ठाण्याला उतरणार आहे.<br>I will get off at Thane.<br>मैं ठाणे में उतरनेवाली हूँ। |
| 257. | उतरल्यावर | on getting off<br>उतरने पर | तुम्ही उतरल्यावर मी तुमच्या जागेवर बसेन.<br>I will sit in your place after you get off.<br>आपके उतरने पर मैं आपकी जगह पर बैठूँगी। |
| 258. | हसता का<br>(हसणे) | to laugh<br>हसना | हसता का ?<br>Why do you laugh ?<br>आप हसते क्यों हैं ? |
| 259. | माहीत (असणे) | to know<br>जानना | तुम्हाला कसं माहीत ?<br>How do you know ?<br>आपको कैसे मालूम  ? |
| 260. | चेहऱ्यावर | on one's face<br>चेहरे पर | तुझ्या चेहऱ्यावर लिहिलं आहे ते.<br>It's written on your face.<br>यह तुम्हारे चेहरे पर लिखा है। |
| 261. | कोंबडी पकडतो<br>(पकडणे)<br>ती कोंबडी<br>त्या कोंबड्या | Lit.: to catch a hen.<br>Fig.: (1) to fool around.<br>(2) to make futile, funny efforts to catch something<br>मुर्गी पकडने जैसे हास्यास्पद हावभाव | काय, कोंबडी पकडतोयस का ?<br>Are you just fooling around?<br>मुर्गी पकड रहे हो क्या ? |
| 262. | समजतो (समजणे) | to understand / think of oneself<br>समझना | तू स्वत:ला महात्मा गांधी समजतोस का ?<br>Do you think you are Mahatma Gandhi?<br>तुम अपने आप को महात्मा गांधी समझते हो क्या ? |
| 263. | थांब, दाखवतोच तुला | - | Wait, I'll show you your place.<br>रुक, मैं तुझे दिखाता हूँ। |
| 264. | अरे, काय मस्ती करताय | - | What a hullaballo are you up to?<br>अरे, क्या मस्ती कर रहे हो ? |
| 265. | गप ए | - | Shut up!<br>चुप कर ! |
| 266. | विद्यार्थी | [35] | |
| 267. | ती भाषा<br>त्या भाषा | language<br>भाषा | मराठी माझी आवडती भाषा आहे.<br>Marathi is my favourite language.<br>मराठी मेरी प्रिय भाषा है। |
| 268. | मूल | [248] | |
| 269. | तो वकील<br>ते वकील | advocate<br>वकील | He is an advocate.<br>वह वकील है। |
| 270. | तो व्यवसाय<br>ते व्यवसाय | business<br>व्यवसाय | तो व्यवसाय करतो.<br>He is into business.<br>वह व्यवसाय करता है। |

पाठ ३

| | | | |
|---|---|---|---|
| 271. | तो पुस्तकविक्रेता<br>ते पुस्तकविक्रेते | bookseller<br>पुस्तकविक्रेता | तो पुस्तकविक्रेता आहे.<br>He is a bookseller.<br>वह पुस्तकविक्रेता है। |
| 272. | ठणठणीत | [161] | मी ठणठणीत आहे.<br>I am hale and hearty.<br>मैं चुस्त-दुरुस्त हूँ। |
| 273. | छान | nice / fine<br>अच्छा | कसा आहेस ? छान आहेस ना ?<br>How do you do ? All well ?<br>कैसे हो ? ठीक हो ना ? |
| 274. | ती खुर्ची<br>त्या खुर्च्या | chair<br>कुर्सी | ही खुर्ची लहान आहे.<br>This chair is small.<br>यह कुर्सी छोटी है। |
| 275. | ते सफरचंद<br>ती सफरचंदे | apple<br>सेब | हे सफरचंद गोड आहे.<br>This apple is sweet.<br>यह सेब मीठा है। |
| 276. | ती गाडी<br>त्या गाड्या | car<br>गाडी | माझ्याकडे गाडी आहे.<br>I have / own a car.<br>मेरे पास गाड़ी है। |
| 277. | तो अंक<br>ते अंक | number<br>अंक | घड्याळात १ २ अंक असतात.<br>There are twelve numbers in a clock.<br>घड़ी में बारा अंक होते हैं। |
| 278. | ती बेरीज<br>त्या बेरजा | to add<br>अंकों का जोड़ करना | बेरीज करू या.<br>Let's add.<br>अंकों का जोड़ करें। |
| 279. | अधिक | plus (here), more<br>जोड़, ज़्यादा | चार अधिक सहा बरोबर दहा.<br>Four plus six is ten.<br>चार और छह दस। |
| 280. | वजा | minus<br>कम करना | दहा वजा चार किती ?<br>How much is ten minus four?<br>दस में से चार गए तो कितने बचे ? |
| 281. | किती वाजले | - | What's the time?<br>कितने बजे हैं ? |
| 282. | ती दुपार<br>त्या दुपारी | afternoon<br>दोपहर | दुपारचा एक वाजला आहे.<br>It is 1 p.m. / one in the afternoon.<br>दोपहर का एक बजा है। |
| 283. | तो तास<br>ते तास | hour<br>घंटा | खाण्यात एक तास गेला.<br>One hour is gone in eating.<br>खाने में एक घंटा गया। |
| 284. | शोधण्यात | in search of<br>ढूँढने में | पिन शोधण्यात एक तास गेला.<br>One hour was spent in searching for a pin.<br>पिन ढूँढने में एक घंटा गया। |
| 285. | मार दिला<br>(देणे)<br>तो मार | to beat up<br>पीटना | आईने मुलीला मार दिला.<br>The mother beat up her daughter.<br>माँ ने अपनी बच्ची को पीटा। |

| | | | |
|---|---|---|---|
| 286. | ती संध्याकाळ<br>त्या संध्याकाळी | evening<br>शाम | संध्याकाळचे पाच वाजले आहेत.<br>It is 5 p.m. / five in the evening.<br>शाम के पाँच बजे हैं। |
| 287. | तो चहा | tea<br>चाय | आई चहा बनवते.<br>Mom makes tea.<br>माँ चाय बनाती है। |
| 288. | तो भात | cooked rice<br>पका हुआ चावल | आई भात शिजवते.<br>Mom cooks the rice.<br>माँ चावल पकाती है। |
| 289. | तो माठ<br>ते माठ | pitcher<br>मटका | ताईने माठ फोडला.<br>The elder sister broke the pitcher.<br>दीदी ने मटका फोड़ दिया। |
| 290. | तो तुकडा<br>ते तुकडे | piece<br>टुकड़ा | तुकडे उचलण्यात एक तास गेला.<br>An hour was spent in picking up the pieces.<br>टुकड़े उठाने में एक घंटा गया। |
| 291. | ती रात्र<br>त्या रात्री | night<br>रात | रात्रीचे नऊ वाजले आहेत.<br>It is nine p.m.<br>रात के नौ बजे हैं। |
| 292. | ती माऊ<br>त्या माऊ | she cat (a word used for cat in nursery rhymes)<br>बिल्ली | घरात माऊ शिरली.<br>The pussy cat entered the house.<br>बिल्ली घर में घुस आई। |
| 293. | हाकलण्यात (हाकलणे) | driving away<br>भगाने में | माऊ हाकलण्यात एक तास गेला.<br>One hour was spent on driving away the cat.<br>बिल्ली को भगाने में एक घंटा गया। |
| 294. | ती गंमत<br>त्या गमती | fun<br>मजे की बात | चला, जरा गंमत करू या.<br>Come, let's have some fun.<br>आओ, थोड़ी मौज मस्ती करते हैं। |
| 295. | तो बकरा<br>ते बकरे | billy goat<br>बकरा | वर्गात बकरा शिरला.<br>The goat entered the class.<br>बकरा कक्षा में घुस आया। |
| 296. | तो पारा | temper, mercury<br>पारा | आईचा पारा चढला.<br>Mom's temper shot up. / Mom became angry.<br>माँ का पारा चढ़ गया। |
| 297. | शांत करण्यात (करणे) | to pacify<br>शांत करना | तिला शांत करण्यात एक तास गेला.<br>An hour was spent in pacifying her.<br>उसको शांत करने में एक घंटा गया। |
| 298. | माहीत नाही | do not know / no idea<br>पता नहीं | मला काही माहीत नाही.<br>I don't know anything.<br>मुझे कुछ पता नहीं। |
| 299. | तो आकडा<br>ते आकडे | number, digits<br>अंक | मोबाइल नंबरमध्ये दहा आकडे असतात.<br>A mobile number has 10 digits.<br>मोबईल नंबर में दस अंक होते हैं। |
| 300. | धन्य (असणे) | to be great (here sarcastically)<br>धन्य | धन्य आहात तुम्ही !<br>You are great !<br>आप धन्य हैं! |

पाठ ३

| | | | |
|---|---|---|---|
| 301. | तो घोळ<br>ते घोळ | confusion<br>गड़बड़ी | तोच नेहमी घोळ घालत असतो.<br>He is the one who always creates confusion.<br>वही हमेशा गड़बड़ी पैदा करता है। |
| 302. | तो मुखवटा<br>ते मुखवटे | mask<br>मुखौटा | तो बघ, वाघाचा मुखवटा लावलेला लहान मुलगा.<br>See, the young boy, with the mask of a tiger.<br>देखो, बाघ का मुखौटा लगाया हुआ लड़का। |
| 303. | ती डरकाळी<br>त्या डरकाळ्या | roar<br>दहाड़ | सिंह डरकाळी फोडतो.<br>A lion roars.<br>सिंह दहाड़ता है। |
| 304. | आश्चर्याने<br>ते आश्चर्य<br>ती आश्चर्ये | surprised<br>अचरज से | त्याने माझ्याकडे आश्चर्याने पाहिले.<br>He looked at me surprised.<br>उसने मुझे अचरज से देखा। |
| 305. | मग | then<br>फिर | मग मी कोण ?<br>Then who am I ?<br>फिर मैं कौन हूँ? |
| 306. | कोण पाहिजे | - | Who do you want ?<br>कौन चाहिए ? |
| 307. | तो त्रास<br>ते त्रास | irritation / pain<br>परेशानी | काय त्रास आहे!<br>What a pain !<br>क्या परेशानी है! |
| 308. | ते आडनाव<br>ती आडनावे | surname<br>उपनाम | माझे आडनाव कदम आहे.<br>My surname is Kadam.<br>मेरा उपनाम कदम है। |
| 309. | भेटत (राहणे) | to keep meeting<br>मिलते रहना | भेटत राहू या.<br>Let's keep meeting.<br>मिलते रहें। |
| 310. | ते ठिकाण<br>ती ठिकाणे / ठिकाणं | place<br>जगह | माथेरान हे सुंदर ठिकाण आहे.<br>Matheran is a beautiful place.<br>माथेरान एक सुंदर जगह है। |
| 311. | जिंकेल (जिंकणे) | to win<br>जीतना | कुठली टीम जिंकेल ?<br>Which team will win?<br>कौनसी टीम जितेगी ? |
| 312. | एकदमच चालू आहेत | taking place / happening at the same time / simultaneously<br>साथ साथ चलना / चालू होना | क्रिकेट मॅचेस आणि वर्ल्ड कप फुटबॉल एकदमच चालू आहेत.<br>Cricket matches and world cup football are happening simultaneously.<br>क्रिकेट मॅच और फुटबॉल वर्ल्ड कप एक साथ चालू हैं। |
| 313. | म्हणी / वाक्प्रचार / विशेष प्रयोग<br>ती म्हण, त्या म्हणी.<br>तो वाक्प्रचार, ते वाक्प्रचार.<br>तो प्रयोग, ते प्रयोग. | proverbs / idioms / phrases<br>मुहावरे / कहावतें / विशेष प्रयोग | म्हणी लिहा.<br>Write the proverbs.<br>कहावतें लिखें। |

पाठ ३

| | | | |
|---|---|---|---|
| 314. | एका दगडात दोन पक्षी | two targets in one shot/ getting double benefit<br>एक तीर से दो निशाने / एक पंथ दो काज़ | अनिताने मराठी अभ्याक्रमासाठी प्रवेश घेतला. असं करून ती चांगलं मराठी तर शिकलीच, त्याचबरोबर तिला सरकारी नोकरीही मिळाली. एका दगडात दोन पक्षी.<br>Anita took admission for a Marathi course. By doing so she not only learnt good Marathi, but also got a government job. Two targets in one shot.<br>अनिता ने मराठी कोर्स मे प्रवेश लिया। ऐसा करने से उसने न केवल अच्छी मराठी सीखी, परन्तु इससे उसे सरकारी नौकरी भी मिल गई। एक तीर से दो निशाने। |
| 315. | एका हाताने टाळी वाजत नाही | one can't clap with one hand.<br>एक हाथ से ताली नहीं बजती. | दोघांच्या भांडणात कधीच एका हाताने टाळी वाजत नाही.<br>In a fight, one can't blame only one side as you can't clap with a single hand.<br>दो जनों के झगड़े में कभी एक हाथ से ताली नहीं बजती। |
| 316. | एकापेक्षा एक | one better than the other<br>एक से बढ़कर एक | वर्गात एकापेक्षा एक हुशार विद्यार्थी आहेत.<br>There are intelligent students in the class, one brighter than the other.<br>कक्षा में एक से बढ़कर एक बुद्धिमान विद्यार्थी हैं। |
| 317. | एकापरिस दोन भले | the more the better<br>एक से भले दो | या कामासाठी एकापरिस दोन भले.<br>The more the hands working on this task, the better.<br>इस काम के लिए एक से दो भले। |
| 318. | दोनाचे चार हात करणे | to get married<br>हाथ पीले करना | त्याने फारच लवकर दोनाचे चार हात केले.<br>He got married too soon.<br>उसने बड़ी जल्दी हाथ पीले कर लिए। |
| 319. | नाकी नऊ येणे | to drop dead<br>नानी याद आना | त्याला शांत करताना माझ्या नाकी नऊ येतात.<br>I drop dead pacifying him.<br>उसे शांत करते समय मुझे मेरी नानी याद आती है। |
| 320. | तो वर्गमित्र<br>ते वर्गमित्र | classmates<br>सहपाठी | आपल्या वर्गमित्रांची नावे सांगू या.<br>Let's name our classmates.<br>अपने सहपाठियों के नाम बताएँ। |
| 321. | ती मुलाखत<br>त्या मुलाखती | an interview<br>साक्षात्कार | आज माझी मुलाखत आहे.<br>Today I have an interview.<br>आज मेरा साक्षात्कार है। |
| 322. | मोजणे | to count<br>गिनना | शिरीष १ ते १० अंक मोजतो.<br>Shirish counts numbers from 1 to 10.<br>शिरीष १ से १० अंक गिनता है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 323. | तो गट<br>ते गट | group<br>गट | शिक्षिकेने वर्गात दोन गट केले.<br>The teacher made two groups in the class.<br>शिक्षिका ने कक्षा में दो दल बनाए। |
| 324. | बेरीज | [278] | -- |
| 325. | ती वजाबाकी<br>त्या वजाबाक्या | subtraction<br>घटाना | मुलांनो, आता बजाबाकी करा.<br>Students, please subtract now!<br>बच्चों, अब अंक घटाओ। |

## पाठ ४ | CHAPTER 4

| क्र./No. | शब्द/वाक्य / Word/Sentence | अर्थ / Meaning | उदाहरण / Example |
|---|---|---|---|
| 326. | देश आणि छंद | country and hobby<br>देश और शौक | |
| 327. | भारताचा नकाशा पाहणे आणि महत्त्वाची ठिकाणे ओळखणे. | to read the map of India and identify important places.<br>भारत का नक्शा देखना और महत्त्वपूर्ण स्थान पहचानना। | |
| 328. | स्वत:बद्दल सांगणे आणि इतरांबद्दल विचारणे | to tell about oneself and ask about others.<br>खुद के बारें में बताना और दूसरों के बारे में पूछना। | |
| 329. | स्वत:चा छंद सांगणे आणि इतरांचा विचारणे | to tell one's hobbies and ask for those of others.<br>खुद के शौक बताना और दूसरों के पूछना। | |
| 330. | प्रश्नशब्द: कोणता/कुठला | Interrogatives: which / from where<br>प्रश्नसूचक शब्द : कौनसा/कहाँ का | |
| 331. | तो नकाशा<br>ते नकाशे | map<br>नक्शा | तो भारताचा नकाशा आहे.<br>That is a map of India.<br>वह भारत का नक्शा है। |
| 332. | भारत | India<br>भारत | भारत माझा देश आहे.<br>India is my country.<br>भारत मेरा देश है। |
| 333. | ती राजधानी त्या राजधान्या | capital<br>राजधानी | टोक्यो जपानची राजधानी आहे.<br>Tokyo is the capital of Japan.<br>टोक्यो जपान की राजधानी है। |
| 334. | ते राज्य<br>ती राज्ये | state<br>राज्य | गुजरात हे एक राज्य आहे.<br>Gujarat is a state.<br>गुजरात एक राज्य है। |
| 335. | शेजारील / शेजारचा | neighbouring<br>पड़ौसी | पाकिस्तान हा भारताच्या शेजारील देश आहे.<br>Pakistan is India's neighbouring country.<br>पाकिस्तान भारत का पड़ोसी देश है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 336. | ती दिशा<br>त्या दिशा | direction<br>दिशा | ती उत्तर दिशा आहे.<br>That is north.<br>वह उत्तर दिशा है। |
| 337. | उत्तर | north<br>उत्तर | चीन भारताच्या उत्तर दिशेला आहे.<br>China lies to the north of India.<br>चीन भारत की उत्तर दिशा में है। |
| 338. | दक्षिण | south<br>दक्षिण | श्रीलंका भारताच्या दक्षिण दिशेला आहे.<br>Srilanka lies to the south of India.<br>श्रीलंका भारत की दक्षिण दिशा में है। |
| 339. | पश्चिम | west<br>पश्चिम | गुजरात भारताच्या पश्चिम दिशेला आहे.<br>Gujarat lies to the west of India.<br>गुजरात भारत की पश्चिम दिशा में है। |
| 340. | पूर्व | east<br>पूर्व, पूरब | सूर्य पूर्व दिशेला उगवतो.<br>The sun rises in the east.<br>सूरज पूर्व में उगता है। |
| 341. | एका छोट्या खोलीत | in a small room<br>एक छोटे कमरे में | मी एका छोट्या खोलीत राहते.<br>I live in a small room.<br>मैं एक छोटे कमरे में रहती हूँ। |
| 342. | विद्यापीठात<br>ते विद्यापीठ<br>ती विद्यापीठे | at the University<br>विश्वविद्यालय में | मी विद्यापीठात पीएच.डी. करत आहे.<br>I am doing my Ph.D. at the University.<br>मैं विश्वविद्यालय में पीएच.डी. कर रही हूँ। |
| 343. | बरं | okay<br>अच्छा | बरं, मग?<br>Okay, so what?<br>अच्छा, तो? |
| 344. | थोडं थोडं | little<br>थोड़ा थोड़ा | मला थोडं थोडं समजतं.<br>I can understand just a little bit.<br>मुझे थोड़ा थोड़ा समझ में आता है। |
| 345. | ते आईवडील | parents<br>माता पिता | माझे आईवडील लुधियानात राहतात.<br>My parents live in Ludhiana.<br>मेरे माता पिता लुधियाना में रहते हैं। |
| 346. | म्हातारे | old<br>बूढ़े | ते म्हातारे आहेत.<br>They are old.<br>वे बूढ़े हैं। |
| 347. | माझ्याकडे | with me<br>मेरे साथ | ते माझ्याकडे राहणार आहेत.<br>They will stay with me.<br>वे मेरे साथ रहेंगे। |
| 348. | मग | then, so what | मग काय?<br>So what?<br>तो क्या? |
| 349. | पण | but<br>लेकिन, परन्तु | पण माझी खोली छोटी आहे.<br>But my room is small.<br>पर मेरा कमरा छोटा है। |
| 350. | त्यांच्यासाठी | for them<br>उनके लिए | मी त्यांच्यासाठी मोठं घर शोधतेय.<br>I (f) am searching for a big house for them.<br>मैं उनके लिए बड़ा घर ढूँढ़ रही हूँ। |

| | | | |
|---|---|---|---|
| 351. | ती जाहिरात<br>त्या जाहिराती | advertisement<br>विज्ञापन, इश्तहार | अशोक रोज जाहिराती वाचतो.<br>Ashok reads advertisements daily.<br>अशोक रोज विज्ञापन पढ़ता है । |
| 352. | येते (येणे) | [91] | |
| 353. | माझ्याबद्दल | about me<br>अपने बारे में | मी स्वत:बद्दल सांगतो / सांगते.<br>I shall tell something about myself.<br>मैं अपने बारे में बताता / बताती हूँ। |
| 354. | तो अभिनेता<br>ते अभिनेते | actor<br>अभिनेता | शाहरुख खान अभिनेता आहे.<br>Shah Rukh Khan is an actor.<br>शाहरुख ख़ान अभिनेता है। |
| 355. | अविवाहित | unmarried<br>अविवाहित | मी अविवाहित आहे.<br>I am unmarried.<br>मैं अविवाहित हूँ। |
| 356. | सध्या | [233] | |
| 357. | विवाहित | married<br>विवाहित | मी विवाहित आहे.<br>I am married.<br>मैं विवाहित हूँ। |
| 358. | पूर्ण वेळ | full time<br>पूरे समय | मी पूर्ण वेळ गृहिणी आहे.<br>I am a full time house-wife.<br>मैं (पूर्ण कालिक) गृहिणी हूँ। |
| 359. | अजून | still<br>अभी तक | माझी मुलगी अजून लहान आहे.<br>My daughter is still young.<br>मेरी बेटी अभी छोटी है। |
| 360. | ते वाचन<br>ती वाचने | reading<br>पढ़ना | वाचन करणे आणि कॉम्प्युटरवर काम करणे हे माझे छंद आहेत.<br>Reading and working at the computer are my hobbies.<br>पढ़ना व कम्प्यूटर पर काम करना, मेरे शौक हैं। |
| 361. | तो छंद<br>ते छंद | hobby | |
| 362. | ते लग्न<br>ती लग्ने | marriage / wedding<br>लग्न | अजून माझे लग्न झालेले नाही.<br>I am not married yet.<br>अभी तक मेरी शादी नहीं हुई है। |
| 363. | ते दुकान<br>ती दुकाने | shop | हे कपड्यांचे दुकान आहे.<br>This is a shop for clothes.<br>यह कपड़ों की दुकान है। |
| 364. | ते खाणं<br>ती खाणी | food<br>खाना | मला चाइनीज खाणे आवडते.<br>I like Chinese food.<br>मुझे चाइनीज खाना पसंद है। |
| 365. | खादाड | glutton<br>खाऊ | माझे मित्र तर मला खादाडच म्हणतात.<br>My friends call me a glutton.<br>मेरे मित्र तो मुझे 'खाऊ' ही बुलाते है। |
| 366. | ती जिलबी<br>त्या जिलब्या | a very sweet, crisp, round sweet, popular in India<br>जलेबी | मला जिलबी खूप आवडते.<br>I like Jalebi very much.<br>मुझे जलेबी बहुत पसंद है। |

पाठ ४

| | | | |
|---|---|---|---|
| 367. | तो फाफडा<br>ते फाफडे | long gram flour chips- a popular breakfast snack in Gujarat<br>फाफड़ा | गुजराथी लोकं फाफडा खातात.<br>Gujaratis have 'fafda' for breakfast.<br>गुजराती लोग फाफड़ा खाते हैं। |
| 368. | बायको | [250] | |
| 369. | तो शेतकरी<br>ते शेतकरी | farmer<br>किसान | तो शेतकरी आहे.<br>He is a farmer.<br>वह किसान है। |
| 370. | ते गाव<br>ती गावे | big village / small town<br>बडा गाँव / छोटा शहर | आनंदनगर हे एक मोठे गाव आहे.<br>Anandnagar is a big village.<br>आनंदनगर एक बड़ा गाँव है। |
| 371. | ते शहर<br>ती शहरे | city<br>शहर | पुणे हे शहर आहे.<br>Pune is a city.<br>पुणे एक शहर है। |
| 372. | आता तुमची पाळी | - | Now its your turn.<br>अब आपकी / तुम्हारी बारी है! |
| 373. | लिहिणे | to write<br>लिखना | ती लिहिते.<br>She writes.<br>वह लिखती है। |
| 374. | ते लेखन | writing (noun)<br>लेखन | लेखन हा माझा छंद आहे.<br>Writing is my hobby.<br>'लिखना' मेरा शौक है। |
| 375. | कोणता (कोणते, कोणती, कोणत्या) | which, of what kind<br>कौनसा | हा आंबा कोणता ? - हापूस<br>What kind of a mango is this? – Alphonso.<br>यह आम कौनसा है ? - हापूस |
| 376. | तो दूरध्वनी क्रमांक<br>ते दूरध्वनी क्रमांक | telephone number<br>दूरध्वनि क्रमांक | आपला दूरध्वनी क्रमांक काय आहे ?<br>What is your telephone number?<br>आपका दूरध्वनि क्रमांक क्या है ? |
| 377. | ते लिंग<br>ती लिंगे | gender<br>लिंग | खालील नामांचे लिंग ओळखा.<br>Recognize the gender of the following nouns.<br>निम्नलिखित संज्ञाओं के लिंग पहचानिए। |
| 378. | तो पत्ता<br>ते पत्ते | address<br>पता | तुमचा पत्ता बरोबर लिहा.<br>Write your address correctly.<br>अपना पता सही लिखें। |
| 379. | तो खेळाडू<br>ते खेळाडू | sportsperson<br>खिलाड़ी | तो उत्तम खेळाडू आहे.<br>He is a very good sportsperson.<br>वह एक अच्छा खिलाड़ी है। |
| 380. | तो शास्त्रज्ञ<br>ते शास्त्रज्ञ | scientist<br>वैज्ञानिक | |
| 381. | तो पत्रकार<br>ते पत्रकार | journalist<br>पत्रकार | |
| 382. | ती अभिनेत्री<br>त्या अभिनेत्री | actress<br>अभिनेत्री | |

| | | | |
|---|---|---|---|
| 383. | तो लेखक<br>ते लेखक | writer<br>लेखक | |
| 384. | ती लेखिका<br>त्या लेखिका | writer (f)<br>लेखिका | |
| 385. | तो/ ते प्राध्यापक<br>ते प्राध्यापक | professor<br>प्राध्यापक | |
| 386. | प्राध्यापिका | [56] | |
| 387. | तो नर्तक<br>ते नर्तक | dancer<br>नर्तक | |
| 388. | ती नर्तकी<br>त्या नर्तकी | dancer (f)<br>नर्तकी | |
| 389. | तो गायक<br>ते गायक | singer<br>गायक | |
| 390. | ती गायिका<br>त्या गायिका | singer (f)<br>गायिका | |
| 391. | दोघं | both<br>दोनों | तुम्ही दोघं काय करता ?<br>What do both of you do?<br>आप दोनों क्या करते हैं ? |
| 392. | रोज | daily<br>हररोज, रोज़ | मी रोज माझे मेल्स वाचते.<br>I read my mails daily.<br>मैं रोज अपने मेल पढ़ती हूँ। |
| 393. | फार | a lot<br>बहुत | ते मला फार आवडतात.<br>I like them a lot.<br>वे मुझे बहुत पसंद हैं। |
| 394. | जवळ | near<br>पास | तू जवळ नसल्यामुळे मला फार वाईट वाटते/ वाटतं. |
| 395. | नसल्यामुळे | because it is not so<br>ऐसा नहीं है, इस लिए | I feel very bad that you are not close by. |
| 396. | वाईट वाटणे | to feel bad<br>खराब लगना | मुझे बहुत खराब लगता है कि तुम पास नहीं हो। |
| 397. | ते स्वप्न (पडणे)<br>ती स्वप्ने | (to get) a dream<br>सपना (आना) | मला स्वप्नंसुद्धा तुझीच पडतात.<br>I even get your dreams.<br>मुझे तुम्हारे ही सपने आते हैं। |
| 398. | सुद्धा | also, even<br>भी | |
| 399. | खुष | happy<br>खुश | मी खुष आहे.<br>I am happy.<br>मैं खुश हूँ। |
| 400. | ओळखलं (ओळखणे) | to recognize<br>पहचानना | तू मला ओळखलं नाहीस ?<br>Didn't you recognize me?<br>आपने मुझे नहीं पहचाना ? |
| 401. | कोण | [144] | - |
| 402. | काय | [13] | - |

| | | | |
|---|---|---|---|
| 403. | ते काम<br>ती कामे | work<br>काम | काय काम आहे ?<br>What work do you have?<br>क्या काम है ? |
| 404. | चुकीचा | wrong<br>गलत | चुकीचा नंबर लागलेला दिसतोय.<br>I seem to have dialed a wrong number.<br>शायद गलत नम्बर लग गया। |
| 405. | या निमित्ताने | on this pretext / account<br>इस कारण से | या निमित्ताने आपली ओळख झाली.<br>On this pretext / account we came to know each other.<br>इस बहाने हमारा परिचय हो गया। |
| 406. | नात्यातले (नातेवाईक) | in relation (relative)<br>रिश्ते में (रिश्तेदार) | आम्ही गोखल्यांच्या नात्यातले.<br>We are Gokhale’s relatives.<br>हम गोखले के रिश्तेदार है। |
| 407. | कळलं (कळणे) | to understand<br>समझ में आना | कळलं ?<br>Understood ?<br>समझ में आया ? |
| 408. | कसं काय ? | - | How do you do ?<br>क्या हाल है ? / कैसे हो ? |
| 409. | अगदी | very<br>बहुत | अगदी छान !<br>Very nice !<br>बहुत अच्छे ! |
| 410. | देवळात<br>ते देऊळ<br>ती देवळे / देवळं | temple<br>मंदिर | आजी रोज देवळात जाते.<br>Grandmother visits the temple daily.<br>दादी रोज मंदिर जाती है। |
| 411. | झोपतो (झोपणे) | to sleep<br>सोना | तो झोपतो.<br>He sleeps.<br>वह सोता है। |
| 412. | नाच करतो<br>(करणे)<br>तो नाच<br>ते नाच | to dance<br>नाचना | मी नाच करतो.<br>I dance. (m)<br>मैं नाचता हूँ। |
| 413. | तो उंदीर<br>ते उंदीर | rat / mouse<br>चूहा | तो उंदीर आहे.<br>That is a rat.<br>वह एक चूहा है। |
| 414. | तो मोदक<br>ते मोदक | a sweet delicacy in Maharashtra made of rice flour & stuffed with coconut & jaggery. Other varieties are also available, eg. fried, made of milk<br>मोदक | मी मस्तपैकी मोदक खातोय.<br>I am savouring the Modak.<br>मैं मजे से मोदक खा रहा हूँ। |
| 415. | मस्तपैकी | enjoying/ with fun<br>मजे से | |
| 416. | फोटो काढणे<br>तो फोटो<br>ते फोटो | to click a photo<br>फोटो ख़िंचना | मी तुझा फोटो काढतो.<br>I will click your photo.<br>मैं तुम्हारा फोटो खींचता हूँ। |

भाग ४

| | | | |
|---|---|---|---|
| 417. | नवीन | new<br>नया | हा माझा नवीन कॅमेरा आहे.<br>This is my new camera.<br>यह मेरा नया कैमरा है। |
| 418. | गोड | sweet / cute<br>मीठा / प्यारा | किती गोड दिसतोयस!<br>How sweet / cute you look !<br>तुम कितने प्यारे लग रहे हो ! |
| 419. | ओळखणार (ओळखणे) | to recognize<br>पहचानना | कोणी ओळखणार नाही तुला.<br>Nobody will recognize you.<br>तुम्हें कोई नहीं पहचानेगा। |
| 420. | तो उपयोग<br>ते उपयोग | use, advantage<br>उपयोग, फायदा | मग काय उपयोग?<br>What's the use then?<br>फिर क्या फायदा? |
| 421. | मी मी करण्याचा (करणे) | to talk about oneself<br>मैं मैं करना | त्याचा स्वभावच आहे, मी मी करण्याचा.<br>Always talking about himself is in his nature.<br>उसका स्वभाव ही है, मैं मैं करना। |
| 422. | मी तू करणे | to quarrel<br>तू तू मैं मैं करना | पैशांवरून ते मी तू करू लागले.<br>They started quarrelling for money.<br>वे पैसे के लिए तू तू मैं मैं करने लगे। |
| 423. | आपण होऊन | on one's own initiative<br>अपने आप / खुद / अपनी मर्जी से | तो आपण होऊन मला भेटायला आला.<br>He came to meet me on his own.<br>वह अपनी मर्जी से मुझे मिलने आया। |
| 424. | आपला आपण | on one's own<br>अपने आप | मी त्याला काहीच बोललो नाही. तो आपला आपण निघून गेला.<br>I did not tell him anything. He left on his own.<br>मैंने उससे कुछ नहीं कहा। वह अपने आप चला गया। |
| 425. | तो फासा<br>ते फासे | dice<br>पासा | मला फासा दे.<br>Give me the dice.<br>मुझे पासा दे। |
| 426. | सामान्य वर्तमानकाळ<br>तो काळ<br>ते काळ | simple present tense<br>सामान्य वर्तमानकाळ | |
| 427. | तो धातू<br>ते धातू | root of a verb<br>धातु | 'करणे' या क्रियापदात 'कर' हा धातू आहे.<br>'Do' is the root in 'to do'.<br>'करना' क्रिया में 'कर' धातु है। |
| 428. | ते क्रियापद<br>ती क्रियापदे | verb<br>क्रिया | क्रियापदे शिकू या.<br>Let's learn verbs.<br>क्रिया सीखें। |
| 429. | लवकरात लवकर | as soon as possible<br>जल्दी से जल्दी | हे लवकरात लवकर करा.<br>Do this as soon as possible.<br>यह जल्दी से जल्दी कीजिए। |
| 430. | ते विशेषण<br>ती विशेषणे | adjectives<br>विशेषण | विशेषणे शिकू या.<br>Let's learn adjectives.<br>विशेषण सीखें। |

पाठ ४

| | | | |
|---|---|---|---|
| 431. | ते सामान्य नाम<br>ती सामान्य नामे | common nouns<br>जातिवाचक संज्ञा | सामान्य नामे शिकू या.<br>Let's learn common nouns.<br>जातिवाचक संज्ञा सीखें। |
| 432. | लिंग | [377] | |
| 433. | पुल्लिंगी (पुल्लिंग) | masculine<br>पुल्लिंग | 'तो' हे पुल्लिंगी सर्वनाम आहे.<br>'He' is a masculine pronoun.<br>'तो' यह एक मराठी पुल्लिंग सर्वनाम है। |
| 434. | स्त्रीलिंगी (स्त्रीलिंग) | feminine<br>स्त्रीलिंगी | 'शिक्षिका' हे स्त्रीलिंगी नाम आहे.<br>'Shikshika' is a feminine noun. (in Marathi)<br>'शिक्षिका' एक स्त्रीलिंग संज्ञा है। |
| 435. | ते एकवचन<br>ती एकवचने | singular<br>एकवचन | एकवचन सांगा.<br>Tell the singular form.<br>एकवचन बताएँ। |
| 436. | अनेकवचन | plural<br>बहुवचन | अनेकवचन सांगा.<br>Tell the plural form.<br>बहुवचन बताएँ। |
| 437. | तो शिष्टाचार शब्द<br>ते शिष्टाचार शब्द | polite expressions<br>शिष्टाचार शब्द | 'धन्यवाद' हा शिष्टाचार शब्द आहे.<br>'Thank you' is a polite expression.<br>'धन्यवाद' यह शिष्टाचार शब्द है। |
| 438. | इतर शब्द | other words<br>अन्य शब्द | इतर शब्द सांगा.<br>Tell the other words.<br>अन्य शब्द बताएँ। |

## पाठ ५ | CHAPTER 5

| क्र./No. | शब्द/वाक्य / Word/Sentence | अर्थ / Meaning | उदाहरण / Example |
|---|---|---|---|
| 439. | दैनंदिन व्यवहार | daily routine.<br>दिनचर्या | |
| 440. | स्वत:चा आणि इतरांचा दिनक्रम सांगणे. | to tell about one's and others' daily routine.<br>खुद की और दूसरों की दिनचर्या बताना. | |
| 441. | मराठी वार | days of the week in Marathi.<br>मराठी में दिनों के नाम | |
| 442. | १३ ते ५० अंक | numbers 13 to 50<br>१३ से ५० अंक | |
| 443. | दैनंदिन व्यवहारातील गोष्टींविषयी बोलणे. | to talk about daily routine<br>दिनचर्या के बारे में बोलना. | |
| 444. | प्रश्नशब्द : केव्हा / कधी | Interrogatives: at what time / when<br>प्रश्नशब्द : कब, कभी | |
| 445. | रोज | [392] | |
| 446. | सकाळी<br>ती सकाळ<br>त्या सकाळी | in the morning<br>सुबह | सोनाली सकाळी अभ्यास करते.<br>Sonalee studies in the morning.<br>सोनाली सुबह पढ़ाई करती है। |

पाठ ४

पाठ ५

| | | | |
|---|---|---|---|
| 447. | लवकर | early<br>जल्दी | घरी लवकर ये.<br>Come home early.<br>घर जल्दी आ / आना। |
| 448. | उठते (उठणे) | to wake up<br>उठना | ती उशिरा उठते.<br>She wakes up late.<br>वह देर से उठती है। |
| 449. | घरीच<br>ते घर<br>ती घरे | house, home<br>घर | हे माझे घर आहे.<br>This is my house.<br>यह मेरा घर है। |
| 450. | तो व्यायाम<br>ते व्यायाम | an exercise<br>कसरत | रोज व्यायाम करावा.<br>One must exercise daily.<br>हर रोज कसरत करनी चाहिये। |
| 451. | तो दात<br>ते दात<br>(दात घासणे) | teeth (brush the teeth)<br>दाँत | महेंद्रचे दात चांगले आहेत.<br>Mahendra has good teeth.<br>महेंद्र के दाँत अच्छे हैं। |
| 452. | दुपारी<br>ती दुपार<br>त्या दुपारी | in the afternoon<br>दोपहर | दुपारी उन खूप असते.<br>In the afternoon it is very hot.<br>दोपहर में कड़ी धूप होती है। |
| 453. | तो नाश्ता<br>ते नाश्ते | breakfast<br>नाश्ता | मला नाश्ता करायला आवडत नाही.<br>I do not like to have breakfast.<br>मुझे नाश्ता करना पसंद नहीं है। |
| 454. | पोहायला (पोहणे) | for swimming<br>तैरना | किशोर पोहायला जातो.<br>Kishore goes swimming.<br>किशोर तैरने जाता है। |
| 455. | संध्याकाळी<br>ती संध्याकाळ<br>त्या संध्याकाळी | in the evening<br>शाम को | संध्याकाळी सूर्यास्त होतो.<br>The sun sets in the evening.<br>शाम को सूरज ढ़लता है। |
| 456. | रात्री<br>ती रात्र<br>त्या रात्री | at night (night)<br>रात | रात्री तारे चमकतात.<br>The stars shine in the night.<br>रात में तारे चमकते है। |
| 457. | ते वाचन | [360] | |
| 458. | झोपणे | [411] | |
| 459. | तो दिनक्रम<br>ते दिनक्रम | daily routine<br>दिनक्रम | प्रत्येकाचा दिनक्रम वेगवेगळा असतो.<br>Everybody's daily routine is different.<br>हर एक की दिनचर्या अलग होती है। |
| 460. | दात घासतो (घासणे) | to brush<br>दातून करना | रोहन दात घासतो.<br>Rohan brushes his teeth.<br>रोहन दातून करता है। |
| 461. | दात घासत आहे | to be brushing<br>दातून कर रहा है। | रोहन दात घासत आहे.<br>Rohan is brushing his teeth.<br>रोहन दातून कर रहा है। |
| 462. | ते फळ<br>ती फळे / फळं | fruit<br>फल | सफरचंद हे फळ आहे.<br>An apple is a fruit.<br>सेब एक फल है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 463. | खातो/ खाते<br>(खाणे) | eats<br>खाना | गौरी सफरचंद खाते.<br>Gauri eats an apple.<br>गौरी सेब खाती है। |
| 464. | तो अपूर्ण वर्तमानकाळ | present continuous tense<br>अपूर्ण वर्तमान काल | |
| 465. | तो अननस<br>ते अननस | pineapple<br>अननस | अननस तुरट-गोड असतो.<br>Pineapple is sweet & sour.<br>अनन्नास खट्टा-मीठा होता है। |
| 466. | देतो (देणे) | [75] | |
| 467. | अकर्मक | intransitive<br>अकर्मक | |
| 468. | सकर्मक | transitive<br>सकर्मक | |
| 469. | जाणे | to go<br>जाना | मी जातो.<br>I go.<br>मैं जाता हूँ। |
| 470. | गाणे | to sing<br>गाना | मी गातो.<br>I sing.<br>मैं गाता हूँ। |
| 471. | बनवणे | to make<br>बनाना | मी मूर्ती बनवतो.<br>I make an idol.<br>मैं मूर्ति बनाता हूँ। |
| 472. | होणे | to happen<br>होना | येथे काय होत आहे ?<br>What's happening here?<br>यहाँ क्या हो रहा है ? |
| 473. | विकणे | to sell<br>बिकना, बेचना | तो फळे विकतो.<br>He sells fruits.<br>वह फल बेचता है। |
| 474. | जेवणे | to have a meal<br>खाना खाना | मी जेवते.<br>I have my meal.<br>मैं खाना खाती हूँ। |
| 475. | बोलणे | to talk<br>बात करना | तो माझ्याशी बोलतो.<br>He talks to me<br>वह मुझ से बात करता है। |
| 476. | भरवणे | to feed<br>खिलाना | आई मुलाला भरवते.<br>The mother feeds her child.<br>माँ बच्चे को खाना खिलाती है। |
| 477. | तो माणूस<br>ती माणसे | person<br>व्यक्ति | हा माणूस काय करत आहे ?<br>What is this person doing?<br>यह आदमी क्या कर रहा है ? |
| 478. | घडणे | to happen, take place<br>होना | काय घडत आहे ?<br>What is happening?<br>क्या हो रहा है ? |
| 479. | ते पाणी | water<br>पानी | अमृता पाणी पिते.<br>Amruta drinks water.<br>अमृता पानी पीती है। |

पाठ ९

| | | | |
|---|---|---|---|
| 480. | पीत आहे (पिणे) | to drink<br>पीना | अमृता पाणी पीत आहे.<br>Amruta is drinking water.<br>अमृता पानी पी रही है। |
| 481. | ती कविता<br>त्या कविता | a poem<br>कविता | देवकी कविता लिहीत आहे.<br>Devaki is writing a poem.<br>देवकी कविता लिख रही है। |
| 482. | लक्षात ठेवा (ठेवणे) | to keep in mind<br>ध्यान में रखना | हे लक्षात ठेवा.<br>Keep this in mind.<br>यह ध्यान में रखें। |
| 483. | दूध | [87] | |
| 484. | हळू | slow / softly<br>धीरे / धीमे | जरा हळू वाच.<br>Please read a little slowly.<br>थोड़ा धीमे पढ़। |
| 485. | एवढा | so much<br>इतना | एवढा त्रास होतो.<br>It's such a pain<br>इतनी मुसीबत है। |
| 486. | ती परीक्षा (देणे)<br>त्या परीक्षा | exam (here: to appear for one)<br>परीक्षा (देना) | तो परीक्षा देत नाही आहे.<br>He is not appearing for the exam.<br>वह परीक्षा नहीं दे रहा है। |
| 487. | ती शांतता | peace<br>शांति | घरात शांतता नाहीये.<br>There is no peace at home.<br>घर में शांति नहीं है। |
| 488. | तो विचार<br>ते विचार | thought / idea<br>विचार, सोच | हा चांगला विचार आहे.<br>This is a good thought / idea.<br>यह एक अच्छा विचार है। |
| 489. | विचार (करणे) | to think<br>सोचना | माझा कोणीच विचार करत नाही.<br>Nobody thinks of me.<br>कोई मेरे बारे में नहीं सोचता है। |
| 490. | ती मैत्रीण<br>त्या मैत्रिणी | a female friend<br>सहेली | डायना माझी मैत्रीण आहे.<br>Diana is my friend.<br>डायना मेरी सहेली है। |
| 491. | बोलतीय (बोलणे) | to speak<br>बोलना | मी तिची मैत्रीण बोलतेय.<br>I am her friend speaking.<br>मैं उसकी सहेली बोल रही हूँ। |
| 492. | मीही | me too<br>मैं भी | मीही अभ्यास करतेय.<br>I too am studying.<br>मैं भी पढ़ रही हूँ। |
| 493. | ते गणित | mathematics<br>गणित | मला गणित आवडते.<br>I like mathematics.<br>मुझे गणित पसंद है। |
| 494. | तुम्ही काय करत आहात ? | - | What are you doing?<br>आप क्या कर रहे हैं ? |
| 495. | बोलावतेय (बोलावणे) | to call<br>बुलाना | ती मला घरी बोलावतेय.<br>She is calling me home.<br>वह मुझे घर बुला रही है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 496. | येतोय (येणे) | to come<br>आना | तो येतोय.<br>He is coming.<br>वह आ रहा है। |
| 497. | ते राष्ट्रगीत<br>ती राष्ट्रगीते/ राष्ट्रगीतं | national anthem<br>राष्ट्रगीत | हे भारताचे राष्ट्रगीत आहे.<br>This is India's national anthem.<br>यह भारत का राष्ट्रगीत है। |
| 498. | पडत (पडणे) | to fall<br>गिरना | फळ झाडावरून पडत आहे.<br>A fruit is falling from the tree.<br>फल पेड़ से गिर रहा है। |
| 499. | तो प्रकार<br>ते प्रकार | type, kind<br>प्रकार | जर्मनीत ब्रेडचे खूप प्रकार आहेत.<br>There are various kinds of bread in Germany.<br>जर्मनी में बहुत प्रकार के ब्रेड होते हैं। |
| 500. | मारत (मारणे) | to beat<br>मारना | तो त्याला मारत आहे.<br>He is beating him.<br>वह उसको मार रहा है। |
| 501. | पकडतोय (पकडणे) | to catch<br>पकड़ना | मांजर उंदराला पकडतेय.<br>The cat is catching a mouse.<br>बिल्ली चूहे को पकड़ रही है। |
| 502. | प्रश्न | [39] | |
| 503. | चल, खेळू या | - | Come, let's play.<br>चलो, खेलें |
| 504. | तिकडे | there<br>उधर, वहाँ | तो तिकडे आहे.<br>He is there.<br>वह उधर / वहाँ है। |
| 505. | फळवाल्याकडे | at the fruitseller's<br>फलवाले के पास | मी फळवाल्याकडे उभा आहे.<br>I am standing at the fruitseller's.<br>मैं फलवाले के पास खडा हूँ। |
| 506. | तो हत्ती<br>ते हत्ती | elephant<br>हाथी | मी हत्ती पाहिला.<br>I saw an elephant.<br>मैंने हाथी देखा। |
| 507. | ते केळे<br>ती केळी | banana<br>केला | मी रोज एक केळे खाते.<br>I eat a banana every day.<br>मैं रोज एक केला खाती हूँ। |
| 508. | ती मस्ती (करणे) | fun<br>मस्ती | मुले मस्ती करतात.<br>Children have fun.<br>बच्चे मस्ती करते हैं। |
| 509. | ओरडतोय (ओरडणे) | to scream, shout<br>चिल्लाना | तो जोरात ओरडतोय.<br>He is shouting loudly.<br>वह जोर से चिल्ला रहा है। |
| 510. | ढग | [67] | |
| 511. | गडगडणे | to thunder<br>गडगडाना, गरजना | पावसाळ्यात आकाशात गडगडते.<br>It thunders in the rainy season.<br>बारिश के मौसम में बादल गरजते हैं। |

| | | | |
|---|---|---|---|
| 512. | विजा चमकणे<br>ती वीज<br>त्या विजा | flashing of the lightning<br>बिजली चमकना | आकाशात विजा चमकतात.<br>There is lightning in the sky.<br>आसमान में बिजली चमकती है। |
| 513. | तो सोसाट्याचा वारा<br>ते सोसाट्याचे वारे | fierce wind<br>तेज हवा | सोसाट्याचा वारा सुटला आहे.<br>There is a fierce wind.<br>तेज हवा चल रही है। |
| 514. | ते झाड<br>ती झाडे/ झाडं | a tree<br>पेड़ | ते झाड उंच आहे.<br>That tree is tall.<br>वह पेड़ उंचा है। |
| 515. | डोलणे | to shake or sway<br>डोलना / हिलना | वार्यामुळे झाड डोलत आहे.<br>The tree is swaying in the wind.<br>पेड़ हवा से हिल रहा है। |
| 516. | पावसात<br>तो पाऊस | in the rain<br>बारिश में | ती पावसात भिजते.<br>She gets wet in the rain.<br>वह बारिश में भीगती है। |
| 517. | बाहेर | out<br>बाहर | लवकर बाहेर या.<br>Come out quickly !<br>जल्दी बाहर आओ। |
| 518. | ते इंद्रधनुष्य<br>ती इंद्रधनुष्ये | a rainbow<br>इंद्रधनुष्य | इंद्रधनुष्य पावसाळ्यात दिसते.<br>The rainbow appears in rainy season.<br>बरसात में इंद्रधनुष्य दिखता है। |
| 519. | भिजणे | get wet<br>भिगना | तो मुलगा पावसात भिजत आहे.<br>The boy is getting wet in the rain.<br>वह लड़का बरसात में भीग रहा है। |
| 520. | कुडकुडणे | shiver on account of cold weather<br>ठंड़ से काँपना | तो थंडीने कुडकुडतो.<br>He shivers on account of cold.<br>वह ठंड़ से काँपता है। |
| 521. | ती रिमझिम | light & soft rain<br>रिमझिम | पाऊस रिमझिम पडतो.<br>It drizzles.<br>रिमझिम बरसात होती है। |
| 522. | वाढत चाललाय (चालणे) | to go on increasing<br>बढ़ते जाना | पाऊस वाढत चाललाय.<br>The rain is getting heavier.<br>बारिश बढ़ती जा रही है। |
| 523. | बातमी | [222] | |
| 524. | सर्व ठिकाणी | everywhere<br>हर जगह | मुंबईत सर्व ठिकाणी पाऊस पडत आहे.<br>It is raining everywhere in Mumbai.<br>मुंबई मे हर जगह बारिश हो रही है। |
| 525. | ते दृश्य<br>ती दृश्ये | scene / view<br>दृश्य | पावसाची दृश्ये पहा.<br>See the scenes of the rain.<br>बारिश के दृश्य देखें। |
| 526. | पाहू या (पाहणे) | to see<br>देखना | आता आपण समुद्र पाहू या.<br>Now, let's have a look at the sea.<br>अब समंदर देखते है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 527. | आनंद लुटत आहेत<br>(लुटणे)<br>तो आनंद | to enjoy / have fun<br>आनंद लुटना / लेना | लोक पावसाचा आनंद लुटत आहेत.<br>People are enjoying the rains.<br>लोग बारिश का आनंद लुटा रहे हैं। |
| 528. | मनसोक्त | to one's heart's content<br>जी भर के | लोक पावसात मनसोक्त भिजत आहेत.<br>People are getting wet in the rains to their heart's content.<br>बारिश में लोग जी भर के भीग रहे हैं। |
| 529. | ती होडी<br>त्या होड्या | boat<br>नाव | ही कागदी होडी आहे.<br>This is a paper boat.<br>यह कागज की नाव है। |
| 530. | सोडत आहेत (सोडणे) | to let, float<br>बहाना | मुले पाण्यात कागदी होड्या सोडत आहेत.<br>The children are letting the paper boats sail in the water.<br>बच्चे पानी में कागज की नावें बहा रहे हैं। |
| 531. | ते भजे<br>ती भजी | a popular Indian snack, pakoda, a fried stuffed ball made of gram flour & stuffings<br>पकोड़ा | पावसाळ्यात भजी खाण्यात आनंद असतो.<br>Eating Pakodas in the rainy season is a joy.<br>बारिश में पकोड़े खाने में मजा आता है। |
| 532. | ते कणीस<br>ती कणसे | corncob<br>भुट्टा | हे मक्याचे कणीस आहे.<br>This is a corn cob.<br>यह भुट्टा है। |
| 533. | मिळत आहे (मिळणे) | to get<br>मिलना | आपल्याला छान दृश्य पाहायला मिळत आहे.<br>We are getting to see a beautiful scene.<br>हमें सुन्दर दृश्य देखने मिल रहा है। |
| 534. | ती मिशी<br>त्या मिश्या | moustache<br>मूँछ | त्याला भली मोठी मिशी आहे.<br>He has a very big moustache.<br>उसकी बड़ी सी मूँछ है। |
| 535. | पाणी साचणे | water logging<br>पानी जमा होना | किती तरी ठिकाणी पाणी साचत आहे.<br>There is water logging at many places.<br>बहुत सारी जगहों पर पानी जमा हो रहा है। |
| 536. | ती वाहतूक | traffic<br>यातायात | या रस्त्यावर कमी वाहतूक असते.<br>There is less traffic on this road.<br>इस रास्ते पर कम यातायात होती है। |
| 537. | ती कोंडी (होणे) | jam<br>जाम/ अवरोध | पावसामुळे वाहतुकीची कोंडी होते.<br>There is traffic jam on account of the rains.<br>बारिश की वजह से ट्राफिक जाम होता है। |
| 538. | तो खड्डा<br>ते खड्डे | potholes<br>खड्डा | रस्त्यावर जागोजागी खड्डे आहेत.<br>There are many potholes on the road.<br>रास्ते पर जगह जगह खड्डे हैं। |

| | | | |
|---|---|---|---|
| 539. | पाणी शिरणे | water enters<br>पानी घुसना | पावसाळ्यात काही घरांमध्ये पाणी शिरते.<br>During the monsoons, water enters some houses.<br>बारिश के मौसम में कुछ घरों में पानी घुस जाता है। |
| 540. | मजा घेत आहेत<br>ती मजा | tto enjoy<br>मजा लेना | तरुण मुले-मुली पावसाची मजा घेत आहेत.<br>Young boys and girls are enjoying the rains.<br>युवा-युवतियाँ बारिश का मजा ले रहे हैं। |
| 541. | तरुण | young<br>युवा | |
| 542. | ती तारीख<br>त्या तारखा | date<br>तारीख, दिनांक | आज दहा तारीख आहे.<br>It is the tenth today.<br>आज दस तारीख है। |
| 543. | ठरवत आहे (ठरवणे) | to fix<br>तय करना | आई नेहाच्या लग्नाची तारीख ठरवत आहे.<br>Mom is fixing Neha's wedding date.<br>माँ नेहा की शादी की तारीख तय कर रही है। |
| 544. | ते वर्तमानपत्र<br>ती वर्तमानपत्रे | newspaper<br>अखबार | आजी वर्तमानपत्र वाचत आहे.<br>Grandmother is reading the newspaper.<br>दादी अख़बार पढ़ रही है। |
| 545. | का | why<br>क्यों | तुम्ही नेहमी जाहिराती का बघता ?<br>Why do you always watch advertisements?<br>आप हमेशा विज्ञापन क्यों देखते हैं ? |
| 546. | ताज्या<br>ताजा, ताजी, ताजे | fresh<br>ताज़ा | या भाज्या ताज्या आहेत.<br>These vegetables are fresh.<br>ये सब्जियाँ ताज़ी हैं। |
| 547. | ती घडामोड<br>त्या घडामोडी | happenings, events, developments<br>घटना | आता पाहू या आजच्या घडामोडी.<br>Let's now have a look at today's events.<br>अब आजकी घटनाओं पर नजर डालते है। |
| 548. | तो शिपाई<br>ते शिपाई | a peon<br>चपरासी | माझ्या ऑफिसात शिपाई नाही.<br>There is no peon in my office.<br>मेरे दफ्तर में कोई चपरासी नहीं है। |
| 549. | तो अर्ज<br>ते अर्ज | application form<br>अर्ज | रजेचा अर्ज द्या.<br>Give the leave application.<br>छुट्टी की अर्जी दो। |
| 550. | तो पैसा<br>ते पैसे | money<br>पैसे | चेकॉव्हने अंतोनचे पैसे चोरले.<br>Chekhov stole Anton's money.<br>चेकॉव्ह ने अंतोन के पैसे चुराए। |
| 551. | ढिम्म | not at all<br>बिल्कुल | मुली ढिम्म हलत नाहीयेत.<br>The girls are not moving at all.<br>लड़कियाँ बिल्कुल टस से मस नहीं हो रही हैं। |
| 552. | चढायचं (चढणे) | to get on / climb / board<br>चढ़ना | चढायचं कसं आता या गाडीत ?<br>How to get on the train now?<br>अब इस ट्रेन में कैसे चढ़ें ? |

| | | | |
|---|---|---|---|
| 553. | बाई | an expression of relief commonly used by Maharashtrian women.<br>अरे भगवान | चढले बाई एकदाची.<br>Thank God, at last I have boarded the train.<br>हे भगवान, आखिर मैं ट्रेन में चढ़ ही गई। |
| 554. | ढकलतंय (ढकलणे) | to push<br>धकेलना/ धक्का देना | कोण ढकलतंय मला ?<br>Who is pushing me?<br>कौन धक्का दे रहा है मुझे ? |
| 555. | ती गर्दी | crowd<br>भीड़ | गाडीत गर्दी आहे.<br>The train is crowded.<br>ट्रेन में भीड़ है। |
| 556. | तो फेरीवाला<br>ते फेरीवाले | hawker<br>फेरीवाला | फेरीवाले खूप त्रास देतात.<br>The hawkers are a nuisance.<br>फेरीवाले खूब परेशान करते हैं। |
| 557. | ती बाई<br>त्या बायका | woman/ lady<br>औरत, महिला | हा बायकांचा डब्बा आहे.<br>This is a ladies' compartment.<br>यह महिलाओं का डिब्बा है। |
| 558. | या खेपेला | this time<br>इस बार | या खेपेला साफ चुकत आहात.<br>This time you are completely wrong.<br>इस बार आप एकदम गलत हैं। |
| 559. | चुकत आहात (चुकणे) | to be wrong/ to err<br>गलत होना | |
| 560. | दर्शनाला<br>ते दर्शन | devotional beholding of a holy / divine persona, to pay obeisance<br>दर्शन के लिए | तो देवदर्शनाला जातो आणि प्रसाद घेतो.<br>He pays obeisance God and takes 'prasad' as a blessing.<br>वह देव दर्शन के लिए जाता है और प्रसाद लेता है। |
| 561. | तो प्रसाद | a pious offering of eatables to the devotee as a blessing<br>प्रसाद | |
| 562. | तो लेक<br>ते लेक<br>ती लेक<br>त्या लेकी | son / daughter<br>बेटा / बेटी | माझा लेक लग्न करत आहे.<br>My son is getting married.<br>मेरा बेटा शादी कर रहा है। |
| 563. | ती सून<br>त्या सुना | daughter-in-law<br>बेटे की बहू | माझी सून डॉक्टर आहे.<br>My daughter-in-law is a doctor.<br>मेरी बहू डॉक्टर है। |
| 564. | सासरेबुवा<br>तो सासरा<br>ते सासरे | father-in-law<br>ससुर | मयेकर सासरेबुवा होत आहेत.<br>Mayekar is going to become a father-in-law.<br>मयेकर ससुर बननेवाले हैं। |
| 565. | तो पेढा<br>ते पेढे | a common sweet made of solid milk and sugar<br>पेढ़ा | तो पेढा खातो.<br>He eats a pedha.<br>वह पेढ़ा खाता है। |
| 566. | ते कोडे<br>ती कोडी | puzzle / crossword<br>पहेली | हे कोडे सोपे आहे.<br>This is a simple puzzle.<br>यह पहेली आसान है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 567. | 'दगडूशेठ' पावला (पावणे) | to get the grace of God<br>दगडूशेठ गणपति / भगवान मिलना | त्यांना दर्शनाला न जाताच दगडूशेठ पावला.<br>He got the grace of God, even without paying Him a visit.<br>वह मंदिर न जाते हुए भी भगवान को पा गया। |
| 568. | प्रमुख | head / main<br>प्रमुख / हेड | इथे माझे प्रमुख कार्यालय आहे.<br>My headoffice is here.<br>मेरा प्रमुख कार्यालय यहाँ है। |
| 569. | ते कार्यालय<br>ती कार्यालये | office<br>ऑफिस | |
| 570. | ती शाखा<br>त्या शाखा | branch<br>शाखा | आमची कुठेही शाखा नाही.<br>We do not have a branch elsewhere.<br>हमारी कहीं कोई शाखा नहीं है। |
| 571. | ती दिनदर्शिका<br>त्या दिनदर्शिका | a calendar<br>कैलेंडर | ती दिनदर्शिका खूप जुनी आहे.<br>That is a very old calendar.<br>वह कैलेंडर बहुत पुराना है। |
| 572. | तो वार<br>ते वार | a day of the week<br>दिन | आज सोमवार आहे.<br>Today is Monday.<br>आज सोमवार है। |
| 573. | ते निरीक्षण<br>ती निरीक्षणे | observation<br>निरीक्षण, अवलोकन | तुझे निरीक्षण बरोबर आहे.<br>Your observation is correct.<br>तुम्हारा निरीक्षण सही है। |
| 574. | ती किंमत<br>त्या किमती | price, value<br>कीमत | या पुस्तकाची किंमत २० रुपये आहे.<br>The price of this book is Rs. 20.<br>इस पुस्तक की कीमत २० रुपये है। |
| 575. | ती माहिती | information<br>जानकारी | आता थोडी माहिती सांगतो.<br>I'll now give you some information.<br>अब कुछ जानकारी देता हूँ। |
| 576. | ती बासरी<br>त्या बासऱ्या | flute<br>बांसुरी | मी बासरी शिकतो.<br>I learn the flute.<br>मैं बांसुरी सीखता हूँ। |
| 577. | सोळावं वरीस धोक्याचं | - | Sweet sixteen calls for caution !<br>सोलहवा साल मतलब खतरे की घंटी। |
| 578. | सतरा ठिकाणी फिरणे | (Lit.) to roam around, travel a lot, (Fig.) to have seen the world<br>बहुत सारी जगहोंपर घूमना, दुनिया देखना | मी सतरा ठिकाणी फिरलोय. मला शहाणपण शिकवू नकोस.<br>I have seen the world. So don't teach me wisdom.<br>मैंने दुनिया देखी है। मुझे होशियारी मत सिखाओ। |
| 579. | अठरा विश्वे दारिद्र्य | extreme poverty<br>घोर गरीबी | त्याच्या घरी अठरा विश्वे दारिद्र्य आहे.<br>He lives in extreme poverty.<br>उसके घर घोर गरीबी है। |
| 580. | बत्तिशी दाखवणे | to laugh peevishly and foolishly<br>बत्तीसी दिखाना | उत्तर दे. नुसती बत्तीशी दाखवू नकोस.<br>Answer. Don't just laugh foolishly.<br>बत्तीसी मत दिखा। उत्तर दे। |

| | | | |
|---|---|---|---|
| 581. | छत्तीसचा आकडा | to be at loggerheads / not to see eye to eye<br>छत्तीस का आकडा | राहुल आणि सुमनचा छत्तीसचा आकडा आहे.<br>Rahul and Suman don't see eye to eye in anything.<br>राहुल और सुमन में छत्तीस का आकडा है। |
| 582. | पुल्लिंगी<br>(पुल्लिंग) | [433] | |
| 583. | नपुंसकलिंगी<br>(नपुंसकलिंग) | neuter<br>नपुंसकलिंग | 'ते' हे एक नपुंसकलिंगी सर्वनाम आहे.<br>'te' is a neuter pronoun. (in Marathi)<br>'ते' यह एक मराठी नपुसकलिंगी सर्वनाम है। |
| 584. | ईकारान्त | word ending in sound 'long i:'<br>ईकारान्त | 'वही' हा ईकारान्त शब्द आहे.<br>'vahi' is a word ending in long 'i:' sound.<br>'वही' एक ईकारान्त शब्द है। |

पाठ ६ | CHAPTER 6

| क्र./No. | शब्द/वाक्य / Word/Sentence | अर्थ / Meaning | उदाहरण / Example |
|---|---|---|---|
| 585. | तो आहार<br>ते आहार | diet<br>आहार | |
| 586. | हॉटेलमध्ये ऑर्डर देणे, बिल मागवणे. | to place an order in a restaurant and ask for a bill.<br>होटल में ऑर्डर देना, बिल मंगाना। | |
| 587. | विविध खाद्यपदार्थांविषयी बोलणे. | to talk about various eatables.<br>विविध खाद्यपदार्थों के बारें में बोलना। | |
| 588. | इतरांचे वर्णन करणे. | to describe others<br>दूसरों का वर्णन करना। | |
| 589. | एखाद्या प्रसंगाचे वर्णन करणे | to describe a situation / an event<br>किसी घटना का विवरण करना। | |
| 590. | आपल्या इच्छा व्यक्त करणे | to express one's wish<br>अपनी इच्छा व्यक्त करना | |
| 591. | ती खाऊगल्ली<br>त्या खाऊगल्ल्या | food street<br>खाऊगली | जुन्या दिल्लीत खाऊगल्ली आहे.<br>There is a food street in old Delhi.<br>पुरानी दिल्ली में खाऊगली है। |
| 592. | चमचमीत | highly spiced & seasoned<br>चटपटा | बलबीरला चमचमीत पदार्थ आवडतात.<br>Balbeer likes spicy food.<br>बलबीर को चटपटे व्यंजन पसंद हैं। |
| 593. | मसालेदार | spicy | मसालेदार पदार्थ नेहमी खाऊ नयेत.<br>One should not eat spicy food regularly.<br>मसालेदार व्यंजन हमेशा नहीं खाने चाहिये। |
| 594. | तो बटाटावडा<br>ते बटाटेवडे | a spicy dish, balls of stuffed potatoes fried in oil<br>बटाटावडा | मला बटाटावडा आवडतो.<br>I like batatavada.<br>मुझे बटाटावडा पसंद है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 595. | ते उपाहारगृह<br>ती उपाहारगृहे | restaurant, hotel<br>रेस्टोरेन्ट / होटल | उपाहारगृहात स्वच्छता असणे अत्यंत गरजेचे असते.<br>Maintaining cleanliness in the restaurant is necessary.<br>रेस्टोरेन्ट में सफाई रखना जरूरी होता है। |
| 596. | ते पोहे | a breakfast snack of steamed flat parched rice<br>पोहे | चहाबरोबर पोहे छान लागतात.<br>'Pohe' taste nice with tea.<br>चाय के साथ पोहे अच्छे लगते हैं। |
| 597. | हवंय (हवे असणे) | to want<br>चाहिए | मला चॉकलेट हवंय.<br>I want a chocolate.<br>मुझे चॉकलेट चाहिए। |
| 598. | घेणार (घेणे) | to take/ have<br>लेना | मी चहा घेणार.<br>I'll have tea.<br>मैं चाय लूँगा। |
| 599. | फक्त | only<br>सिर्फ | मी फक्त चहा पितो.<br>I drink only tea.<br>मैं सिर्फ चाय पीता हूँ। |
| 600. | तो उपमा | a delicacy made of semolina<br>उपमा | मला उपमा आवडतो.<br>I like upma.<br>मुझे उपमा पसंद है। |
| 601. | ती पुरणपोळी<br>त्या पुरणपोळ्या | a Marathi sweet made of ground gram pulse and jaggery in flat wheat bread.<br>पुरनपोली | पुरणपोळी फार गोड असते.<br>Puranpoli is very sweet.<br>पुरनपूरी मीठी होती है। |
| 602. | ते लिंबूसरबत | lemon squash / juice<br>नींबू शरबत | उन्हाळ्यात लिंबूसरबत पिणे चांगले.<br>It's good to have a lemon drink in summer.<br>गर्मियों में नींबू शरबत पीना अच्छा होता है। |
| 603. | ते पीयूष | a sweet drink made of curd water and a dash of saffron etc.<br>दही के पानी से बना एक केसरयुक्त मीठा पानी | पीयूष हे पेयही छान असते.<br>The drink 'Piyush' is also good.<br>पीयुष भी अच्छा पेय है। |
| 604. | उकडतंय (उकडणे) | being / feeling hot<br>बहुत गर्मी होना | किती उकडतंय बाई!<br>Oh God, how hot it is!<br>हे भगवान, कितनी जबरदस्त गर्मी है। |
| 605. | गरम होणे | get hot<br>गरमी पड़ना | या वर्षी फारच गरम होत आहे.<br>This year it is so hot.<br>इस साल कितनी गर्मी पड़ रही है! |
| 606. | तरतरी येणे | to feel fresh<br>तरो ताजा होना / लगना | चहामुळे तरतरी येते.<br>Tea refreshes one.<br>चाय तरोताजा कर देती है। |
| 607. | केव्हापासून | for a long time<br>कितनी देर से | तो याच विषयी केव्हापासून बोलतोय?<br>How long has he been talking on the same topic?<br>वह इसी विषय पर कितनी देर से बोल रहा है? |

पाठ ३

| | | | |
|---|---|---|---|
| 608. | तो बर्फ | ice<br>बर्फ | सरबतात बर्फ नको.<br>No ice in the juice, please.<br>शरबत में बर्फ नहीं चाहिए। |
| 609. | तो शिरा | a sweet dish made of semolina<br>शिरा | मला गोड शिरा आवडतो.<br>I like sweet shira.<br>मीठा हलवा मुझे पसंद है। |
| 610. | सरकव (सरकवणे) | to pass / slide / push<br>सरकाना | ती वाटी सरकव इकडे.<br>Pass the bowl here.<br>वह कटोरी इधर सरका दे। |
| 611. | आंबट | sour<br>खट्टा | लिंबूसरबत जास्तच आंबट आहे.<br>The lemonade is too sour.<br>नींबू शरबत बहुत खट्टा है। |
| 612. | तिखट | spicy / hot<br>तीखा | मिरची तिखट असते.<br>Chilli is hot.<br>मिर्ची तीखी होती है। |
| 613. | चविष्ट | tasty<br>स्वादिष्ट | शिरा चविष्ट आहे.<br>The 'shira' is tasty.<br>हलवा स्वादिष्ट है। |
| 614. | खरंच | indeed, really<br>सच्ची | तू खरंच येतोयस ना?<br>You are really coming, aren't you?<br>तू सचमुच आ रहा है ना? |
| 615. | झणझणीत | very hot<br>खूब तीखा | झणझणीत मिसळीवर गरम चहाचा उतारा नको?<br>How about an antidote / remedy of sweet tea over the fiery hot missal?<br>इतनी तेज मिर्ची वाली मिसल पर गरम चाय का जवाब नहीं। |
| 616. | तो उतारा<br>ते उतारे | paragraph, antidote<br>अनुच्छेद, प्रतिकार | |
| 617. | ती आठवण<br>त्या आठवणी | memory<br>याद | तिला माझी आठवण आहे.<br>She remembers me.<br>उसे मैं याद हूँ। |
| 618. | चटपटीत | zesty / tangy / pungent<br>चटपटा | अमेरिकेत चटपटीत खाणे क्वचित मिळते.<br>One hardly gets zesty food in the U.S.<br>अमेरिका में चटपटा खाना कम मिलता है। |
| 619. | पाठवणे | to send<br>भेजना | रमा रोशनला पत्र पाठवते.<br>Rama sends a letter to Roshan.<br>रमा रोशन को पत्र भेजती है। |
| 620. | ती मदत | help<br>मदद | मला मदत कर.<br>Help me, please.<br>मेरी मदद कर। |
| 621. | नक्की | definitely / surely / without fail<br>पक्का | उद्या नक्की ये.<br>Come tomorrow without fail.<br>कल पक्का आ। |
| 622. | कष्टाळू | hardworking<br>मेहनती | रामू कष्टाळू आहे.<br>Ramu is hardworking.<br>रामू मेहनती है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 623. | रडवते (रडवणे) | to make someone cry<br>रुलाना | मनोहर बंटीला रडवतो.<br>Manohar makes Bunty cry.<br>मनोहर बंटी को रुलाता है। |
| 624. | पाय लावू (लावणे)<br>तो पाय<br>ते पाय | to touch with feet<br>पैर लगाना | पुस्तकाला पाय लावू नये.<br>One should not touch the book with feet.<br>पुस्तक को पैर न लगाएँ। |
| 625. | ती लपाछपी | hide-n-seek<br>लुकाछुपी | चला, लपाछपी खेळू या.<br>Come; let's play hide-n-seek.<br>चलो, लुकाछुपी खेलते हैं। |
| 626. | चिडवतोस (चिडवणे) | to tease<br>चिढ़ाना | मला चिडवू नकोस.<br>Don't tease me!<br>मुझे चिढ़ाओ मत। |
| 627. | शोधतोय (शोधणे) | to search<br>ढूंढना | तो त्यांना शोधतोय.<br>He is looking for them.<br>वह उन्हें ढूँढ रहा है। |
| 628. | बस शोधत<br>(शोधत बसणे) | to keep searching<br>ढूँढते रहना | आता बस शोधत.<br>Now keep searching.<br>अब ढूँढते रहो। |
| 629. | टोलवाटोलवी (करणे)<br>ती टोलवाटोलवी | to pass on the buck, to evade<br>टालना | टोलवाटोलवी करू नका.<br>Don't pass on the buck.<br>टाल मटोल मत करो। |
| 630. | सुट्टीवर<br>ती सुट्टी<br>त्या सुट्ट्या | on leave<br>छुट्टी पर | त्या आज सुट्टीवर आहेत.<br>She (formal) is on leave today.<br>वह आज छुट्टी पर हैं। |
| 631. | ती तक्रार<br>त्या तक्रारी | complaint<br>शिकायत | त्यांच्याकडे तक्रार नोंदवता येते का ?<br>Is it possible to register the complaint with him?<br>उनके पास शिकायत दर्ज करा सकते हैं क्या ? |
| 632. | नोंदवता (नोंदवणे) | to register<br>दर्ज करना | |
| 633. | कामाकरिता | for the work<br>काम के लिए | कामाकरिताच नेमलंय ना तुम्हाला ?<br>Aren't you appointed here to work only?<br>आप यहाँ काम करने के लिए ही नियुक्त किए गए हैं न ? |
| 634. | नेमलंय (नेमणे) | to appoint<br>नियुक्त करना | |
| 635. | उद्या | tomorrow<br>कल | उद्या या.<br>Come tomorrow.<br>कल आइये। |
| 636. | रिकामी | empty<br>खाली | दुपारी ट्रेन रिकामी असते.<br>The train runs empty in the afternoon.<br>दोपहर को ट्रेन खाली होती है। |
| 637. | पूर्वी % नसायची (नसणे) | earlier it was not so<br>पहले नहीं होती थी | पूर्वी रविवारी गर्दी नसायची.<br>Earlier it was not crowded on Sundays.<br>पहले रविवार को भीड़ नहीं होती थी। |

| | | | |
|---|---|---|---|
| 638. | उन्हाळ्यात<br>तो उन्हाळा<br>ते उन्हाळे | in the summers<br>गर्मियों में | उन्हाळ्यात सुट्टी असते.<br>There are vacations in summer.<br>गर्मियों में छुट्टियाँ होती हैं। |
| 639. | सुरू कर (करणे) | start / switch on<br>शुरू करना | पंखा सुरू कर.<br>Switch on the fan.<br>पंखा चालू कर। |
| 640. | चित्रपटाला<br>तो चित्रपट<br>ते चित्रपट | film / movie<br>फिल्म, सिनेमा | आम्ही चित्रपटाला जातोय.<br>We are going for a movie.<br>हम फिल्म देखने जा रहे हैं। |
| 641. | जागी असते | to remain awake<br>जागे रहना | मी रात्री उशिरापर्यंत जागी असते.<br>I (f) stay awake till late in the night.<br>मैं देर रात तक जगी रहती हूँ। |
| 642. | ती थंडी | cold<br>ठंड | इकडे नेहमीच थंडी असते.<br>It is always cold here.<br>यहाँ हमेशा ठंड होती है। |
| 643. | बंद | closed<br>बंद | दर सोमवारी हे दुकान बंद असते.<br>This shop is closed every Monday.<br>यह दुकान हर सोमवार को बंद रहती है। |
| 644. | भांडत असणे (भांडणे) | to fight<br>झगड़ना | ते दररोज भांडत असतात.<br>They fight every day.<br>वे हर रोज झगड़ते हैं। |
| 645. | गोंगाट असतो (असणे)<br>तो गोंगाट | noise / commotion<br>शोर शराबा | बाजारात गोंगाट असतो.<br>There is a lot of noise / commotion in the market<br>बाजार में शोर शराबा होता है। |
| 646. | कडक | hard / solid<br>कडक | कच्चा बटाटा कडक असतो.<br>Raw potato is hard.<br>कच्चा बटाटा कड़ा होता है। |
| 647. | तेच | the same<br>वही | मीपण तेच घेईन.<br>I will also take the same.<br>मैं भी वही लूँगा। |
| 648. | थाळीत<br>ती थाळी<br>त्या थाळ्या | in the thali (plate)<br>थाली में | काय काय असतं रे थाळीत ?<br>What is there in the thali ?<br>थाली में क्या क्या होता है ? |
| 649. | ती भाजी<br>त्या भाज्या | vegetable (raw /cooked)<br>सब्जी | भाजी प्रकृतीसाठी चांगली असते.<br>Vegetables are good for health.<br>सब्जी स्वास्थ्य के लिये अच्छी होती है। |
| 650. | ती रसभाजी<br>त्या रसभाज्या | cooked vegetable with gravy<br>रसेदार सब्जी | मला रसभाजी आवडते.<br>I like vegetable with gravy.<br>मुझे रसेदार सब्जी पसंद है। |
| 651. | ती सुकी भाजी<br>त्या सुक्या भाज्या | vegetable without gravy<br>सूखी सब्जी | बटाट्याची सुकी भाजी व पुरी खा.<br>Have dry potato vegetable with puris.<br>आलू की सूखी सब्जी और पूरी खाओ। |

| | | | |
|---|---|---|---|
| 652. | ती आमटी<br>त्या आमट्या | curry<br>तड़के वाली दाल | आज जेवणात आमटी आहे.<br>Today there is curry for meal.<br>आज खाने में दाल है। |
| 653. | ते ताक | buttermilk<br>छास | इथे ताजे ताक मिळते.<br>Fresh buttermilk is available here.<br>यहाँ ताजा छाछ मिलती है। |
| 654. | ती चपाती<br>त्या चपात्या | round and thin Indian flatbread made of wheat<br>चपाती, रोटी | ही चपाती गरम आहे.<br>This chapati is hot.<br>यह चपाती गरम है। |
| 655. | तो पापड<br>ते पापड | pappadum<br>पापड़ | पापड तळून किंवा भाजून खातात.<br>Pappadum is eaten fried or roasted.<br>पापड़ तल के या भून के खाते हैं। |
| 656. | लय (खूप), लई | a lot (rustic Marathi)<br>खूब | मला आंबट गोष्टी लय आवडतात.<br>I like sour things a lot.<br>मुझे खट्टी चीज़ें बहुत पसन्द है। |
| 657. | ते लोणचे / लोणचं<br>ती लोणची | pickle<br>अचार | मी लोणचं खात नाही.<br>I don't eat pickles.<br>मैं अचार नहीं खाता। |
| 658. | ती फोड<br>त्या फोडी | slice / piece<br>फाँक / टुकड़ा | ही सफरचंदाची फोड आहे.<br>This is a slice of apple.<br>यह सेब की एक फाँक है। |
| 659. | ती बासुंदी | sweet dish of boiled, thickened milk with sugar, saffron<br>बासुंदी | मला बासुंदी व श्रीखंड दोन्ही आवडतात.<br>I like both basundi and shreekhand.<br>मुझे बासुंदी और श्रीखंड दोनों पसंद हैं। |
| 660. | राहील (राहणे) | to remain<br>रहेगा | राहील ना आता लक्षात ?<br>Now you will keep that in mind, won't you ?<br>रहेगा ना अब ध्यान में ? |
| 661. | पोटामध्ये<br>ते पोट<br>ती पोटं / पोटे | in the stomach<br>पेट में | पोटामध्ये काही जाईल तर नक्की लक्षात राहील.<br>If something goes in my stomach (if I get to eat something), I will certainly remember.<br>पेट में कुछ जाएगा, तो पक्का याद रहेगा। |
| 662. | रांगेत<br>ती रांग<br>त्या रांगा | in queue<br>कतार में | तो रांगेत उभा राहतो.<br>He stands in the queue.<br>वह कतार में खड़ा होता है। |
| 663. | वाट पाहतो<br>ती वाट<br>त्या वाटा | to wait<br>इंतजार करना | तो माझी वाट पाहतो.<br>He waits for me.<br>वह मेरा इंतजार करता है। |
| 664. | तो कर्मचारी<br>ते कर्मचारी | a worker / an employee<br>कर्मचारी | या कार्यालयात खूप कर्मचारी दिसतात.<br>Many employees are seen in this office.<br>इस कार्यालय में बहुत कर्मचारी दिखते हैं। |

| | | | |
|---|---|---|---|
| 665. | तपासतो<br>(तपासणे) | to check<br>जाँचना | कर्मचारी अर्ज तपासतो.<br>The officer checks the application.<br>कर्मचारी आवेदन पत्र जाँचता है। |
| 666. | आवश्यक | necessary<br>जरूरी | ओळखपत्र आवश्यक आहे.<br>Proof of identity is necessary.<br>पहचान पत्र जरूरी है। |
| 667. | ते कागदपत्र<br>ती कागदपत्रे | documents, papers<br>कागज़ात | तिची आवश्यक कागदपत्रे हरवली.<br>Her important documents are lost.<br>उसके (f) ज़रूरी कागज़ात खो गये। |
| 668. | पुन्हा पुन्हा | again & again<br>बार बार | भार्गव पुन्हा पुन्हा कागदपत्रे पाहतो.<br>Bhargav looks at his documents again & again.<br>भार्गव बार बार कागजात देखता है। |
| 669. | ते मतदान | election<br>मतदान | तुमचं मतदान-ओळखपत्र कुठेय ?<br>Where is your voter's identity card?<br>आपका मतदान पहचान पत्र कहाँ है ? |
| 670. | ते ओळखपत्र<br>ती ओळखपत्रे / ओळखपत्रं | proof of identity<br>पहचान पत्र | |
| 671. | विजेचंच<br>ती वीज<br>त्या विजा | electricity<br>बिजली | विजेचंच बिल द्या.<br>Give the electricity bill (only).<br>बिजली का बिल ही दें। |
| 672. | पत्त्याचा पुरावा | proof of address<br>पते का प्रमाण | - |
| 673. | तातडीने | urgently<br>तत्काल | त्याला तातडीने पासपोर्ट हवाय.<br>He urgently requires a passport.<br>उसे तत्काल पासपोर्ट चाहिये। |
| 674. | विनंती (करणे)<br>ती विनंती<br>त्या विनंत्या | request<br>निवेदन | मी तुला विनंती करते.<br>This is my (f) request to you.<br>मैं तुमसे निवेदन करती हूँ। |
| 675. | पण / सुद्धा / ही / देखील | also<br>भी | जोशीपण / जोशीसुद्धा / जोशीही / जोशीदेखील लंडनला जात आहेत.<br>Joshi, too, is going to London.<br>जोशी भी लंडन जा रहे हैं। |
| 676. | लठ्ठ | fat<br>मोटा / मोटी | तैमूर लठ्ठ आहे.<br>Taimoor is fat.<br>तैमूर मोटा है। |
| 677. | ठेंगणा (स) /<br>ठेंगणी () | short in height<br>नाटा / नाटी | मी ठेंगणा / ठेंगणी आहे.<br>I am short.<br>मैं नाटा / नाटी हूँ। |
| 678. | गरीब | poor<br>गरीब | मी गरीब आहे.<br>I am poor.<br>मैं गरीब हूँ। |
| 679. | हुशार | intelligent, sharp<br>होशियार | अब्दुल सलमापेक्षा हुशार आहे.<br>Abdul is more intelligent / sharper than Salma.<br>अब्दुल सलमा से होशियार है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 680. | आळशी | lazy<br>आलसी | तो खूप आळशी आहे.<br>He is very lazy.<br>वह (स) बहुत आलसी है। |
| 681. | सुरेल | melodious / melodiously<br>सुरीला | श्रेया सुरेल गाते.<br>Shreya sings pretty melodiously.<br>श्रेया सुरीला गाती है। |
| 682. | बेसूर | not in tune<br>बेसुरा | ती बेसूर गाते.<br>She does not sing in tune.<br>वह बेसुरा गाती है। |
| 683. | धीट | bold, courageous<br>ढ़ीठ | तो धीट आहे.<br>He is bold.<br>वह (m) ढीठ है। |
| 684. | प्रेमळ | affectionate<br>स्नेही, स्नेहल | मदर टेरेसा प्रेमळ होत्या.<br>Mother Teresa was affectionate.<br>मदर टेरेसा स्नेहल थीं। |
| 685. | घाबरट | faint-hearted<br>डरपोक | तो घाबरट आहे.<br>He is faint-hearted.<br>वह (m) डरपोक है। |
| 686. | रागीट | hot-headed<br>गुस्सैल | ती रागीट आहे.<br>She is always hot-headed.<br>वह गुस्सैल है। |
| 687. | ती भूक | hunger<br>भूक | मला भूक लागली आहे.<br>I am hungry.<br>मुझे भूख लगी है। |
| 688. | ती तहान | thirst<br>प्यास | मला तहान लागली आहे.<br>I am thirsty.<br>मुझे प्यास लगी है। |
| 689. | आधी | before, first<br>पहले | चिंटू 'भूक भूक' करत यायच्या आधी पोहे करून ठेवते.<br>Before Chintoo comes home hungry, I will keep pohe ready.<br>चिंटू 'भूख भूख' करते आए उससे पहले पोहे बना कर रख देती हूँ। |
| 690. | आल्यानंतर | after coming<br>आने के बाद | तो आल्यानंतर तयारीला लागलं तर चिडतो.<br>He gets angry, if I start preparing (the food) after he comes.<br>उसके आने के बाद तैयारी करने लगने पर वह चिढ़ता है। |
| 691. | तयारीला | for preparing<br>तैयारी के लिए | |
| 692. | चिडतो (चिडणे) | to get angry<br>चिढ़ना | |
| 693. | म्हणून | that is why<br>इसलिए | म्हणून मी सांगत होते...<br>That is why I was saying...<br>इसलिए मैं कह रही थी... |

पाठ ३

| | | | |
|---|---|---|---|
| 694. | खाई त्याला खवखवे | - | (Lit.) The one who eats, has an itching sensation in the throat. (Fig.) The person who has done something wrong always fears that he / she would be found out.<br>चोर की दाढ़ी में तिनका। |
| 695. | कानामागून आली आणि तिखट झाली | - | (Lit.) Came from behind the ear and became very hot (spicy). (Fig.) Your junior tries to get the better of you.<br>बाद में आना और फिर भी बाज़ी मार ले जाना। |
| 696. | शितावरून भाताची परीक्षा | - | (Lit.) By checking one grain of cooked rice, one comes to know if the entire rice is cooked. (Fig.) Coming to a valid broader conclusion by a particular proof.<br>पके चावल के एक दाने से मालूम चल जाता है कि सारा चावल पका या नहीं। |
| 697. | घरोघरी मातीच्या चुली | - | (Lit.) All houses have ovens of clay. (Fig.) It is the same story everywhere.<br>घर घर की कहानी। |
| 698. | खाईन तर तुपाशी, नाहीतर उपाशी | - | (Lit.) One either eats a lavish meal made of ghee or remains without food. (Fig.) To have the best or nothing.<br>घी की दावत उड़ाना या उपवास कर लेना। |
| 699. | कडू कारले, तुपात तळले, साखरेत घोळले, तरी कडू ते कडूच | - | (Lit.) You may fry it in ghee or turn it in sugar, bitter gourd remains as bitter as ever. (Fig.) Evil nature does not change.<br>कुत्ते की दुम टेढ़ी की टेढ़ी ही रहती है। |

## पाठ ७ | CHAPTER 7

| क्र./No. | शब्द/वाक्य / Word/Sentence | अर्थ / Meaning | उदाहरण / Example |
|---|---|---|---|
| 700. | खरेदी | shopping<br>खरीदी | |
| 701. | गरज व्यक्त करणे | to express one's need<br>जरूरत व्यक्त करना | |
| 702. | बाजारात / दुकानात खरेदी करणे | to shop at a market / in a shop<br>बाजार / दुकान में खरीदारी करना | |
| 703. | वस्तूंच्या किंमती सांगणे आणि विचारणे. | to tell and ask for prices of goods<br>वस्तुओं की कीमत पूछना और बताना | |
| 704. | वजने आणि मापे | weights and measurements<br>तोल और माप | |
| 705. | अंक ५१ ते १०० | numbers from 51 to 100<br>अंक ५१ से १०० | |

| | | | |
|---|---|---|---|
| 706. | हिला | her<br>इसे | |
| 707. | ती मुलगी<br>त्या मुली | a girl / daughter<br>लड़की / बेटी | किरण एक चांगली मुलगी आहे.<br>Kiran is a good girl.<br>किरन एक अच्छी लड़की है। |
| 708. | तो मुलगा<br>ते मुलगे | a boy / son<br>लड़का / बेटा | सुशांत हा एक हुशार मुलगा आहे.<br>Sushant is a clever boy.<br>सुशांत एक होशियार लड़का है। |
| 709. | तो वेळ | time<br>समय | आपल्याकडे खूप कमी वेळ आहे.<br>We have very little time.<br>हमारे पास बहुत कम समय है। |
| 710. | वेळ | [219] | |
| 711. | तो कपडा<br>ते कपडे | clothes<br>कपडे | त्याचे कपडे फाटले आहेत.<br>His clothes are torn.<br>उसके कपडे फटे हैं। |
| 712. | तो साबण<br>ते साबण | soap<br>साबुन | हात साबणाने धुवावेत.<br>One must wash one's hands with soap.<br>हाथ साबुन से धोने चाहिये। |
| 713. | जवळच | nearby<br>पास ही | माझं घर जवळच आहे.<br>My house is nearby.<br>मेरा घर पास ही है। |
| 714. | मजबूत | strong<br>मजबूत | या खुर्च्या मजबूत आहेत.<br>These chairs are strong.<br>ये कुर्सियाँ मजबूत हैं। |
| 715. | एकाच ठिकाणी | at the same place<br>एक ही जगह पर | माझी मैत्रीण आणि मी एकाच ठिकाणी काम करतो.<br>My friend (f) and I work at the same place.<br>मेरी सहेली और मैं एक ही जगह पर काम करते हैं। |
| 716. | विसरलो (विसरणे) | to forget<br>भूलना | मी तुला सांगायला विसरलो.<br>I (m) forgot to tell you.<br>मैं तुम्हें बताना भूल गया। |
| 717. | ती भाजीवाली<br>त्या भाजीवाल्या<br>(तो भाजीवाला) | vegetable vendor (f)<br>सब्जीवाली | त्या भाजीवालीकडे चांगली भाजी मिळते.<br>One gets good vegetables at that vendor (f).<br>उस सब्जीवाली के पास अच्छी सब्जी मिलती है। |
| 718. | ती गल्ली<br>त्या गल्ल्या | lane<br>गली | ही गल्ली खूप शांत आहे.<br>This lane is very quiet.<br>यह गली बड़ी शांत है। |
| 719. | तो बटाटा<br>ते बटाटे | potato<br>आलू | उत्तर भारतात बटाटा खूप खातात.<br>In north India people eat a lot of potatoes.<br>उत्तर भारत में आलू बहुत खाते हैं। |

| | | | |
|---|---|---|---|
| 720. | तो कांदा<br>ते कांदे | onion<br>प्याज | तो कच्चा कांदा खात नाही.<br>He doesn't eat raw onion.<br>वह कच्चा प्याज नहीं खाता। |
| 721. | तो वाटाणा / तो मटार<br>ते वाटाणे / ते मटार | peas<br>मटर | वाटाणा गोल असतो.<br>Peas are round in shape.<br>मटर गोल होता है। |
| 722. | तो टोमॅटो<br>ते टोमॅटो | tomato<br>टमाटर | कच्चा टोमॅटो आंबट लागतो.<br>Raw tomato tastes sour.<br>कच्चा टमाटर खट्टा लगता है। |
| 723. | तो फ्लॉवर<br>ते फ्लॉवर | cauliflower<br>फूल गोभी | कसा दिला हा फ्लॉवर ?<br>How much for the cauliflower ?<br>फूल गोभी कैसी दी ? |
| 724. | तो पालक<br>ते पालक | spinach<br>पालक | पालक हिरवा असतो.<br>Spinach is green.<br>पालक हरा होता है। |
| 725. | ती मिरची<br>त्या मिरच्या | chilly<br>मिर्च | ही लाल मिरची पाहा.<br>Look at this red chilly.<br>यह लाल मिर्च देखो। |
| 726. | ती काकडी<br>त्या काकड्या | cucumber<br>खीरा | काकडी त्वचेसाठी चांगली असते.<br>Cucumber is good for skin.<br>खीरा त्वचा के लिये अच्छा होता है। |
| 727. | ते गाजर<br>ती गाजरे | carrot<br>गाजर | आज गाजर हलवा करू.<br>Let's make carrot halwa today.<br>आज गाजर का हलवा बनाते हैं। |
| 728. | ते वांगे<br>ती वांगी | brinjal/ aubergine<br>बैंगन | ते वांगी का खात नाहीत ?<br>Why don't they eat brinjal?<br>वे बैंगन क्यों नहीं खाते ? |
| 729. | ती मावशी<br>त्या मावश्या | aunt (mother's sister), here; a popular form of address for elderly women<br>मौसी, मराठी में प्रौढ़ महिलाओं के लिए सम्बोधन | - |
| 730. | तो रुपया<br>ते रुपये | rupee / rupees<br>रुपया, रुपये | फ्लॉवर ७० रुपये किलो आहे.<br>Cauliflower is Rs. 70 per kilogram.<br>फूल गोभी ७० रुपये किलो है। |
| 731. | तो भाव<br>ते भाव | price, rate<br>भाव | जरा भाव कमी करा.<br>Please reduce the price.<br>जरा भाव कम कीजिए। |
| 732. | ती महागाई | inflation<br>महँगाई | महागाई वाढली.<br>Things have become more expensive.<br>महँगाई बढ़ गई है। |
| 733. | पाव | a quarter<br>पाव | पाव किलो फ्लॉवर द्या.<br>Give a quarter kg of cauliflower.<br>एक पाव फूल गोभी दीजिए। |

| | | | |
|---|---|---|---|
| 734. | अर्धा | half<br>आधा | कोबी द्या, अर्धा किलो.<br>Give half a kilo of cabbage.<br>आधा किलो पत्ता गोभी देना। |
| 735. | ही / पण | also<br>भी | थोड्या मिरच्याही द्या.<br>Give some chillies too.<br>थोड़ी मिर्च भी दो। |
| 736. | काही नको | nothing<br>कुछ नहीं | मला आता काही नको.<br>I don't want anything now.<br>अब मुझे कुछ नहीं चाहिये। |
| 737. | ताजा | [546] | |
| 738. | स्वस्त | cheap<br>सस्ता | पालक स्वस्त आहे.<br>Spinach is cheap.<br>पालक सस्ता है। |
| 739. | ती जुडी<br>त्या जुड्या | a bunch<br>जोडी | मला पालकची एक जुडी दे.<br>Give me a bunch of spinach.<br>मुझे पालक की एक गड्डी दो। |
| 740. | विकत घेऊ<br>(विकत घेणे) | to buy<br>खरीदना | चला, फळं विकत घेऊ.<br>Come, let's buy fruits.<br>चलो, फल खरीदते हैं। |
| 741. | तो पेरू<br>ते पेरू | guava<br>अमरूद | तो पेरू गोड आहे.<br>That guava is sweet.<br>वह अमरूद मीठा है। |
| 742. | तो चिक्कू<br>ते चिक्कू | chickoo<br>चीकू | चिक्कू गोड असतो.<br>Chickoo is sweet.<br>चीकू मीठा होता है। |
| 743. | तो आंबा<br>ते आंबे | mango<br>आम | कच्चा आंबा आंबट असतो.<br>Raw mango is sour.<br>कच्चा आम खट्टा होता है। |
| 744. | तो अननस<br>ते अननस | pineapple<br>अनानास | अननस गोड असतो.<br>Pineapple is sweet.<br>अनानास मीठा होता है। |
| 745. | ते संत्रे<br>ती संत्री | orange<br>संत्रा | नागपूरची संत्री प्रसिद्ध आहेत.<br>Oranges from Nagpur are famous.<br>नागपूर के संतरे प्रसिद्ध हैं। |
| 746. | ते केळे<br>ती केळी | banana<br>केला | केळे गोड असते.<br>Bananas are sweet.<br>केला मीठा होता है। |
| 747. | ते सफरचंद<br>ती सफरचंदे | apple<br>सेब | ती सफरचंदे महाग आहेत.<br>Those apples are expensive.<br>वे सेब महँगे हैं। |
| 748. | ते द्राक्ष<br>ती द्राक्षे | grape<br>अंगूर | ही द्राक्षे गोड आहेत.<br>These grapes are sweet.<br>यह अंगूर मीठे हैं। |

| | | | |
|---|---|---|---|
| 749. | ते डाळिंब<br>ती डाळिंबे | pomegranate<br>अनार | ही डाळिंबे महाग आहेत.<br>These pomegranates are expensive.<br>यह अनार महँगे हैं। |
| 750. | ते कलिंगड<br>ती कलिंगडे | water melon<br>तरबूज | मला कलिंगडाचा रस आवडतो.<br>I like water melon juice.<br>मुझे तरबूज का रस पसन्द है। |
| 751. | ती पपई<br>त्या पपया | papaya<br>पपीता | ही पपई गोड आहे.<br>This papaya is sweet<br>यह पपीता मीठा है। |
| 752. | ती पिढी<br>त्या पिढ्या | generation<br>पीढी | आजची पिढी खूप जागरूक आहे.<br>The present generation is quite aware.<br>आज की पीढी बहुत जागरूक है। |
| 753. | जागरूक | aware/ informed<br>जागरूक | |
| 754. | नवीन | [417] | |
| 755. | जुने | old<br>पुराने | हे लेगिंग्ज जुने आहेत.<br>These leggings are old.<br>ये लैगिंग्ज़ पुराने हैं। |
| 756. | त्यावर | on that<br>उस पर | त्यावर हे कानातले छान दिसतेय ना ?<br>The earrings are going well with that, Aren't they?<br>यह कान की बाली उसपर अच्छी लगती है न ? |
| 757. | ते कानातले / कानातलं<br>ती कानातली | earrings<br>कान के | |
| 758. | झकास | superb/ awesome<br>फर्स्ट क्लास | हे एकदम झकास कॉम्बीनेशन आहे.<br>This is an awesome combination.<br>यह बेहतरीन कॉम्बिनेशन (मेल) है। |
| 759. | ती झोळी<br>त्या झोळ्या | sling bag<br>झोला | ही माझी झोळी आहे.<br>This is my bag.<br>यह मेरा झोला है। |
| 760. | तो झब्बा<br>ते झब्बे | Indian shirt with full sleeves<br>झब्बा | छोट्या मुलांना झब्बा चांगला दिसतो.<br>The zhabbaa looks good on small children.<br>छोटे बच्चों पर झब्बा अच्छा दिखता है। |
| 761. | ती ओढणी<br>त्या ओढण्या | a long stole, dupatta<br>दुपट्टा | स्त्रिया सलवार-कमीजवर ओढणी घेतात.<br>Ladies wear a dupatta with salwar-kameez.<br>औरतें सलवार-कमीज़ पर दुपट्टा ओढती हैं। |
| 762. | ती साडी<br>त्या साड्या | saree<br>साड़ी | साडी हा भारतीय स्त्रियांचा पारंपरिक पोषाख आहे.<br>A saree is the traditional attire of Indian women.<br>साड़ी भारतीय स्त्रियों की पारंपरिक पोषाक है। |
| 763. | ती सलवार<br>त्या सलवारी | Indian pant<br>सलवार | ही सलवार खूप छान आहे.<br>This is a very nice salwaar.<br>यह सलवार बहुत अच्छी है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 764. | तो चुडीदार<br>ते चुडीदार | Indian tight pant<br>चुड़ीदार | मी हा चुडीदार घेते.<br>I am taking these tights.<br>मैं यह चुड़ीदार लेती हूँ। |
| 765. | ढगळ | very loose<br>ढीला ढाला | ढगळ कपडे ही आताची फॅशनच आहे.<br>Wearing loose clothes is in fashion today.<br>ढीलेढाले कपड़ों का आजकल फॅशन ही है। |
| 766. | लहान | small<br>छोटा | हे घर लहान आहे.<br>This house is small.<br>यह घर छोटा है। |
| 767. | घट्ट | tight<br>तंग | ही पँट खूप घट्ट आहे.<br>This pant is very tight.<br>यह पतलून बहुत तंग है। |
| 768. | सैल | loose<br>ढीला | उन्हाळ्यात जरा सैल कपडे वापरावेत.<br>We should wear loose clothes in summer.<br>गर्मियों में ढीले कपड़े पहनने चाहिये। |
| 769. | लांब | long<br>लंबा | हा शर्ट थोडासा लांब आहे.<br>This shirt is a bit long.<br>यह शर्ट थोड़ा लंबा है। |
| 770. | तो रुमाल<br>ते रुमाल | handkerchief<br>रूमाल | हा रुमाल आहे.<br>It's a handkerchief.<br>यह एक रूमाल है। |
| 771. | बेरीज | [278] | |
| 772. | वजाबाकी | [325] | |
| 773. | चुकली (चुकणे) | to miss<br>छूटना | माझी नेहमीची गाडी चुकली.<br>I missed my usual train.<br>मेरी हर बार वाली ट्रेन छूट गई। |
| 774. | निघतेस (निघणे) | to start off<br>चल देना | एवढ्या लवकर निघतेस तू रोज?<br>Do you start off this early everyday?<br>क्या तू रोज इतनी जल्दी निकलती है? |
| 775. | दिवस | [238] | |
| 776. | तास | [283] | |
| 777. | ते मिनिट<br>ती मिनिटे | minute<br>मिनिट | एका मिनिटात साठ सेकंदे असतात.<br>One minute has 60 seconds.<br>एक मिनिट में साठ सेकंड होते हैं। |
| 778. | ते सेकंद<br>ती सेकंदे | second<br>सेकंद | |
| 779. | विचित्र | strange<br>विचित्र | त्याच्या विचित्र शर्टाबद्दल बोलू नकोस.<br>Don't comment upon his strange shirt.<br>उसके विचित्र शर्ट के बारे में बात मत कर। |

| | | | |
|---|---|---|---|
| 780. | तेवढ्यात | by then<br>इतने में, उसी समय | तेवढ्यात तू आलास...<br>By then you came...<br>इतने में तुम आ गए |
| 781. | ती उपमा<br>त्या उपमा | simile<br>उपमा | चला, उपमा शिकू या<br>Let's learn similes.<br>चलो, उपमा सीखें। |
| 782. | डोक्यात कांदे-बटाटे भरलेले असणे | | to be mutton-headed<br>दिमाग में घासपूस होना |
| 783. | कोल्ह्याला द्राक्षे आंबट | | The grapes are sour<br>लोमड़ी के अंगूर खट्टे |
| 784. | ५६ (छप्पन्न) ... असणे | | to have a thousand excuses / tasks / vices ...<br>हजार बहाने / काम / दोष ... |
| 785. | नाकाला मिरच्या झोंबणे | | (Lit.) To suffer from a burning sensation (in the nose) caused by chillies. (fig.) To feel angry due to insult.<br>अपमान से तिलमिलाना |
| 786. | ढब्बू बटाटा | | mutton-headed<br>भोंदू |
| 787. | साठी बुद्धी नाठी | | over the hill and slow witted after sixty<br>सठिया जाना |
| 788. | सफरचंदासारखे गाल | | apple cheeks<br>सेब जैसे गाल |
| 789. | टॉमेटोसारखे लालबुंद | | red like a tomato<br>टमाटर सा लाल |
| 790. | डाळींबासारखे ओठ | | pomegranate lips<br>अनार से होंठ |



## पाठ ८ | CHAPTER 8

| क्र./No. | शब्द/वाक्य / Word/Sentence | अर्थ / Meaning | उदाहरण / Example |
|---|---|---|---|
| 791. | लक्षात ठेवा | remember / keep in mind.<br>ध्यान में रखो। | |
| 792. | परवानगी देणे / नाकारणे | to grant / deny permission<br>अनुमति देना / न देना | |
| 793. | आभार मानणे | to thank, to express gratitude<br>आभार मानना | |
| 794. | मदत मागणे | to ask for help<br>मदद माँगना | |
| 795. | सल्ला देणे | to give advice<br>सलाह देना | |
| 796. | ती परवानगी<br>त्या परवानग्या | permission<br>अनुमति | कृपया प्राचार्यांना भेटण्यासाठी परवानगी घ्यावी.<br>Please take permission to see the Principal<br>कृपया प्राचार्य से मिलने के लिए अनुमति लीजिए। |

| | | | |
|---|---|---|---|
| 797. | नाकारणे | to reject, deny<br>नकारना | प्राचार्य परवानगी नाकारत आहेत.<br>The Principal is not permitting.<br>प्राचार्य अनुमति नकार रहे हैं। |
| 798. | तो सल्ला<br>ते सल्ले | advice<br>सलाह | त्याने मला सल्ला दिला.<br>He gave me advice.<br>उसने मुझे सलाह दी। |
| 799. | ने (नेणे) | to take along/ take away<br>ले जाना | प्रवासात गरम कपडे ने.<br>Take warm clothes along while travelling.<br>यात्रा पर गरम कपड़े लेकर जा। |
| 800. | घे (घेणे) | to take<br>लेना | हे पुस्तक घे<br>Take this book.<br>यह पुस्तक लो। |
| 801. | ठेव<br>(ठेवणे) | put, keep<br>रखना | ते घड्याळ खणात ठेव.<br>Put the watch in the drawer.<br>वह घड़ी दराज में रखो। |
| 802. | लक्ष दे | - | Pay attention!<br>ध्यान दे! |
| 803. | शांत बस | - | Sit quietly!<br>शांत बैठ! |
| 804. | गप्प रहा | - | Keep quiet!<br>चुप रह / रहो! |
| 805. | हात काढ | - | Take out / away your hand!<br>हाथ निकाल! |
| 806. | भरभर चाल | - | Walk quickly!<br>जल्दी चल! |
| 807. | लगेच इथे ये | - | Come here immediately!<br>जल्दी आ यहाँ! |
| 808. | ओरडू नकोस | - | Don't shout!<br>चिल्ला मत! |
| 809. | पटपट आवर | - | Bring some order quickly (tidy up)!<br>फटाफट अवेरो। |
| 810. | असं/ तसं करू नकोस | - | Don't do this/ that!<br>ऐसे/ वैसे मत कर! |
| 811. | कपडे मळवू नकोस | - | Don't dirty your clothes!<br>कपड़े गंदे मत कर! |
| 812. | ते लगेच परत आण | - | Bring that back, immediately!<br>वह तुरंत यहाँ ला। |
| 813. | तुला कळत नाही का ? | - | You don't understand, do you?<br>तुम्हें समझ नहीं आता क्या ? |
| 814. | बरबटावून घेऊ नकोस. | - | Don't smear / smudge yourself!<br>ठीक से ले! |
| 815. | ते तोंडात घालू नकोस | - | Don't put that in your mouth!<br>वह मुँह में मत डालो! |
| 816. | तुला ऐकू येत नाही का ? | - | Can't you hear ?<br>तुम्हें सुनाई नहीं देता क्या ? |

| | | | |
|---|---|---|---|
| 817. | त्याला हात लावू नकोस | - | Don't touch that!<br>उसे छुओ मत! |
| 818. | ते संगोपन | upbringing<br>संगोपन | बाल-संगोपन हा महत्त्वाचा विषय आहे.<br>Child-upbringing is an important issue.<br>बच्चों का लालन-पालन एक महत्त्वपूर्ण विषय है। |
| 819. | कवितेवर<br>ती कविता<br>त्या कविता | on the poem<br>कविता पर | हे गाणे एका कवितेवर आधारित आहे.<br>This song is based on a poem.<br>यह गाना एक कविता पर आधारित है। |
| 820. | तो मजकूर<br>ते मजकूर | matter/ content<br>विषयवस्तु | पत्रातला मजकूर नीट वाच.<br>Read the matter in the letter carefully.<br>उस खत की विषयवस्तु ठीक से पढ़ो। |
| 821. | तो पेपर<br>ते पेपर | newspaper<br>समाचार-पत्र | तो पेपर वाच.<br>Read the newspaper.<br>वह अखबार पढ़। |
| 822. | ते वृत्तपत्र<br>ती वृत्तपत्रे | newspaper<br>समाचार पत्र | मराठीत २०० हून अधिक वृत्तपत्रे प्रसिद्ध होतात.<br>More than 200 newspapers are published in Marathi.<br>मराठी में २०० से अधिक समाचार पत्र प्रकाशित होते हैं। |
| 823. | उचल<br>(उचलणे) | lift<br>उठाओ | खाली पडलेले कपडे उचल.<br>Lift the clothes lying on the ground.<br>नीचे पड़े हुए कपड़े उठाओ। |
| 824. | लावणे | to switch on<br>लगाना | जरा टी.व्ही. लाव.<br>Please switch on the T.V.<br>जरा टी.वी. चालू करो। |
| 825. | दूध | [87] | |
| 826. | तो मसाला<br>ते मसाले | spices<br>मसाला | सुका मेवा आणि मसाला आणा.<br>Bring dry fruits and spices.<br>सूखा मेवा व मसाला लाइए। |
| 827. | तो मेवा<br>ते मेवे | dry-fruits<br>मेवा | |
| 828. | ते साहित्य | material / ingredients<br>सामग्री | माझ्याकडे सगळं साहित्य आहे.<br>I have all the ingredients.<br>मेरे पास पूरी सामग्री है। |
| 829. | ते आले | ginger<br>अदरक | आले तब्येतीसाठी चांगले.<br>Ginger is good for health.<br>अदरक सेहत के लिए अच्छी होती है। |
| 830. | ती पाकळी<br>त्या पाकळ्या | garlic cloves<br>कली | लसणीच्या पाच पाकळ्या घ्या.<br>Take five garlic cloves.<br>लहसुन की पाँच कलियाँ लें। |
| 831. | ती लसूण<br>त्या लसणी | garlic<br>लहसुन | |

| | | | |
|---|---|---|---|
| 832. | ती कोथिंबीर | coriander<br>धनिया | - |
| 833. | ते बेसन | gram flour<br>बेसन | - |
| 834. | ते लाल तिखट | red chilli powder<br>लाल तिखा | - |
| 835. | ती हळद | turmeric<br>हल्दी | - |
| 836. | ते मीठ<br>ती मिठे | salt<br>नमक | - |
| 837. | तळण्यासाठी<br>(तळणे) | for frying<br>तलने के लिए | मी तळण्यासाठी तेल कमी वापरतो.<br>I use little oil for frying.<br>मैं तलने के लिए कम तेल इस्तेमाल करता हूँ। |
| 838. | ते तेल<br>ती तेले | oil<br>तेल | |
| 839. | उकडा<br>(उकडणे) | to boil<br>उबालना | उकडलेली अंडी तब्येतीसाठी चांगली.<br>Boiled eggs are good for health.<br>उबाले हुये अंडे स्वास्थ्य के लिये अच्छे होते हैं। |
| 840. | ती साल<br>त्या साली | peel<br>छिलका | - |
| 841. | कुस्करा<br>(कुस्करणे) | to mash<br>सानना | - |
| 842. | मळा<br>(मळणे) | knead<br>गुंदना | पीठ व्यवस्थित मळा.<br>Knead the dough properly.<br>आटा अच्छे से गूँदें। |
| 843. | तो गोळा<br>ते गोळे | ball<br>गोल | पिठाचे छोटे गोळे करा.<br>Make small balls of the dough.<br>आटे के छोटे गोले बनाएँ। |
| 844. | दाट | thick<br>मोटा | - |
| 845. | ती कढई<br>त्या कढया | frying pan<br>कढ़ाई | - |
| 846. | तो पदार्थ<br>ते पदार्थ | ingredient<br>पदार्थ | तू यात कोणता पदार्थ घालतेस ?<br>Which ingredient do you put in this ?<br>तुम इस में कौनसा पदार्थ डालते हो ? |
| 847. | बनवणे | [471] | -- |
| 848. | वापरणे | to use / make use of<br>उपयोग करना | तो कॉम्प्युटर वापरतो.<br>He uses a computer.<br>वह कम्प्यूटर का उपयोग करता है। |
| 849. | वाढणे | to serve<br>परोसना | गरम जेवण वाढ.<br>Serve hot food!<br>गरम खाना परोसो। |

| | | | |
|---|---|---|---|
| 850. | उशीर (होणे)<br>तो उशीर<br>ते उशीर | late<br>देर | मला उशीर होतोय.<br>I am getting late.<br>मुझे देर हो रही है। |
| 851. | पाचशे | five hundred<br>पाँच सौ | मला पाचशे रुपये दे.<br>Give me five hundred rupees.<br>मुझे पाँच सौ रुपये दो। |
| 852. | माग (मागणे) | to ask for something<br>माँगना | बाबांकडे पैसे माग.<br>Ask your father for money.<br>पापा से पैसे माँग। |
| 853. | नीघ (निघणे) | [774] | |
| 854. | पालेभाजी | [134] | |
| 855. | ती सूचना<br>त्या सूचना | instruction<br>सूचना | कृपया सूचना वाचा.<br>Please read the instructions.<br>कृपया सूचना पढ़ें। |
| 856. | ती सूनबाई<br>त्या | address for daughter-in-law<br>बहू | सूनबाई, ऐक !<br>Listen dear ! (daughter-in-law)<br>बहू, सुन ! |
| 857. | ती भीती | fear<br>डर | मला माणसांची भीती वाटते.<br>I fear humans.<br>मुझे इन्सानों से डर लगता है। |
| 858. | समजणे | understand<br>समझना | मला गणित समजत नाही.<br>I don't understand mathematics.<br>मुझे गणित नहीं समझ में आता। |
| 859. | समजावणे | to explain<br>समझाना | मला समजाव.<br>Please explain to me.<br>मुझे समझाओ। |
| 860. | तो पसारा | mess<br>पसारा | पसारा आवर.<br>Clean up the mess !<br>अस्तव्यस्तता ठीक कर ! |
| 861. | आवर (आवरणे) | to clean up, tidy<br>सवारना, साफ करना | तुझी खोली आवर.<br>Clean up your room !<br>अपना कमरा साफ कर। |
| 862. | ते बद्धकोष्ठ | constipation<br>क़ब्ज़ | बद्धकोष्ठ हा पोटाचा विकार आहे.<br>Constipation is a stomach illness.<br>क़ब्ज़ पेट का विकार है। |
| 863. | ती बचत<br>त्या बचती | savings<br>बचत | मी बचत करू शकत नाही.<br>I cannot save.<br>मैं बचत नहीं कर सकता। |
| 864. | तो जुलाब<br>ते जुलाब | loose motions<br>दस्तें, दस्त | मला जुलाब होतायत.<br>I am having loose motions.<br>मुझे दस्त लग रही है। |
| 865. | खडूस | unfriendly<br>खडूस, अकडू | माझा साहेब खडूस आहे.<br>My boss is unfriendly.<br>मेरे साहब खडूस हैं। |

| | | | |
|---|---|---|---|
| 866. | लग्न | [362] | |
| 867. | ती चप्पल<br>त्या चपला | footwear<br>चप्पल, जूते | आम्हाला चांगल्या चपला दाखवा.<br>Show us good sandals.<br>हमें अच्छी सैंडल दिखाइए। |
| 868. | नक्षीदार | embroidered<br>कसीदे वाली | माझी चप्पल नक्षीदार आहे.<br>My sandals are embroidered.<br>मेरे सैंडल कसीदे वाले हैं। |
| 869. | ते सरबत<br>ती सरबते | juice / a soft drink<br>शरबत | मला सरबत दे.<br>Give me a soft drink.<br>मुझे शरबत दो। |
| 870. | ते हॉस्टेल<br>ती हॉस्टेल | youth hostel<br>हॉस्टेल | युथ हॉस्टेल स्वस्त असतात.<br>Youth hostels are cheap.<br>यूथ हॉस्टेल सस्ते होते हैं। |
| 871. | तो विमानतळ<br>ते विमानतळ | airport<br>हवाई अड्डा | विमानतळ जवळ आहे.<br>The airport is close by.<br>हवाई अड्डा पास में है। |
| 872. | बिनधास्त | bold, fearless<br>बिन्दास | बिनधास्त बोला.<br>Speak fearlessly.<br>बेझिझक बोलो / निर्भीक होकर बोलो। |
| 873. | ती टॅक्सी<br>त्या टॅक्सी | taxi<br>टैक्सी | टॅक्सी, बस, रेल्वे, दवाखाने, हॉटेलं या सगळ्यांची माहिती पर्यटकांना लागते.<br>Taxi, bus, railway, hospital, hotel- Information about all these is required by tourists.<br>टॅक्सी, बस, रेल्वे, दवाखाना, होटल इन सब की जानकारी पर्यटकों को चाहिये होती है। |
| 874. | ती बस<br>त्या बस | bus<br>बस | |
| 875. | ती रेल्वे<br>त्या रेल्वे | railway<br>रेल | |
| 876. | तो दवाखाना<br>ते दवाखाने | dispensary<br>दवाखाना | |
| 877. | ते हॉटेल<br>ती हॉटेलं/हॉटेले | hotel<br>होटल | |
| 878. | गोळा (करणे) | to collect, gather<br>इकट्ठा करना | मी माहिती गोळा करते.<br>I (f) collect information.<br>मैं सूचना इकट्ठा करती हूँ। |
| 879. | काटकसरीने<br>(ती काटकसर) | frugally<br>किफायत से | तू तिथे काटकसरीने रहा.<br>Live there frugally.<br>तुम वहाँ किफायत से रहो। |
| 880. | समुद्रावर<br>(तो समुद्र<br>ते समुद्र) | at the sea<br>समुद्र पर | समुद्रावर सूर्यास्त बघ.<br>See the sunset at the sea.<br>समुद्र पर सूर्यास्त देख। |
| 881. | तो सूर्यास्त<br>ते सूर्यास्त | sunset<br>सूर्यास्त | |
| 882. | ते डोके/डोकं<br>ती डोकी | head<br>सिर | डोकं नीट पूस.<br>Wipe your head properly.<br>सिर अच्छे से पोंछ। |
| 883. | पूस<br>(पुसणे) | to wipe<br>पोंछना | |

| | | | |
|---|---|---|---|
| 884. | माशांचेही<br>(तो मासा<br>ते मासे) | of the fish<br>मछली के भी | माशांचेही चांगले-चांगले पदार्थ मिळतात.<br>One gets good sea-food too.<br>मछली की भी अच्छी अच्छी चीज़ें मिलती हैं। |
| 885. | तो तपशील<br>ते तपशील | details<br>ब्यौरा | मी तुला माझ्याकडचे तपशील मेल करतो.<br>I will email you the details that I have.<br>जो मेरे पास है, वह ब्यौरा मैं तुझे भेजता हूँ। |
| 886. | ते विमान<br>ती विमाने/ विमानं | aeroplane<br>हवाई-जहाज | रात्रीचं विमान आहे.<br>It's a night flight / plane.<br>रात का हवाई-जहाज है। |
| 887. | किमान | minimum, at least<br>कम से कम | विमानतळावर किमान दोन तास आधी पोहोच.<br>Reach the airport at least two hours in advance.<br>कम से कम दो घंटे पहले हवाई अड्डे पर पहुँचो। |
| 888. | पकवतो<br>(पकवणे) | (here:) to bore<br>पकाना | किती पकवतो हा प्रतीक!<br>What a bore Prateek is?<br>कितना पकाता है ये प्रतीक! |
| 889. | ग्राहकांसाठी<br>तो ग्राहक<br>ते ग्राहक | for the customers<br>उपभोक्ताओं के लिए | ग्राहकांसाठी सूचना.<br>An announcement for the customers!<br>ग्राहकों के लिए सूचना। |
| 890. | ती पिशवी<br>त्या पिशव्या | carry bag<br>थैली | खरेदीला कापडी पिशवी न्या.<br>Take along a cloth bag for shopping.<br>खरीदी के लिए कपड़े की थैली साथ ले जाएँ। |
| 891. | सांभाळा (सांभाळणे) | to take care<br>संभालना, खयाल रखना | आपल्या वस्तू सांभाळा.<br>Take care of your belongings.<br>अपनी चीजों का खयाल रखें। |
| 892. | जगायचं (जगणे) | to live<br>जीना | कसं जगायचं?<br>How to live?<br>कैसे जीना चाहिये? |
| 893. | वागायचं (वागणे) | to behave<br>पेश आना | कसं वागायचं?<br>How to behave?<br>कैसे पेश आना चाहिये? |
| 894. | खरे | true, truth<br>सच | नेहमी खरे बोलावे, खोटे बोलू नये.<br>Always apeak the truth, don't lie.<br>सदा सच बोलें, झूठ न बोलें। |
| 895. | खोटे | false, lie<br>झूठ | |
| 896. | स्वच्छ | clean<br>साफ | घर स्वच्छ ठेवावे, घाण करू नये.<br>Keep the house clean, don't make it dirty.<br>घर साफ रखें, गन्दगी न करें। |
| 897. | घाण | dirty<br>गन्दा | |

| | | | |
|---|---|---|---|
| 898. | आळस | laziness<br>आलस | आळस करू नये.<br>Don't be lazy.<br>आलस न करें। |
| 899. | उशिरा | late<br>देर से | उशिरा उठू नये.<br>Don't wake up late.<br>देर से न उठें। |
| 900. | सावकाश | gently, slowly<br>आराम से | सावकाश जेवावे, घाई करू नये.<br>Eat slowly, don't hurry.<br>आराम से खाएँ, जल्दी न करें। |
| 901. | घाई | hurry<br>जल्दी | |
| 902. | कृपया शांतता राखा | - | Please observe silence.<br>कृपया शांति रखें। |
| 903. | मोठ्याने बोलू नये. | - | Don't speak loudly.<br>जोर से बात न करें। |
| 904. | तिकीटखिडकीसमोर गर्दी करू नये.<br>कृपया रांगेत उभे राहावे. | - | Don't crowd in front of the ticket-window. Please stand in a queue.<br>टिकट खिडकी के सामने भीड़ न करें।<br>कृपया कतार में खड़े रहें। |
| 905. | येथे धूम्रपान करू नये. | - | Smoking is prohibited.<br>यहाँ धूम्रपान करना मना है। |
| 906. | कृपया दवाखान्यात मोबाइलवर बोलू नका. | - | Please don't use mobile phones in the clinic.<br>कृपया दवाखाने में मोबाइल पर बात न करें। |
| 907. | कृपया गेटसमोर वाहने लावू नयेत. | - | No parking in front of the gate.<br>कृपया गेट के सामने वाहन न लगाएँ। |
| 908. | कायदा पाळा गतीचा. | - | Please maintain speed limit.<br>कृपया गति की मर्यादा का पालन करें। |
| 909. | कृपया थुंकू नये. | - | Do not spit<br>कृपया न थूकें। |
| 910. | चौकोनी<br>तो चौकोन<br>ते चौकोन | square<br>चौकोना | एक चौकोनी कागद घ्या.<br>Take a square paper.<br>एक चौकोना कागज लें। |
| 911. | दुमडावा (दुमडणे) | to fold<br>मोडना | आधी कागद दुमडावा.<br>Fold the page first.<br>पहले कागज मोड़ें। |
| 912. | ती घडी<br>त्या घड्या | to fold<br>तह करना | कपड्यांची घडी घाल.<br>Fold the clothes<br>कपडों को तह करें। |
| 913. | तो भाग<br>ते भाग | part<br>भाग | केकचे चार भाग कर.<br>Cut the cake in four parts.<br>केक के चार भाग करो। |
| 914. | मागे | behind<br>पीछे | तो मागे उभा आहे.<br>He is standing behind<br>वह पीछे खड़ा है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 915. | विरुद्ध | opposite<br>विरुद्ध | सागर आणि प्रभवची मते एकदम विरुद्ध आहेत.<br>Sagar and Prabhav have opposite views.<br>सागर और प्रभव के मत परस्पर विरुद्ध हैं। |
| 916. | तो त्रिकोण<br>ते त्रिकोण | triangle<br>त्रिकोण | एक त्रिकोण कापा.<br>Cut a triangle.<br>एक त्रिकोण काटें। |
| 917. | पोकळ | hollow<br>खोखला | खालचा भाग पोकळ आहे.<br>The lower part is hollow.<br>नीचे का भाग खोखला है। |
| 918. | उभा | standing<br>खड़ा | तो तिथे उभा आहे.<br>He is standing there.<br>वह वहाँ खड़ा है। |
| 919. | ती बाजू<br>त्या बाजू | sides<br>बाजू, कोने | कागदाच्या बाजू दुमडून घ्याव्यात.<br>Fold the sides of the paper.<br>कागज़ की बाजुएँ मोड़ लें। |
| 920. | करावे तसे भरावे | - | as you sow, so shall you reap<br>जैसी करनी वैसी भरनी |
| 921. | पी हळद नि हो गोरी | - | to expect fast results. / Rome was not built in a day.<br>शीघ्रातिशीघ्र परिणाम की अपेक्षा रखाना। |
| 922. | अंथरूण पाहून पाय पसरावेत. | - | not to go beyond one's means<br>चादर देख कर पैर फैलाना। |
| 923. | ऐकावे जनाचे, करावे मनाचे. | - | Listen to all, but do what you please.<br>सुनों सब की, करो मन की। |



## पाठ ९ | CHAPTER 9

| क्र./No. | शब्द/वाक्य / Word/Sentence | अर्थ / Meaning | उदाहरण / Example |
|---|---|---|---|
| 924. | ते कुटुंब<br>ती कुटुंबे | family<br>परिवार | |
| 925. | संबंध दाखवणे | to show relation.<br>संबंध बताना | |
| 926. | स्वत:च्या कुटुंबाबद्दल माहिती सांगणे | give information about one's family.<br>खुद के परिवार के बारे में बताना | |
| 927. | मालकी हक्क | ownership, possession<br>मालकीयत | |
| 928. | १०० च्या पुढील अंक | numbers beyond 100<br>१०० के आगे के अंक | |
| 929. | प्रश्नशब्द : कोणाचा, कोणाची, कोणाचे | Interrogatives: whose<br>प्रश्नशब्द : किसका, किसकी, किसके | |
| 930. | बाळ | [100] | |

| | | | |
|---|---|---|---|
| 931. | ते कपाट<br>ती कपाटे / कपाटं | cupboard/ almirah<br>अल्मारी | हे सुरभीचे कपाट आहे.<br>This is Surabhi's cupboard.<br>यह सुरभि की अल्मारी है। |
| 932. | ते मांजर<br>ती मांजरे / मांजरं | cat<br>बिल्ली | मांजर उंदरामागे धावते.<br>The cat runs after the mouse.<br>बिल्ली चूहे के पीछे भागती है। |
| 933. | ती शाळा<br>त्या शाळा | school<br>पाठशाला | माझी शाळा मोठ्ठी आहे.<br>My school is big.<br>मेरी पाठशाला बड़ी है। |
| 934. | तो भ्रमणध्वनी<br>ते भ्रमणध्वनी | mobile<br>मोबाईल | हा आहे माझा भ्रमणध्वनी क्रमांक.<br>This is my mobile number.<br>यह मेरा मोबाइल नम्बर है। |
| 935. | महाग | expensive<br>महँगा | हे घड्याळ महाग आहे.<br>This watch is expensive.<br>यह घड़ी महँगी है। |
| 936. | राखाडी | [130] | |
| 937. | रंगाचा / रंगाची / रंगाचे<br>(तो रंग<br>ते रंग) | of the colour<br>रंग का / रंग की / रंग के | १. हा शर्ट लाल रंगाचा आहे.<br>This shirt is red.<br>यह शर्ट लाल रंग की है।<br>२. ही काच सफेद रंगाची आहे.<br>This glass is white.<br>यह काँच सफेद रंग का है।<br>३. हे पेन काळ्या रंगाचे आहे.<br>This pen is black.<br>यह पेन काले रंग का है। |
| 938. | हल्ली | these days, nowadays,<br>आजकल | मी हल्ली मुंबईत राहतो.<br>I live in Mumbai these days.<br>आजकल मै मुंबई में रहता हूँ। |
| 939. | सतत | all the while, always<br>हर समय, हमेशा | तो सतत दौयावर असतो.<br>He is always on tour.<br>वह हमेशा दौरे पर रहता है। |
| 940. | कोणाचा / कोणाची / कोणाचे | whose<br>किसका / किसकी / किसके | १. हा रुमाल कोणाचा आहे ?<br>Whose handkerchief is this ?<br>यह रुमाल किसका है ?<br>२. ही वही कोणाची आहे ?<br>Whose notebook is this ?<br>यह नोटबुक किसकी है ?<br>३. हे घर कोणाचे आहे ?<br>Whose house is this ?<br>यह घर किसका है ? |
| 941. | घरच्यांशी | with the members of family<br>घर के सदस्य | तो घरच्यांशी बोलत नाही.<br>He does not talk to his family members.<br>वह घरके सदस्यों से बातचीत नहीं करता। |

| | | | |
|---|---|---|---|
| 942. | माझा (m) /<br>माझी (f) /<br>माझे (n) | my<br>मेरा / मेरी | १. हा माझा मुलगा.<br>This is my son.<br>यह मेरा लड़का / बेटा है।<br>२. ही माझी मुलगी.<br>This is my daughter.<br>यह मेरी लड़की / बेटी है !<br>३. हे माझे घर आहे.<br>This is my house.<br>यह मेरा घर है ! |
| 943. | तो भाऊ<br>ते भाऊ | brother<br>भाई | हा माझा भाऊ, अक्षय.<br>This is my brother Akshay<br>यह मेरा भाई, अक्षय है। |
| 944. | बायको | [250] | |
| 945. | ती वहिनी<br>त्या वहिन्या | brother's wife<br>भाभी | रेश्मा रोहितची वहिनी आहे.<br>Reshma is Rohit's sister-in-law.<br>रेश्मा रोहित की भाभी है ! |
| 946. | आजी | [254] | - |
| 947. | ते आजोबा | grand father<br>दादाजी / नानाजी | हे बाबूचे आजोबा.<br>He is grandfather of baboo.<br>वे बाबू के दादाजी / नानाजी हैं। |
| 948. | ती बहीण<br>त्या बहिणी | sister<br>बहन | शांती मनोहरची बहीण आहे.<br>Shanti is Manoher's sister.<br>शांति मनोहर की बहन है। |
| 949. | ती आई<br>त्या आया | mother<br>माँ | माझी आई डॉक्टर आहे.<br>My mother is a doctor.<br>मेरी माँ डॉक्टर है। |
| 950. | ते (आदरार्थी) / तो बाबा | father<br>पिताजी | नागेशचे बाबा चित्रकार आहेत.<br>Nagesh's father is an artist.<br>नागेश के पिताजी चित्रकार हैं। |
| 951. | तो नातेवाईक<br>ते नातेवाईक | relative<br>रिश्तेदार | हे सर्व माझे नातेवाईक आहेत.<br>They all are my relatives.<br>ये सब मेरे रिश्तेदार हैं। |
| 952. | काका | [155] | |
| 953. | तो दादा<br>ते दादा | elder brother<br>बड़ा भाई | हा माझा दादा.<br>He is my elder brother.<br>यह मेरे बड़े भाई हैं। |
| 954. | ती मावशी<br>त्या मावश्या | aunt, mother's sister<br>मौसी | आईची बहीण ती मावशी.<br>'Mavshi' means mother's sister.<br>माँ की बहन मौसी। |
| 955. | ती काकी / काकू<br>त्या काकी / काकू | aunt, father's brother's wife<br>चाची/ ताई | ही माझी मोठी काकू आहे.<br>She is my elder uncle's wife.<br>वह मेरी ताई हैं। |
| 956. | मामा | [74] | - |

| | | | |
|---|---|---|---|
| 957. | ती आत्या<br>त्या आत्या | aunt, father's sister<br>बुआ | ही माझी आत्या आहे.<br>This is my aunt (father's sister).<br>यह मेरी बुआ हैं। |
| 958. | तो मित्रपरिवार | friend circle<br>मित्रपरिवार | माझा मित्रपरिवार बराच मोठा आहे.<br>My friend circle is quite large.<br>मेरा मित्र परिवार काफी बड़ा है। |
| 959. | तो खास मित्र<br>ते खास मित्र | best friend<br>जिगरी देस्त | रमेश सुरेशचा खास मित्र आहे.<br>Ramesh is Suresh's best friend.<br>रमेश सुरेश का सबसे अच्छा मित्र है। |
| 960. | जवळपास रोज | practically everyday<br>लगभग रोजाना | आम्ही जवळपास रोज भेटतो.<br>We meet practically daily.<br>हम लगभग रोजाना मिलते हैं। |
| 961. | ते गिर्यारोहण<br>ती गिर्यारोहणे | mountain climbing<br>पर्वतारोहण | गिर्यारोहण खूप अवघड असते.<br>Mountain climbing is very difficult.<br>पर्वतारोहण बहुत कठिन होता है। |
| 962. | तो नवरा<br>ते नवरे | husband<br>पती | कमाल सुल्तानाचा नवरा आहे.<br>Kamala is Sultan's husband.<br>कमाल सुल्ताना का पति है। |
| 963. | रुमाल | [770] | |
| 964. | घड्याळ | [83] | |
| 965. | साधारणपणे | usually<br>साधारणत: , ज्यादातर | आमची संध्याकाळ साधारणपणे अशीच असते.<br>Our evenings are usually like this.<br>हमारी शाम ज्यादातर ऐसी ही होती है। |
| 966. | गप्पा मारता मारता (मारणे) | while chatting<br>गप्पें मारते मारते | आम्ही गप्पा मारता मारता झोपलो.<br>We fell asleep while chatting.<br>हम गप्पें मारते मारते सो गए। |
| 967. | सोपवावा (सोपवणे) | to hand over<br>सौंप देना | रिमोट आजीकडे सोपवावा लागतो.<br>The remote control has to be handed over to granny.<br>रिमोट दादी / नानी को देना पड़ता है। |
| 968. | ती मालिका<br>त्या मालिका | t.v. serial<br>धारावाहिक | आजी तिची आवडती मालिका बघते.<br>Granny watches her favourite serial.<br>दादी / नानी अपना पसंदीदा धारावाहिक देखती है। |
| 969. | तो डोळा<br>ते डोळे | eye<br>आँख | ते डोळे मिचकावून गुणगुणतात.<br>He blinks while humming.<br>वे आँख मिचका कर गुनगुनाते हैं। |
| 970. | गुणगुणतात (गुणगुणणे) | to hum<br>गुनगुनाना | |
| 971. | ते माहेर | maternal home of a married woman<br>मायका | वहिनीचं माहेर जवळ आहे.<br>My sister-in-law's maternal home is nearby.<br>भाभी का मायका पास में है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 972. | हळू | [484] | |
| 973. | जलद | fast<br>जलद, तेज़ | ही जलद गाडी आहे.<br>This is a fast train.<br>यह तेज ट्रेन है। |
| 974. | उलट | opposite<br>उल्टा | आणि तिच्या उलट ओंकार.<br>And Omkar is her exact opposite.<br>और ओंकार उसका ठीक उल्टा है। |
| 975. | भरभर | very quickly, hurriedly<br>फटाफट | तो भरभर स्वयंपाक करतो.<br>He cooks very fast.<br>वह फटाफट खाना पकाता है। |
| 976. | वेगाने<br>तो वेग<br>ते वेग | with speed<br>गति से | तो वेगाने गाडी चालवतो.<br>He drives speedily.<br>वह गाड़ी तेज चलाता है। |
| 977. | अनेकदा | many times<br>कई बार | आम्ही अनेकदा भेटतो.<br>We meet many a time/ s.<br>हम कई बार मिलते हैं। |
| 978. | भरपूर | many, a lot<br>खूब, बहुत | आम्ही भरपूर गप्पा मारतो.<br>We chat a lot.<br>हम खूब गप्पें मारते हैं। |
| 979. | भिन्न | different<br>अलग | माझे मत भिन्न आहे.<br>I have a different opinion.<br>मेरी राय अलग है। |
| 980. | क्वचित | seldom, rarely<br>कभी कभी | आम्ही क्वचितच बोलतो.<br>We talk rarely.<br>हम कभी कभी ही बातें करते हैं। |
| 981. | एकदा | एक बार | एकदा का स्काइप सुरू केलं की आमच्यातलं अंतर पटकन नाहीसं होतं.<br>Once skype gets started, the distance between us goes/ disappears.<br>एक बार स्काईप चालू हुआ नहीं, कि हमारे बीच का फासला गायब हो जाता है। |
| 982. | पटकन् | quickly<br>जल्द | |
| 983. | नाहीसं होणे | to go away/ to disappear<br>न होना, गायब होना | |
| 984. | सतराशे साठ | 1760, a thousand ..., an exaggeration, a lot in number<br>कई प्रकार के, विविध | ती सतराशे साठ उद्योग करत असते.<br>She does a thousand things.<br>वह हजार काम करती रहती हैं। |
| 985. | शे - सव्वाशे लोक | | Approximately 100 -125 people<br>करीब सौ सवा सौ लोग |
| 986. | हजारदा सांगणे | | To say a thousand times<br>हजार बार कहना |
| 987. | स्वामी तिन्ही जगांचा आईविना भिकारी | | The king of three worlds is a beggar without a mother.<br>तीनों जग का राजा, पर माँ बिन भिखारी |
| 988. | सख्खे भाऊ, पक्के वैरी | | Loving brothers could be bitter enemies at times.<br>सगे भाई, जानी दुश्मन |

पाठ १

| | | | |
|---|---|---|---|
| 989. | इवल्या | tiny<br>नन्हे से | इवल्या इवल्या घरट्यात, चिमणा चिमणी राहतात.<br>A pair of sparrows lives in a tiny nest.<br>एक नन्हें से घोंसले में गौरैया का एक जोड़ा रहता है। |
| 990. | ते घरटे<br>ती घरटी | nest<br>घोंसला | |
| 991. | तो चिमणा<br>ते चिमणे | sparrow (m)<br>गौरैया | |
| 992. | ती चिमणी<br>त्या चिमण्या | sparrow (f)<br>गौरैया | |
| 993. | चिवचिवणे | to chirp / tweet<br>चीं चीं करना | चिमणी चिवचिवते.<br>The sparrow (f) chirps.<br>गौरैया चीं चीं करती है। |
| 994. | आभाळ | [78] | |
| 995. | झेलणे | to bear, manage, tolerate / to shoulder responsibility<br>झेलना | आभाळ झेलते पंखांवरी.<br>It bears the sky on its wings.<br>सारा जहाँ अपने कंधों पर लेती है। |
| 996. | पंखांवरी<br>तो पंख<br>ते पंख | on the wings<br>पंखों पर | |
| 997. | पापा घ्यावा (घेणे) | to kiss the little ones softly<br>बच्चों की चुम्मी लेना | पिल्लांचा हळूच पापा घ्यावा.<br>Kiss the little ones (of the sparrow) softly.<br>गौरैया के बच्चों की चुम्मी लेना। |
| 998. | ते छप्पर<br>ती छपरे | roof<br>छत | छप्पर / भिंत / दार हसते.<br>The roof, walls, doors laugh. (personification)<br>छत, दीवार, दरवाजे हँसते हैं। |
| 999. | ती भिंत<br>त्या भिंती | wall<br>दीवार | |
| 1000. | ते दार<br>ती दारे | door<br>दरवाजा | |
| 1001. | वेळ घालवणे | to spend time<br>समय बिताना | तुम्ही घरी वेळ कसा घालवता ?<br>How do you spend your time at home?<br>आप घर पर समय कैसे बिताते हैं ? |

## पाठ १० | CHAPTER 10



| क्र./No. | शब्द/वाक्य / Word/Sentence | अर्थ / Meaning | उदाहरण / Example |
|---|---|---|---|
| 1002. | आनंदाचे प्रसंग<br>तो प्रसंग<br>ते प्रसंग | merry times / occasions<br>खुशी के मौके / अवसर | |
| 1003. | आवड निवड सांगणे, विचारणे | to tell about and ask for one's likes & dislikes<br>पसंद और नापसंद बताना और पूछना | |
| 1004. | वाढदिवस सांगणे, विचारणे | to tell and ask one's birth date<br>जन्मदिन बताना और पूछना | |

| | | | |
|---|---|---|---|
| 1005. | वाढदिवसाचे आमंत्रण करणे | to invite for one's birthday.<br>जन्मदिन पर आमंत्रण देना | |
| 1006. | होकार व नकार देणे | to accept / reject invitation.<br>स्वीकार / अस्वीकार करना | |
| 1007. | ती आवड-निवड<br>त्या आवडी-निवडी | choice<br>रुचि / अरुचि | प्रत्येकाला आवड-निवड असते.<br>Everybody has likes and dislikes.<br>हर एक की रुचि / अरुचि होती है। |
| 1008. | तो वाढदिवस<br>ते वाढदिवस | birthday<br>जन्मदिन / सालगिरह / बरसगाठ | आज अजयचा वाढदिवस आहे.<br>It's Ajay's birthday today.<br>आज अजय का जन्मदिन है। |
| 1009. | ते आमंत्रण<br>ती आमंत्रणे | invitation<br>आमंत्रण | तुझ्या लग्नाचे आमंत्रण मिळाले.<br>Received the invitation of your marriage.<br>तेरी शादी का आमंत्रण मिला। |
| 1010. | तो होकार<br>ते होकार | acceptance<br>स्वीकृति, मंजूरी | तुझा होकार कळव.<br>Let me know your acceptance.<br>अपनी स्वीकृति बता। |
| 1011. | तो नकार<br>ते नकार | refusal, rejection<br>नकार | तिने त्याला नकार दिला.<br>She refused him.<br>उसने उसे मना कर दिया। |
| 1012. | ती इच्छा<br>त्या इच्छा | desire, wish<br>इच्छा | माझी येण्याची इच्छा नाही.<br>I don't wish to come.<br>मैं आना नहीं चाहता। |
| 1013. | व्यक्त करणे | to express<br>प्रकट करना | मी खेद व्यक्त करतो.<br>I express my regrets.<br>मैं खेद प्रकट करता हूँ। |
| 1014. | फावला (वेळ) | spare (time)<br>खाली (समय) | तू फावला वेळ कसा घालवतोस ?<br>How do you spend you spare time?<br>तू अपना खाली समय कैसे बिताता है ? |
| 1015. | नाटक / सिनेमा बघणे | to watch play / movie<br>नाटक / चित्रपट देखना. | सुटीच्या दिवशी मी खूपदा नाटक किंवा सिनेमाला जातो.<br>On a holiday I frequently go to a play or a movie.<br>छुट्टी के दिन मैं प्राय: नाटक या फिल्म देखने जाता हूँ। |
| 1016. | ते बागकाम<br>ती बागकामे | gardening<br>बागबानी करना | बागकाम करणे हा माझा छंद आहे.<br>Gardening is my hobby.<br>बागबानी करना मेरा शौक है। |
| 1017. | फिरणे (फिरायला जाणे) | to walk out, to go for a walk<br>घूमना / घूमने जाना | मी रोज सकाळी फिरायला जातो.<br>I go for a walk daily in the morning.<br>मैं हर रोज सुबह घूमने जाता हूँ। |
| 1018. | चित्र रंगवणे<br>ते चित्र<br>ती चित्रे | to colour / paint the picture<br>चित्र में रंग भरना. | मी चित्र रंगवत आहे.<br>I am colouring / painting the picture.<br>मैं चित्र में रंग भर रहा हूँ। |

| | | | |
|---|---|---|---|
| 1019. | चित्र काढणे | to draw a picture<br>फोटो खींचना / चित्र बनाना | चित्र काढणे हा त्याचा छंद आहे.<br>Clicking pictures / Drawing is his hobby.<br>फोटो खींचना / चित्र बनाना उसका शौक है। |
| 1020. | कविता करणे | to write poems<br>कविता लिखना | रवींद्र कविता करतो.<br>Ravindra writes poems.<br>रवींद्र कविता लिखता है। |
| 1021. | वाचन करणे | to read / reading<br>पढना | वाचन हा माझा छंद आहे.<br>Reading is my hobby.<br>पढ़ना मेरा शौक है। |
| 1022. | गाणी ऐकणे | to listen to songs<br>गाने सुनना | गाणी ऐकण्यात मला खूप आनंद मिळतो.<br>I get tremendous pleasure in listening to songs.<br>मुझे गाने सुनने में बहुत आनंद आता है। |
| 1023. | मजा (मज्जा येणे) | [540] | |
| 1024. | वेगवेगळ्या | different (kinds of)<br>अलग अलग प्रकार की | वेगवेगळ्या भाज्या बनवायला मला मज्जा येते. |
| 1025. | चमचमीत | [592] | |
| 1026. | गप्पिष्ट | chatterbox<br>गप्पी | तो गप्पिष्ट आहे.<br>He is a chatterbox.<br>वह गप्पी है। |
| 1027. | पुष्कळ | a lot<br>बहुत | मला पुष्कळ काम आहे.<br>I have a lot of work.<br>मुझे बहुत काम है। |
| 1028. | सरळ (करणे) | straight<br>सीधा | मी केस सरळ करते.<br>I straighten my hair.<br>मैं बाल सीधे करती हूँ। |
| 1029. | ते कुलूप<br>ती कुलपे/ कुलपं | lock<br>ताला | मी ही हेअरपिन कुलूप उघडायला वापरते.<br>I use this hairpin to open the lock.<br>मैं इस हेअरपिन का उपयोग ताला खोलने के लिए करती हूँ। |
| 1030. | ती बढती<br>त्या बढत्या | promotion<br>पदोन्नति, तरक्की | त्याला बढती मिळाली.<br>He got a promotion.<br>उसकी पदोन्नति हो गई। |
| 1031. | तो निकाल<br>ते निकाल | result<br>परिणाम, फल | निवडणुकीचा निकाल काय लागला?<br>What are the results of the election?<br>चुनाव का नतीजा क्या निकला? |
| 1032. | ती दिवाळी | festival of lights<br>दिवाली, दीपावली | या वर्षी दिवाळी नोव्हेंबर महिन्यात आहे.<br>This year Diwali comes in November.<br>इस बरस दिवाली नवम्बर में है। |
| 1033. | शुभ दीपावली | - | Happy Diwali !<br>शुभ दीपावली! |

| | | | |
|---|---|---|---|
| 1034. | ईदच्या शुभेच्छा | - | Eid Mubarak !<br>ईद मुबारक ! |
| 1035. | ती होळी<br>त्या होळ्या | festival of Holi<br>होली | आज होळी आहे.<br>It is Holi today.<br>आज होली है। |
| 1036. | तो गुढीपाडवा | Marathi new year<br>गुढी पाडवा | गुढीपाडवा एप्रिल महिन्यात येतो.<br>Gudhipadva comes in the month of April.<br>गुढी पाडवा अप्रैल मे आता है। |
| 1037. | ते नवीन वर्ष | new year<br>नया साल | नवीन वर्ष १ जानेवारीला सुरू होते.<br>New year begins on the 1st of January.<br>नया साल १ जनवरी को शुरु होता है। |
| 1038. | तो दसरा | Dussehra (the tenth final day of Hindu autumn festival of Navratri)<br>दशहरा | दसरा हा मोठा सण आहे.<br>Dussehra is a big festival.<br>दशहरा बड़ा त्यौहार है। |
| 1039. | ती सक्रांत<br>त्या संक्रांती | a kite festival in January.<br>मकर संक्राति | संक्रांत हा सण जानेवारी महिन्यात येतो.<br>Sankrant comes in the month of January.<br>संक्राति जनवरी महीने में आती है। |
| 1040. | तो तीळगूळ | sweet made of sesame seeds and jaggery<br>तिल गुड | तो तीळगूळ खातो.<br>He eats tilgul.<br>वह तिल गुड खाता है। |
| 1041. | नूतन वर्षाभिनंदन | - | Happy New Year !<br>नये साल की शुभ कामनाएँ ! |
| 1042. | ती शुभेच्छा<br>त्या शुभेच्छा | Greetings!<br>शुभ कामनाएँ। | दीपावलीच्या शुभेच्छा !<br>Greetings for Diwali!<br>दीपावली की शुभ कामनाएँ! |
| 1043. | ते निमंत्रण<br>ती निमंत्रणे | invitation<br>निमंत्रण / आमंत्रण | कार्यक्रमाचे निमंत्रण आले आहे.<br>The invitation of the programme has arrived.<br>कार्यक्रम का निमंत्रण आ गया है। |
| 1044. | तो / ते गणपती | name of the elephant headed God, the festival of lord Ganesha<br>गणेश, गणेश उत्सव | गणपती विघ्नहर्ता आहे.<br>Lord Ganesha removes all the obstacles.<br>गणेश विघ्न दूर करते हैं। |
| 1045. | साजरा (करणे) | to celebrate<br>मनाना | मी दिवाळी सण साजरा करतो.<br>I celebrate Diwali.<br>मैं दिवाली मनाता हूँ। |
| 1046. | ती भेटवस्तू<br>त्या भेटवस्तू | gift<br>तोहफा, भेंट | ती त्याला भेटवस्तू देते.<br>She gives him a gift.<br>वह उसे एक तोहफा देती है। |
| 1047. | कळवतो (कळवणे) | to inform<br>सूचित करना, बताना | मी तुला दोन दिवसांनी कळवतो.<br>I (m) will tell / inform you in two days.<br>मैं तुम्हें दो दिन में बताता हूँ। |

| | | | |
|---|---|---|---|
| 1048. | मागे | behind, at the back<br>पीछे | घराच्या मागे देऊळ आहे.<br>There is a temple behind the house.<br>घर के पीछे मंदिर है। |
| 1049. | लांब | away, at, a distance, far<br>दूर, लंबा | येथून स्टेशन लांब आहे.<br>The station is far from here.<br>यहाँ से स्टेशन दूर है। |
| 1050. | मध्ये | in, inside<br>में, अंदर | या बिल्डिंगमध्ये एक जिम आहे.<br>There is a gym in this building.<br>इस बिल्डिंग में एक जिम है। |
| 1051. | वर | on, above, over<br>ऊपर | छपरावर एक माकड बसले आहे.<br>A monkey is sitting on the roof.<br>एक बंदर छत पर बैठा है। |
| 1052. | पुढे | ahead<br>आगे | पुढे एक पूल आहे.<br>There is a bridge ahead.<br>आगे एक पुल है। |
| 1053. | सरळ | straight<br>सीधा | सरळ जा.<br>Go straight<br>सीधे जाओ। |
| 1054. | खाली | below / down<br>नीचे | खाली उतर.<br>Come / get down !<br>नीचे उतर! |
| 1055. | ते वळण<br>ती वळणे / वळणं | turn<br>मोड़ | पुढे वळण आहे.<br>There is a turn ahead.<br>आगे मोड़ है। |
| 1056. | उजवीकडे | towards right<br>दाएँ | उजवीकडे वळा.<br>Turn right.<br>दाहिने मुड़ो। |
| 1057. | डावीकडे | towards left<br>बाएँ | आधी डावीकडे पाहा.<br>First look at the left.<br>पहले बाएँ देखें। |
| 1058. | ती इमारत<br>त्या इमारती | building<br>इमारत | ती इमारत उंच आहे.<br>That building is tall.<br>वह इमारत ऊँची है। |
| 1059. | तो पुतळा<br>ते पुतळे | statue<br>मूर्ति | हा डॉ. आंबेडकरांचा पुतळा आहे.<br>This is the statue of Dr. Ambedkar.<br>यह डॉ. अंबेडकर की मूर्ति है। |
| 1060. | सायकल चालवणे | riding bicycle<br>सायकल चलाना | श्याम सायकल चालवतो.<br>Shyam rides the cycle.<br>श्याम सायकल चलाता है। |
| 1061. | ते दुकान<br>ती दुकाने / दुकानं | shops<br>दुकाने | आज दुकाने बंद आहेत.<br>Today shops are closed.<br>आज दुकानें बंद हैं। |
| 1062. | जाहिरात | [351] | -- |

पाठ १०

| | | | |
|---|---|---|---|
| 1063. | तो जिलेबीवाला<br>ते जिलेबीवाले | someone who makes and sells jalebi<br>जलेबी बेचनेवाला | तो जिलेबीवाला आहे.<br>That is a jalebiwalla.<br>वह जलेबीवाला है। |
| 1064. | तो फळवाला<br>ते फळवाले | fruit seller<br>फलवाला | फळवाला फळे विकतो.<br>The fruit seller sells fruits.<br>फलवाला फल बेचता है। |
| 1065. | ती बस<br>त्या बस | bus<br>बस | ही बस विमानतळापर्यंत आहे.<br>This is bus goes up to the airport.<br>यह बस हवाईअड्डे तक जाती है। |
| 1066. | सोपं (सोपे) | easy<br>आसान, सरल | गणित खूप सोपं असतं.<br>Mathematics is very easy.<br>गणित बहुत आसान है। |
| 1067. | नेहमी | always, regularly<br>नियमित रूप से | आम्ही नेहमी भेटतो.<br>We meet regularly.<br>हम नियमित रूप से मिलते हैं। |
| 1068. | हल्ली | now-a-days<br>आजकल | हल्ली मुली धीट झाल्या आहेत.<br>Now-a-days girls have become bold.<br>आजकल लडकियाॅ निडर बन गई हैं। |
| 1069. | आता | now<br>अब | आता मी जेवतो.<br>I will have my meal now.<br>अब मैं खाना खाता हूँ। |
| 1070. | कधी तरी | some time<br>कभी तो | तू कधी तरी ये ना घरी.<br>Why don't you come home some time?<br>कभी तो घर आओ। |
| 1071. | कधीच नाही | never<br>कभी नहीं | मी कधीच येणार नाही.<br>I will never come.<br>मैं कभी नहीं आऊंगा. |
| 1072. | शांत असणे | to be quiet, calm, composed<br>शांत रहना | आज विद्यार्थी खूप शांत आहेत.<br>Today the students are quiet.<br>आज छात्र काफी शांत हैं। |
| 1073. | करायचंय (करणे) (n)<br>करायचाय (करणे) (m)<br>करायचीय (करणे) (f) | (to want) to do<br>करना (करना चाहना) | मला हेच करायचंय.<br>I want to do only this.<br>मुझे यही करना है। |
| 1074. | जायचंय (जाणे) | (to want) to go / leave<br>जाना (जाना चाहना) | मला घरी जायचंय.<br>I want to go home.<br>मुझे घर जाना है। |
| 1075. | लिहायचंय (लिहिणे) | (to want) to write<br>लिखना (लिखना चाहना) | मला गाणं लिहायचंय.<br>I want to write a song<br>मुझे गाना लिखना है। |
| 1076. | परीक्षा | [486] | |
| 1077. | तो गृहपाठ<br>ते गृहपाठ | homework<br>गृहपाठ | भरपूर गृहपाठ आहे.<br>There is a lot of homework.<br>भरपूर गृहपाठ है। |

| | | | |
|---|---|---|---|
| 1078. | ती कार्यशाळा<br>त्या कार्यशाळा | workshop<br>कार्यशाला | परवा मला कार्यशाळेत एक सादरीकरण करायचंय. |
| 1079. | परवा | day after tomorrow<br>परसों | I have to give a presentation at a workshop day after tomorrow.<br>मुझे परसों एक कार्यशाला में एक प्रस्तुतीकरण करना है। |
| 1080. | ती तयारी<br>त्या तयारी | preparation<br>तैयारी | तयारी करायचीय.<br>Need to make preparations.<br>तैयारी करनी है। |
| 1081. | ती कादंबरी<br>त्या कादंबऱ्या | novel/ fiction<br>उपन्यास | तो कादंबरी लिहीत आहे.<br>He is writing a novel.<br>वह उपन्यास लिख रहा है। |
| 1082. | बाजारात | in the market<br>बाज़ार में | आई बाजारात जाते.<br>Mom goes to the market.<br>माँ बाज़ार जाती है। |
| 1083. | ढीगभर | a lot<br>बहुत | तिच्याकडे ढीगभर काम आहे.<br>She has a lot of work.<br>उसके पास बहुत काम है। |
| 1084. | दांडी मारणे | to bunk<br>बिना बताए काम या पाठशाला पर न आना | विलास रोज शाळेला दांडी मारतो.<br>Vilas bunks school every day.<br>विलास रोज बिना बताए पाठशाला नहीं आता है। |
| 1085. | संपवायचंय (संपवणे) | (to want) to finish<br>खत्म करना (खत्म करना चाहना) | मला हे काम आजच संपवायचंय.<br>I want to finish this work today itself!<br>मुझे यह काम आज ही खत्म करना है। |
| 1086. | खेळायचंय (खेळणे) | (to want) to play<br>खेलना (खेलना चाहना) | तिला खेळायचंय.<br>She wants to play.<br>उसे (f) खेलना है। |
| 1087. | वाचायचंय (वाचणे) | (to want) to read<br>पढ़ना (पढ़ना चाहना) | मला हे पुस्तक वाचायचंय.<br>I want to read this book.<br>मुझे यह किताब पढ़नी है। |
| 1088. | घ्यायचंय (घेणे) | (to want) to take / buy / have<br>लेना / खरीदना (लेना / खरीदना चाहना) | मला ते घड्याळ घ्यायचंय.<br>I want to buy that watch.<br>मुझे वह घड़ी लेनी है। |
| 1089. | करायला गेलो एक आणि झालं भलतंच | - | wanted to do something but something else happened<br>जाना था मथुरा, पर पहुँच गया काशी। |
| 1090. | देव लागला द्यायला, पदर नाही घ्यायला | - | to not have the capacity to receive divine bounty.<br>भगवान छप्पर फाड़ कर देने लगे पर समेटने को आँचल नहीं। |

- Marathi workbook for beginners' level 1 :
  creative exercises, tests, glossary & answer key
- An integrated communicative approach
- Systematic and effective learning of the Language
- For young & adult learners
- For classroom study as well as self-learners
- Language skills: understanding, speaking, reading, writing Marathi

**The set contains:**

1. A Textbook
2. A Workbook
3. A DVD (with audio & audio-visual content)
   Online access link: https://mu.ac.in/mymarathi1

Publisher:
**Granthali**
Woolen Mill Municipal School,
Gr. Floor. J. K. Sawant Marg,
Near Yashwant Natya Mandir,
Matunga (West), Mumbai 400016
Tel.: 022 2421 6050 / 2430 6624
Email: granthali01@gmail.com

Printer:
**India Print Works**
India Print House,
42, G. D. Ambekar Marg,
Wadala, Mumbai 400031

ISBN 978-93-84475-07-9

9 789384 475079 >

Price: Rs. 1250 | 25 USD | 20 EUR
(For the complete set of Textbook + Workbook + Free DVD)

**University of Mumbai**

Join us on Facebook: https://www.facebook.com/LearnMarathiAtMumbaiUniversity